# अनुक्रमणिका




| | | |
|---|---|---|
| ● जमिनीला हवे कष्टाचे पायखत | संपादकीय | २ |
| ● पाकिस्तानी तालिबान : एक नवीन आव्हान | डॉ. श्रीकांत परांजपे | ६ |
| ● हवामान बदलाचे संशोधन | शरद पवार | १५ |
| ● डॉ. विजयाताई पाटील : बांधिलकी, चिकाटी व कष्टाचा आदर्श | शरद पवार | १८/६३ |
| ● यंदाचा पावसाळा सर्वसाधारण | वेधशाळेचा अंदाज | १९ |
| ● ज्ञान आयोगाच्या शिफारशींकडे दुर्लक्ष | डॉ. अशोक कोळस्कर | २२ |
| ● अमला प्रज्ञा आणि सूक्ष्म दृष्टीचे राजकारण | डॉ. सदानंद मोरे | २८ |
| ● 'इस्रो'चे आणखी एक उड्डाण | एल. श्रीधर | ३४ |
| ● कायद्याचा 'भूप्रदेश' स्त्रीवादी भिंगातून | डॉ. विद्युत भागवत | ३९ |
| ● सुदर्शनजींची मखलाशी दिले नरसिंहरावांना फाशी | जितेंद्र गोस्वामी | ५३ |
| ● कमाल उद्धवाच्या उद्धटपणाची | किशोर माथनकर | ५६ |
| ● हिरे कारागीरांचा असंतोष मोदींना भोवणार | बिनू ॲलेक्स | ५९ |
| ● आव्हान मानवजातीच्या सर्वंकष प्रगतीचे | डॉ. रघुनाथ माशेलकर | ६४ |
| ● निष्ठावान अभ्यासक | हरी नरके | ७२ |
| ● ऑस्कर्स मिळाले, नोबेलचे काय? | प्रा. द. ना. धनागरे | ७५ |
| ● निवडणूक २००९ : सत्तेचे मैदान सर्वांना खुले | विजय नाईक | ८३ |
| ● क्रिकेटप्रमाणे आता हॉकीतही भारताची आगेकूच | मुकुन्द मोघे | ९१ |



प्रबंध संपादक
**आर. आर. पाटील**
वर्ष पहिले
अंक : **दहावा**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व प्रबंध संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादक :
**डॉ. सुधीर भोंगळे**

संपादकीय पत्रव्यवहार
राष्ट्रवादी भवन, शासकीय कुटीर क्र. २१, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी : ३०२३५५१८/५५/५६

व्यवस्थापकीय संचालक
**हेमंत टकले**
संकलन सहभाग :
**बाळासाहेब लासुरे**
वितरण व्यवस्था :
**डॉ. गजानन देसाई**
निर्मिती व्यवस्था :
**जितेंद्र गोस्वामी**
मुखपृष्ठ रचना :
**दिलीप रोडे, पुणे**

**वर्गणीचे दर :**
**वार्षिक रु. २००/-**
**आजीव रु. २०००/-**
(दिवाळी अंकासह)

हे मासिक
www.mhncp.org
यावर उपलब्ध आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. आर. आर. पाटील यांनी मयुर प्रिंटर्स, ५०६/मयुरेश, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई -३३ येथे छापून राष्ट्रवादी भवन, शासकीय कुटीर क्र. २१, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई - २१, येथून प्रकाशित केले.

# जमिनीला हवे कष्टाचे पायखत



देशातील ८० टक्के लोक आज या ना त्या निमित्ताने शेतीशी म्हणजे जमिनीशी संबंधित आहेत. अन्नधान्य, फळे, भाजीपाला, दूध व खाण्याशी संबंधित सर्व पदार्थ जमिनीपासूनच उपलब्ध होत असल्याने एका अर्थाने सगळ्या लोकांचा जमिनीशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष का होईना पण संबंध आहेच. मानवाला सर्वात मोठी धोक्याची गोष्ट जर कोणती असेल तर ती म्हणजे जमिनीपासून वेगळे केले जाणे. ज्याप्रमाणे प्रत्येक वृक्षाचे मूळ जसे जमिनीत असते तसा प्रत्येक मनुष्याचा संबंध जमिनीशी असलाच पाहिजे. जमिनीपासून वेगळा केलेला मनुष्य मानसिक आजाराने पीडित होतो असा काही शास्त्रांचा अभ्यासाचा निष्कर्ष आहे. त्यामुळे मनुष्याचे जीवन जितके पूर्ण होईल तितका तो सुखी होईल. भूमिसेवा पूर्ण जीवनाचे एक अनिवार्य अंग आहे. शेतीमुळे मोकळी हवा व सूर्यप्रकाश मिळतो. चांगला आरोग्य लाभ होऊन मानसिक आनंद मिळतो. शेतीतून जे जे काही उत्पादित होते ती सर्जनशील निर्मितीच असते. या निर्मितीने मिळणाऱ्या समाधानाची किंमत करता येत नाही. शिवाय बुद्धीही तीव्र होतेच. तेव्हा थोडक्यात शेती परमेश्वर सेवेचे सर्वात मोठे साधन आहे. जितक्या लोकांना पूर्ण जीवनाची संधी मिळेल तितकी समाजात शांती व समाधान नांदेल. म्हणून प्रत्येकाने कोणत्या ना कोणत्या प्रकाराने का होईना पण जमिनीशी, शेतातल्या कष्टांशी संबंध ठेवला पाहिजे.

हे सगळे याठिकाणी इतक्या सविस्तरपणाने नमूद करण्याचे कारण काय असा प्रश्न कदाचित आपल्या मनांत येईलही. कारण आता नुकतीच २००९ ची लोकसभा निवडणूक खेळून झाली आहे. निवडणूक ही लढण्यासाठी नसावी, खेळण्यासाठी असावी. लढाईत जय-विजय, मान-अपमान, वैर, शत्रुत्व, आपपरभाव व द्वेषमूलक वृत्ती असते. ती सतत वाढतच जाते. खेळात मात्र तसे नसते. जिंकण्या-हरण्याची भाषा क्षणाचीच असते. नंतर पुन्हा गळ्यात गळा असतो. असा खेळ लोकशाही निकोप करणारा असतो. पण आज जे काही चालू आहे ते पाहिल्यावर खऱ्या अर्थाने लोकशाही सुदृढ होऊन मानवी मने निकोप, निर्मळ व स्वच्छ होत आहेत असा दावा कुणालाच करता येणार नाही. एका अर्थाने माणसांमाणसात कटुता व अंतर वाढविणारी निवडणूक पार पडली आहे आणि पावसाळ्याचा हंगाम तोंडावर येऊन ठेपला आहे. शेतकऱ्यांची खरिपाच्या पेरणीची पूर्वतयारी चालू आहे. जमिनी नांगरून पडल्या आहेत. खते, बी-बियाण्याची जमवाजमव चालू आहे. शेतकरी नाविन्याच्या शोधात आहे.

पुढचा पावसाळा कसा असणार हे निश्चित माहीत नाही. तसे छातीठोकपणे कुणीही सांगू शकत नाही. कारण त्या

निसर्गाचे कुणी मालक नाही. निसर्ग हा कधी सख्या आईच्या तर कधी सावत्र आईच्या भूमिकेत असेल हे चित्र आपण नेहमीच पाहात आलो आहे. अर्थात या वर्षीचा (२००९) पावसाळा हा नेहमी सारखाच 'नॉर्मल' (९५ टक्के होईल सरासरीच्या) असेल असे भाकीत वेधशाळेने व्यक्त केलेले आहे. देशाच्या सरासरी इतका म्हणजे ९०० ते ९५० मिलीमीटर पाऊस यावर्षी पडेल असा अंदाज गेल्या ५० वर्षांच्या पावसाच्या पडण्यावरून करून त्यांनी ही सरासरी काढलेली आहे. असे असले तरीही त्या भाकितावर पूर्णपणे अवलंबून राहणे शेतकऱ्याला परवडणारे व बिनधास्त करणारे नसल्यामुळे अनेक निरनिराळ्या पर्यायांचा व उपायांचा विचार करावा लागणार आहे.

दुर्दैवाने आमचे बहुतांश पुढारी हे निव्वळ सातबारावरचे शेतकरी आहेत तर अधिकारी हे ग्रामीण पर्यटन करणारे प्रसिद्ध आरंभशूर पुस्तकी विचारवंत आहेत. याला निश्चित काही सन्माननीय अपवाद असू शकतील. पण या दोघांचेही आता नव्याने शेती शिक्षण करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. आपल्यापैकी किती राजकीय-सामाजिक कार्यकर्ते शेतात जातात, आपले पायखत त्या मातीला देतात आणि किती जण प्रत्यक्ष शेतात राबतात, घाम गाळतात, हा प्रश्न ज्याचा त्याने स्वतःला विचारलेला बरा. शेती, आपला कामधंदा सांभाळून २० टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारण करा असा आपल्याला साहेबांचा आदेश आहे. आपण अनेकजण याप्रमाणे वागत नाही ही वस्तुस्थिती आहे.

पावसाचे कमी-जास्त होणारे प्रमाण, त्याचे अनियमीत व अवेळी येणे, दोन पावसात सात दिवसांपासून ५२ दिवसांपर्यंत पडणारा खंड, त्यामुळे उगवून आलेल्या पिकांचे जळणे, नव्याने करावी लागणी फेरपेरणी या सर्व गोष्टी लक्षात घेऊन प्रत्येक शेतकऱ्याने या हंगामात आपल्याजळ दोन-तीन वेगवेगळी पर्यायी पिकांची बियाणी ताब्यात ठेवली पाहिजे. यासाठी खूप मोठा भांडवली खर्च येतो अशातला काही भाग नाही. पण त्यासाठी तयारी मात्र निश्चित करावी लागते. सात जूनला आमचा पावसाळा सुरू होतो यावर आम्ही सगळे आजपर्यंत शेतीचे गणित बसविले. आता ते परिस्थितीप्रमाणे बदलावे लागेल. ७ जूनला पाऊस आल्यावर कोणते बियाणे पेरायचे, २५ जूनला कशाची पेरणी करायची, १० जुलैला पाऊस आला तर कोणते बियाणे जमिनीत रुजवायचे आणि त्यानंतर पाऊस आला तर कशाची पाभर धरायची याची खूणगाठ मनाशी पक्की करून त्याप्रमाणे पावसाळा हाताळावा लागेल. यासाठी लागणाऱ्या बियाण्यासह सर्व व्यवस्था प्रत्येक गावाने करून ठेवल्या पाहिजेत. निव्वळ एवढ्याने भागणार नाही. यापुढील काळात एकंदरीत प्रत्येक गावाने पाऊस-पाणी मोजायला सुरुवात केली पाहिजे. त्यासाठी प्रत्येक गावात व नाल्यावर पर्जन्यमापक यंत्र वा पाणी मोजण्याची फुटपट्टी बसविली पाहिजे. १५ ऑक्टोबरला आपला पावसाळा संपतो असे आपण गृहीत धरलेले आहे. ७ जून ते १५ ऑक्टोबर या काळातला पाऊस मोजणे, तो अडविणे, मुरविणे, जिरवणे, साठवून ठेवणे वा इतरत्र वाहून नेणे यासाठीची सगळी पूर्वतयारी या उन्हाळ्यातच करावी लागेल. पाऊस सुरू झाल्यानंतर ही व्यवस्था होणार नाही. पावसाळा निसर्गाच्या हातात आहे. मात्र पावसाळ्यानंतरचे जीवन आपल्या हातात आहे. देवाचा हंगाम हा वर्षाऋतुचा आहे आणि माणसाचा हंगाम शरदऋतुचा आहे. आकाशात फार ढवळाढवळ आपल्याला करता येत नाही. मात्र, या वर्षाऋतुत पडलेले पाणी वापरून कोणती पिके शरदऋतुत घ्यायची हे कौशल्य माणसावर अवलंबून आहे. या कौशल्यात यशस्वी होऊन निपुणता मिळवायची असेल तर त्याची तयारी अगोदरच केली पाहिजे.

केंद्रीय कृषी व अन्न नागरी पुरवठामंत्री आणि आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष श्री. शरद पवार यांना या परिस्थितीची पूर्ण जाणीव आहे. शेतीतले पाण्याचे महत्त्व त्यांना महिती आहे. किंबहुना सिंचनाचा नीरा डावा व उजव्या कालव्याचा १००-१२५ वर्षांचा अनुभव, अभ्यास त्यांना अवगत आहे. सिंचनामुळे जो विकास होतो, परिसराचा चेहरामोहरा बदलतो तो त्यांनी अनुभवला आहे. म्हणूनच २१ एप्रिलला बारामती येथे लोकसभा निवडणूक प्रचाराची जी शेवटची सभा झाली त्यात पवार साहेबांनी 'यापुढील काळात अधिकाधिक जमिनीला पाणी आणि वीज पुरवठा करण्यासाठी जास्तीत जास्त निधी वापरला जाईल आणि त्याकरिता सत्ता आमच्या हाती द्या', अशा प्रकारचे सुतोवाच केले. आपण त्यांची ही तळमळ व विचारांची दिशा समजून घेऊन त्याप्रमाणे आपापल्या भागात काम उभे केले पाहिजे. बाहेरचा सरकारी ऑफीसर किंवा दुसऱ्या गावातला कोणीतरी येऊन माझ्या गावातले, नाला-ओढ्यातले पाणी अडवेल, मोजेल, साठवेल, भूगर्भात मुरवेल या भ्रमात आपण कोणीही कार्यकर्त्यांनी राहाता कामा नये. ज्ञानेश्वरीच्या चवथ्या अध्यायातील तिसऱ्या ओवीत म्हटल्याप्रमाणे :-

**कैसी आगळिक दैवाची। जे गंगा वोळली अमृताची।**
**हो का जपतपे श्रोतयांची । फळा आली ।।**

आपल्या नदी-नाले-ओढे यातून वाहणारे पाणी ही जणू गंगाच आहे असे समजून तिचा पुरेपूर, काटेकोर वापर केला पाहिजे

तरच सुखाच्या कल्पनेपर्यंत आपल्याला पोहोचता येईल.

दुर्दैवाने आपण अजून प्रत्येक गावातल्या नदी, नाले व ओढ्यावरच्या वाहून जाणाऱ्या आणि विहिरी, बारव, आड, कूपनलिका, बोअरवेल्स यात साठणाऱ्या पाण्याची मोजणी करून त्याचा हिशोब लावू शकलेलो नाही. १५ ऑक्टोबरला मोठ्या धरणात किंवा बंधारे वा तलावात जे पाणी आपण साठवितो त्यावरुन पुढच्या वर्षभराचे नियोजन केले जाते. पिण्याचे व रोजच्या वापरासाठी लागणारे पाणी, जनावरांसाठी लागणारे पाणी हे प्रथम बाजूला गृहीत धरुन उरलेल्या पाण्याचे प्राधान्यक्रमानुसार उद्योगधंदे, शेती, वीजनिर्मिती, पर्यावरण संरक्षण, मनोरंजन व इतर अन्य कारणांसाठी वाटप केले जाते. वाटपाचा हा प्राधान्यक्रम बरोबर आहे की नाही, त्यातून आपण कोणाचे हितसंबंध जपतो हा या ठिकाणी वादाचा विषय असला तरी त्याविषयी स्वतंत्रपणाने केव्हा तरी लिहावे लागेल. पण तूर्त तरी धरणातल्या पाण्याचे जसे नियोजन करतो तसे भूजलाचे व बाकी पाण्याचे व्यवस्थापन आपण अजूनही का करीत नाही न उलगडलेले कोडे आहे.

घटनेत ७३ वी दुरुस्ती करुन गावांना लागणारे पाणी हा विषय ग्रामपंचायतींकडे सुपूर्त करण्यात आला आहे. ग्रामपंचायतींनी योग्य पद्धतीने पाण्याचे व्यवस्थापन करायचे असेल आणि गावातच शेतीसाठी लागणाऱ्या बी-बियाणे, खते यांसारख्या निविष्ठा उपलब्ध वा निर्माण करायच्या असतील तर त्याचे नियोजन अगोदरपासूनच करावे लागेल. भूगर्भातील पाण्याचा प्रचंड प्रमाणात उपसा झाल्यामुळे व त्या प्रमाणात पुनर्भरण होऊ न शकल्यामुळे आणि त्यासाठी करावी लागणारी कामे व कष्ट स्थानिक गावातील लोकांनी सामुदायिक व वैयक्तिकरित्याही न केल्यामुळे भूजलाच्या नियंत्रणात आपण पूर्णपणे अपयशी ठरलो आहोत. यात एकट्या भूजलविकास यंत्रणेचा दोष आहे असे मानता येणार नाही. गावागावातील पाणलोट विकासाची कामे शास्त्रीय पद्धतीने माथा ते पायथा या तत्त्वाने करुन कार्यकर्त्यांनी श्रमदानातून व लोकांच्या सहभागातून प्राधान्याने या कामांसाठी वेळ द्यायला हवा. ग्रामपंचायतीत निवडून येणारे सदस्य व गावाचे पुढारीपण करणारी नेते मंडळी व कार्यकर्ते या सर्वांनी या भूजल व्यवस्थापनाच्या विषयात तातडीने लक्ष घालण्याची गरज आता निर्माण झाली आहे. अशीच गोष्ट बियाणे, खते यांची देखील आहे. सरकारच्या 'महाबीज' मार्फत होणारा बियाण्याचा पुरवठा हा गरजेच्या फक्त १० टक्के आहे. म्हणजे ९० टक्के बियाणे हे सरकार बाह्य यंत्रणेमधून किंवा खासगीरित्या उभे करावे लागते. ही सर्व परिस्थिती माहित असल्यामुळे गावात ग्रामसभा घेऊन अगोदरच पिक पद्धतीचे व लागणाऱ्या बियाण्याचे नियोजन वा उत्पादन करण्याची व्यवस्था निर्माण केली पाहिजे. या कामात कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा. आपले कर्तव्य काय आहे हे समजून घेऊन कार्यकर्त्यांनी गावोगावच्या लोकांना आपल्या पायावर उभे करावे. पिक पद्धतीची शिस्त पाळण्याची सवय लावून त्यागाचे प्रमाण वाढवावे. आपल्या गावाच्या उन्नतीकरिता त्याग करणे जरुर आहे असे समजावे. हे सारे गुण गावोगावी आले पाहिजेत आणि गावांना आपल्या शक्तीचे भान झाले पाहिजे तरच म. गांधींच्या स्वप्नातील 'स्वयंपूर्ण खेडी' उभी राहू शकणार आहेत. इतकेच नव्हे तर त्यातून लोकसत्ता उभी करुन आजच्या सरकारचे रुप पालटू शकणार आहोत. ही खूप मोठी व लांब पल्ल्याची दीर्घकालीन योजना असली तरीही शाश्वत व  चिरंतन टिकणारी असल्यामुळे त्या दिशेने एक-दोन पावले टाकण्याचा निर्धार व प्रयत्न गावागावातल्या लोकांनी व कार्यकर्त्यांनी केला पाहिजे.

लागवडीखाली येणाऱ्या प्रत्येक जमिनीला आणि सगळ्यांनाच सिंचनाचे पाणी देता येणे शक्य नाही. त्यामुळे अचूक अभ्यास करून किती लोकांना व जमिनीला पाणी देऊ शकू, तेवढ्यांनाच शासनाने आश्वासन दिले पाहिजे. नव्या प्रकल्पाची उभारणी करताना किती कमी पाण्यात तो प्रकल्प व राबवावयाची पीकपद्धती ही फायदेशीर ठरेल या दृष्टीने विचार व्हायला हवा. महाभारतामध्ये शेती विकासाच्या दोन विचारधारा आहेत. एक बलरामाची आणि दुसरी श्रीकृष्णाची. श्रीकृष्ण हा गवताळ जमिनींचा पुरस्कर्ता होता तर बलराम हा हलधर नांगरटीचा पुरस्कर्ता होता. हिंदुस्थानात ४० टक्के जमीन निसर्गतःच लागवडीयोग्य नाहीत. काळाच्या ओघात त्यातील काहींना सिंचन मिळाले. अर्थात त्यामुळे या जमिनीतून काही का होईना उत्पन्न मिळू शकले हे खरे असले तरी त्यासाठी द्यावी लागलेली किंमत खूप मोठी आहे हे सत्य नाकारता येणार नाही.

पावसाळ्याच्या तोंडावर आणखीन एका विषयाचा गांभीर्याने विचार व्हायला हवा तो म्हणजे जनावरांचा चारा. हा चारा नैसर्गिकरित्या पाऊस पडला की उपलब्ध होतो असे आजपर्यंत आपण मानत व पाहात आलो. त्यामुळे चांगली सकस व नवनवीन प्रकारची गवते लावून वाढविण्याचा प्रयत्न आम्ही कधीही केला नाही. अनेक गावांनी चुकीच्या पद्धतीने वापर करुन गवताळ कुरणांची व गायरानांची वाट लावलेली आहे. कित्येक गावांना तर आता गायरान देखील शिल्लक राहिलेले नाही अशी परिस्थिती आहे. ती का निर्माण झाली या खोलात मी येथे जात नाही. पण आता गरज आहे गवत

लावायला सुरुवात करण्याची. सध्या जनावरांच्या चाऱ्याची जी हाकाटी होते आहे ती गांभीर्याने पाहिल्यावर नेमके दुखणे काय आहे हे समजू शकेल. वास्तविक पावसाळ्यात दोन तीन वेळा गवत फुटते. हे गवत वेळोवेळी कापून त्याचा व्यवस्थित साठा व पुरवठा करीत गेलो तर चाऱ्याची कमतरता भासणार नाही. पण आपण जनावरे चरण्यासाठी मोकाट सोडतो. त्यांच्या तुडविण्यामुळे व खुरटण्याने गवताची पुरेपूर वाढ होत नाही. यासाठी गावांनी चराईबंदीची शिस्त पाळण्याची गरज आहे. चराई बंदी ही आदर्श गाव योजनेतील एक अट होती. आज आदर्श गाव योजना कुठेही चालू आहे असे दिसत नाही आणि ती बंद पडली असेही कुणी म्हणत नाही. थोडक्यात, आजपर्यंत आपण फक्त नांगरटीच्या शेतीकडे लक्ष दिले. आता यापुढे दुग्धोत्पादन हा महत्त्वाचा विषय बनल्यामुळे व अनेकांच्या रोजीरोटी व संसाराशी त्याचा थेट संबंध जोडला गेलेला असल्यामुळे त्याच्या वाढीकडेही लक्ष द्यावे लागणार आहे. कुठे, केव्हा व कोणत्या प्रकारचे गवत लावायचे याचे देखील एक शास्त्र आहे. ते नीट समजून घेतले पाहिजे. सपाटीला, डोंगर उतरणीवर बांधावर, लवणात, दलदलीच्या जागी, पूरप्रवण क्षेत्रात, खारवट जमिनीत, नद्यांच्या काठाने कोणती गवते चांगली वाढतात व त्याचा दूध उत्पादन वाढीवर काय परिणाम होतो याचे निरीक्षण व अभ्यास करून चांगल्या जाती वाढविल्या पाहिजेत. दुर्दैवाने गवत हा उपेक्षित राहिलेला विषय आहे. पवारसाहेबांनी देशातील दूधधंद्याला उर्जितावस्था आणण्याच्या दृष्टीने जी अनेक पाऊले टाकली आहेत त्यात गवत हाही एक विषय आहे. निव्वळ विद्यापीठांनी संशोधन करून हा विषय सुटणारा नाही. जनतेचा सहभागाही तितकाच महत्त्वाचा आहे.

मिश्र रासायनिक खतांचा २००८ मध्ये आपल्याला खूप मोठा तुटवडा जाणवला. त्यावेळी निर्माण झालेल्या खत टंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन यावर्षी खत पुरवठ्याचे एक वेगळे धोरण स्वीकारून १५ मे पूर्वी सर्व जिल्ह्यांना त्यांच्या गरजेइतके खत पाठविण्याचा तसेच तीन लाख टन खताचा 'बफर स्टॉक' करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही सुरू केली आहे. अर्थात तेवढ्याने सगळा प्रश्न सुटेल या भ्रमात राहण्याचे काही कारण नाही. मिश्र रासायनिक खतांना पूरक ठरू शकतील अशी सेंद्रीय, जैविक, हिरवळीची व जनावरांचा चारा, मलमूत्र, काडीकचरा, पालापाचोळा, साखर कारखान्यातली मळी, गांडूळ यांचा वापर करून बनविलेली खते वाढविण्याकडे आपण जास्त लक्ष केंद्रीत केले पाहिजे. गावागावात तसे खत करणारे छोटे छोटे उद्योग कसे उभे राहतील याकडे कार्यकर्त्यांनी लक्ष दिले पाहिजे.

२००९ मधला खरिपाचा हंगाम यशस्वी करायचा असेल तर केंद्रिय कृषीमंत्री म्हणून केवळ शरद पवारसाहेबांनी नियोजन करून उपयोगाचे नाही. ते तर त्यांचे काम चोखपणे व डोळ्यांत तेल घालून बजावितातच. आपण मात्र यशस्वी होण्यासाठी कष्टाची लढाई करायला तयार आहोत का? याचे उत्तर प्रत्येक कार्यकर्त्याने दिले पाहिजे. कारण शेवटी कष्टाशिवाय कोणतेही चांगले काम घडत नाही. म्हणून काही कष्ट माणसाने केले पाहिजेतच. सामान्य विद्या प्राप्त करून घ्यायलाही किती कष्ट पडतात. व्यासांनी महाभारतात म्हटले आहे की,

**'सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम ।'**

विद्या पाहिजे असेल तर सुख कसे मिळेल? विद्या प्राप्त करायलाही सुख सोडावे लागते. महाभारतात एक गोष्ट आहे. सत्यभामा आणि द्रौपदी बोलत बसल्या होत्या. सत्यभामेने विचारले, 'स्त्रियांना सुख कसे मिळेल?' द्रौपदीने उत्तर दिले, 'दुःखेन साध्वी लभते सुखानि।' साध्वीला दुःखानेच सुख मिळते. सुख मिळवायलाही काही दुःख सहन करावे लागते. श्रमाने, कष्टाने दुःख होते असे म्हणणारे अंगचोर, ढोंगी आणि दांभिक आहेत. शेतीला कष्टाचेच खत लागते. कष्टाशिवाय शेती पिकतच नाही. असे कष्ट करायला लोक तयारही आहेत. कार्यकर्त्यांचा प्रयत्न त्या कष्टांना योग्य दिशा देण्याचा व ते फलद्रूप होण्याकरिता सुकर पायवाट तयार करण्याचा असला पाहिजे.

पाणी बरसणे हे पावसाचे काम आहे. त्याचा उपयोग करून शेती करणे हे शेतकऱ्याचे काम आहे. 'कुरळ' मध्ये पहिले स्थान परमेश्वराला दिले आहे आणि दुसरे स्थान पावसाला. 'दानं, तपं, इरंडूम तंगा' म्हणजे पाऊस पडणार नाही तर दान, तप ही राहणार नाही. कारण पीक येणार नाही, मग दान कसले द्यायचे? जागतिक महामंदीचा आजचा काळ आहे. संकट भीषण आहे. पवारसाहेबांनी शेतीत केलेल्या प्रचंड कामामुळे हा देश मंदीच्या खाईतून वाचला आहे. यापुढील काळातही तो तसाच तग धरून ठेवायचा आहे. यासाठी आपल्या घामाचे, कष्टाचे व श्रमाचे पायखत जमिनीला हवे आहे. त्याकरिता ती आसुसलेली आहे.

डॉ. सुधीर भोंगळे

– डॉ. श्रीकांत परांजपे

संरक्षणविभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ



पाकिस्तानमधील वायव्य सरहद्द प्रदेशातील स्वात खोऱ्यात पाकिस्तानी लष्कर आणि तालिबान यांच्यात गेले दोन वर्ष संघर्ष चालू होता. स्वात खोऱ्यात शरियत कायदा लागू करण्यासाठी लढत असलेल्या तालीबानला अखेर त्या वर्षी एप्रिल महिन्यात यश आले. पाकिस्तानने स्वात क्षेत्रात तालीबानी व्यवस्थेच्या अधिकारात इस्लामीक व्यवस्था निर्माण करण्याचे अखेर मान्य केले. स्वात खोऱ्यावर ताबा मिळविल्यानंतर तालीबानी लढवैय्ये आता त्या शेजारील बुन्नेर क्षेत्रात स्वतःची राजवट निर्माण करण्याचे प्रयत्न करीत आहेत. तालीबानचा हा वाढता प्रभाव जो पाकिस्तानच्या वायव्य सरहद्दी क्षेत्रात जाणवतो तसेच पश्चिम सरहद्दीकडील केंद्रशासित प्रदेशात आहे, पाकिस्तानच्या राज्यव्यवस्थेसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणून पुढे आलेले दिसून येते.

पाकिस्तान या राष्ट्राची अस्मिता ही उदारवादी इस्लामिक व्यवस्थेत आहे का केवळ इस्लामिक स्वरुपाची आहे हाच तर खरा प्रश्न आहे. पाकिस्तानच्या अस्मितेविषयी भाष्य करताना माजी संसदपटू व १९७३ च्या घटनेच्या निर्मितीत सहभागी असलेले त्यावेळचे भुट्टोंचे सहकारी अहमद करुदी यांनी इस्लाम हाच पाकिस्तानच्या अस्मितेचा पाया असल्याचे म्हटले आहे. पाकिस्तानातील सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय व्यवस्था त्या संदर्भातील कायदे, पाकिस्तानचा जागतिक दृष्टीकोन हा इस्लामच्याच चौकटीत असेल हे ते ठामपणे सांगतात. मात्र ह्या इस्लामच्या चौकटीची व्याख्या कशी करावी यावर पाकिस्तानात वाद दिसून येतो. पाकिस्तानात इस्लामिक जहालवाद आणि इस्लामिक उदारमतवाद या दोन विचार प्रवाहात संघर्ष आहे. यातील जहालवादाला आज तालीबानी व्यवस्थेने ग्रासलेले दिसून येते.

पाकिस्तानच्या सुरक्षिततेला खरा धोका तर तालीबानी प्रवृत्तीचा आहे असे जनरल मुशर्रफ यांचे स्पष्ट मत होते. बजौर मध्ये असलेल्या एका मदरशातील तालीबानी गटांच्या प्रशिक्षण केंद्रावर २००६ मध्ये हल्ला करुन सुमारे ऐंशी तालीबानी दहशतवाद्यांना ठार मारण्यात आले होते. त्या घटनेचा उल्लेख करुन आपली दहशतवादाविरोधाची भूमिका जनरल मुशर्रफ यांनी मांडली. त्या भूमिकेचा सर्वात महत्त्वाचा घटक हा तालीबानी दहशतवादाविरुद्ध बलाचा वापर करण्याची गरज हा होता. तालीबानी जहालवाद हे केवळ लष्करी नाही तर वैचारिक आव्हान आहे हे ते जाणून होते आणि म्हणूनच पाकिस्तानच्या उदारमतवादी इस्लामिक व्यवस्थेला धक्का लागू नये या प्रयत्नात ते होते. पुढे इस्लामाबादमध्ये लाल मशिदीत वरील कारवाईची भूमिका घेताना हाच विचार समोर होता. त्या मशिदीचा आश्रय घेऊन जी जहाल कृत्ये केली जात होती ती थोपविण्याची गरज होती म्हणून त्या विरुद्ध देखील जोरदार कारवाई केली गेली.

स्वात, बुन्नेर आणि इतर प्रदेशातील वाढत चाललेला

डॉ. श्रीकांत परांजपे



**मुंबईवरील दहशतवादी हल्ले तसेच काश्मीरमध्ये सतत होत असलेली घुसखोरी ह्या गोष्टी पाकिस्तानी राज्यव्यवस्थेच्या आश्रयाशिवाय होऊ शकत नाहीत हे उघड आहे. पाकिस्तानला दहशतवादाचा त्रास जाणवत आहे ह्याबाबत दुमत नाही. परंतु ते राष्ट्र दहशतवादी कारवायांना भरघोस पाठिंबा देत आहे. कदाचित अप्रत्यक्षपणे दिला जात आहे. ही देखील वस्तुस्थिती आहे. पाकिस्तानमधील राज्यकर्त्यांना तसेच लष्करी नेत्यांना अशा प्रकारच्या दहशतवादाला दिलेल्या प्रोत्साहनाचे दूरगामी विपरीत परिणाम पाकिस्तानलाच भोगावे लागू शकतील याची जाणीव होणे गरजेचे आहे. वायव्य प्रांतात स्वात खोऱ्यात तालीबानी लढवय्यांनी केलेली कृत्ये ही या पुढच्या समस्यांची सुरुवात आहे. स्वात किंवा बुन्नेर मध्ये तालीबान विरुद्ध लष्करी कारवाई करणे सोपे नाही. कारण काही प्रमाणात त्यांना स्थानिक पातळीवर पाठिंबा देखील आहे.**

तालीबानचा प्रभाव, पाकिस्तानी राज्यव्यवस्थेची त्याबाबतची अनिश्‍चित अशी भूमिका, पाकिस्तानच्या लष्कराच्या विशेषतः आय एस आय चा या दहशतवादी गटांशी असलेला संबंध ह्या सर्वच घटनांचा पाकिस्तान या राष्ट्र राज्याच्या व्यवस्थेत, दक्षिण आशियायी क्षेत्रात व जागतिक पातळीवरील दहशतवादाविरुद्धच्या भूमिकेवर परिणाम होताना दिसत आहे.

## तालीबानची निर्मिती :

अफगाणिस्तानमध्ये १९९६ पासून २००१ पर्यंत तालीबानी राजवट होती. तालीबानची निर्मिती ही अफगाणिस्थानच्या सोव्हिएत रशिया विरुद्धच्या लढ्यात झाली. तो लढा लढणारे हे मुजाहिदीन होते. तालीबान हे देखील एक प्रकारचे मुजाहिदीनच आहेत. १९९२ मध्ये अफगाणिस्तानमध्ये मुजाहिदीनचे सरकार स्थापन झाले, परंतु ते अंतर्गत कलहाने ग्रासलेले होते. या मुजाहिदीन राजवटीत पाकिस्तानच्या लष्करी दलांवर हल्ले होत राहिले. त्यांच्या सुरक्षिततेसाठी पाकिस्तानने तालीबानी गटांचे सहाय्य घेण्यास सुरुवात केली. कंदाहार प्रांतातील तालिबानला हाताशी धरुन पाकिस्तानने मुजाहिदीन गटांविरोधात मोहिम उघडली आणि १९९६ मध्ये संपूर्ण अफगाणिस्थानवर तालिबानने कब्जा मिळविला.









अफगाणिस्तानमध्ये तालीबान राजवटीचे स्वागत झाले. मुजाहिदीनच्या संघर्षमय आणि भ्रष्टाचारी राजवटीला कंटाळलेली जनता शिस्तप्रिय तालीबानकडे आशेने पहात होती. तालीबानचे बहुतेक सर्व नेते पाकिस्तान मधून प्रशिक्षण घेऊन आले होते. इस्लामच्या देवबंदी विचारांना ते बांधील होते.

तालीबानी राजवटीने अफगाणिस्तानमध्ये दहशतवादी गटांना आश्रय दिला. त्यांची प्रशिक्षण केंद्रे इथे चालत असत. ओसामा बिन लादेनचा अल् कायदा गट हा असाच इथे वाढला. तालीबानच्या जहाल इस्लामिक विचार प्रवाहाला अफगाणिस्तानात तसेच पाकिस्तानकडून पाठिंबा मिळत गेला. ९/११ च्या अमेरिकेवरील हल्ल्यानंतर तालीबान राजवटीवर बिनलादेनला अमेरिकेस सुपूर्द करण्याबाबत दबाव आला. पुढे अफगाणिस्तानवर आक्रमण करुन तालीबानी राजवट नष्ट केली गेली आणि २००१ च्या शेवटास अफगाणिस्तानमध्ये कारझाई यांचे नवीन सरकार स्थापन झाले.

२००५-२००६ मध्ये तालीबानने पुन्हा आक्रमक पवित्रा घेण्यास सुरुवात केली. सप्टेंबर २००६ मध्ये पाकिस्तानी तालीबान म्हणविणाऱ्या सात दहशतवादी गटांबरोबर जनरल मुशर्रफ यांनी समझोता केला. ह्या समझोत्यानुसार बलुचिस्तानमधील सरहद्दी प्रदेशातून पाकिस्तानी सैन्य माघारी घेण्यात येणार होते, तसेच



## तालिबानी कारवाया



तालीबान त्यांच्या पद्धतीची राजवट अंमलात आणणार होते. असे करताना तालीबानने पाकिस्तान तसेच अफगाणिस्तान मधील हल्ले थांबविणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात तसे झाले नाही आणि म्हणूनच ऑक्टोबर २००६ च्या शेवटास बजौरवर हल्ला करुन पाकिस्तानने तालीबानविरुद्ध पुन्हा युद्ध पुकारले. जुलै २००७ मध्ये इस्लामाबाद येथील लाल मशीदीवरील कारवाई याचाच भाग होता. २००७ व २००८ मध्ये तालीबानी गटांविरुद्ध कारवाई केली जात होती. पाकिस्तानने बजौर क्षेत्रात ही कारवाई केल्याचे दाखले आहेत. मात्र वायव्य सरहद्दीच्या क्षेत्रात मात्र तालीबानचा जोर कायम आहे. स्वात खोऱ्यातील घटना व बुन्नैरमध्ये चालू असलेले संघर्ष ह्या तालीबानच्या वाढत्या प्रभावाचे उदाहरण आहे.

## पाकिस्तान

तालीबान विरुद्धच्या कारवाईची मुख्य जबाबदारी ही लष्करी असली तरी राजकीय पक्षांच्या भूमिकेत तितक्याच महत्वाच्या आहेत. पाकिस्तानी लष्कराने, विशेषतः आय एस आय ने इस्लामिक दहशतवादी गटांचा सातत्याने वापर केला आहे. हा वापर पाकिस्तानच्या काश्मिर संदर्भातील धोरणात सातत्याने केलेला दिसून येतो. त्याच बरोबर दहशतवादी गटांना प्रशिक्षणासाठी लागणारी मदत लष्कराकडून मिळत असलेल्या अनेक बातम्या येत असतात. अल कायदा सारख्या संघटनेची प्रशिक्षण केंद्रे पाकिस्तानात आहेत. लंडन येथील बॉंब हल्ल्याबाबत देखील त्या दहशतवाद्यांनी पाकिस्तानात प्रशिक्षण घेतल्याने दाखले आहेत.

पाकिस्तानच्या राजकारणात तीन प्रमुख घटक आहेत. लष्कर त्यात आय एस आय चा समावेश होतो. राजकीय पक्ष आणि गट आणि इस्लामिक संघटना. त्याच बरोबरीने पाकिस्तानातील वेगवेगळे प्रांत आपल्या स्वतंत्र अस्मिता आणि संस्कृती सांभाळून आहेत. त्यात बलुचिस्तान आणि वायव्य सरहद्द प्रांत ही प्रामुख्याने ट्रायबल क्षेत्र आहेत. पंजाब मध्ये सरंजामशाही वातावरण दिसते आणि सिंधमध्ये त्यातल्या त्यात उदारमतवादी दृष्टीकोन आहे. पाकिस्तानी राजकारणात लष्कराचे महत्व कधीच नाकारता येत नाही. राजकीय संस्था,त्यात पक्ष, संसद इत्यादी सर्वच संस्था येतात. जेव्हा अंतर्गत



संघर्षाचे व्यवस्थापन करु शकत नाहीत तेव्हा लष्कर राजकीय स्थैर्य निर्माण करण्यासाठी पुढाकार घेते. पाकिस्तानात राजकीय स्थैर्य हे नेहमीच लष्कराने निर्माण केलेले दिसून येते. राजकीय पक्षांमधील आपसातील वाद, विशेषतः बेनझीर भुट्टो, (आता झरदारी) आणि नवाझ शरीफ यांच्या पक्षातील वादाने आज देखील पाकिस्तानमध्ये अस्थैर्य आहे. आणि म्हणूनच आज देखील लष्कर प्रमुखांची भूमिका महत्वाची ठरते.

पाकिस्तानात इस्लामिक गटांनी नेहमीच सत्ताधिकाऱ्यांना साथ दिली आहे. त्याच प्रमाणे सत्ताधिकाऱ्यांनी देखील ह्या इस्लामिक गटांचा राजकीय अधिमान्यता मिळविण्यासाठी वापर केला आहे. पाकिस्तानातील राजकीय शिष्टजन व राजकीय नेतृत्व आणि इस्लामिक जहाल गट यांच्यातील संबंधांचे वर्णन हे सहजीवनाचे असल्याचे केले जाते. हे सहजीवन शांततामय किंवा मैत्रीपूर्ण नसून त्यात परस्परांबाबत शंका असलेले असते. प्रत्येक जण दुसऱ्याचा वापर करतो, सत्ताधिकारी दहशतवादी गटांचा त्यांच्या कार्यासाठी वापर करतात. ते काश्मिर मध्ये असते किंवा अफगाणिस्तानमध्ये. तर दहशतवादी गटांना सुरक्षित स्थान मिळण्यासाठी ते राजकीय व्यवस्थेबरोबर संधान साधत असतात.

आज वायव्य प्रदेशात स्वात आणि बुन्नेर मध्ये जो संघर्ष सुरु आहे हा अशाच प्रकारच्या संबंधांचा एक भाग आहे. स्वातमध्ये शरियत कायदा लागू करण्यासंदर्भात राष्ट्राध्यक्ष झरदारी यांनी संसदेचा होकार घेऊन मान्यता दिली. तेथे तालीबानी व्यवस्था निर्माण करण्यालाच ही मान्यता होती. पुढे तालीबानी नेतृत्वाने बुन्नेरवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यात काही प्रमाणात त्यांना यश आलेले दिसून येते. आता पुन्हा लष्कर तैनात करुन त्या विरुद्ध लढण्याची तयारी सुरु झालेली दिसून येते. वायव्य क्षेत्रात इस्लामिक व्यवस्थेबाबत विरोध नाही, पारंपारिक इस्लामिक व्यवस्था तेथे पूर्वीपासूनच आहे. तेथे विरोध आहे तो तालिबानी अतिरेकीपणाला.

त्या तालीबानच्या वाढत्या आक्रमक धोरणाबाबतची नवीन चिंता ही पाकिस्तानच्या आण्विक गरजांसंदर्भात आहे. इस्लामाबाद पासून जवळच असलेला पाकिस्तानचा आण्विक तळ हा तालीबानी सत्तेच्या नजरेत येतो आहे ही नवीन भीती पाकिस्तानात व्यक्त केली जाते. ही भीति केवळ पाकिस्तानात नाही तर ती अमेरिकेत जाणवते.

# अमेरिका

अमेरिकेत ओबामा यांचे सरकार सत्तेवर आल्यानंतर अफगाणिस्तान-पाकिस्तानबाबत धोरणात काही बदल होणे अपेक्षित होते. ओबामा यांनी अफगाणिस्तान-पाकिस्तान संदर्भात अभ्यास करण्यासाठी रिचर्ड होलब्रुक यांची नेमणूक केली. ह्या क्षेत्रातील धोरण कशा प्रकारे आखता येईल ह्याचा अभ्यास होलब्रुक करणार आहेत. त्यांनी अफगाणिस्तान, पाकिस्तान तसेच भारताचा दौरा केला. आपले कार्यक्षेत्र हे तसे व्यापक आहे, अफगाणिस्तान व पाकिस्तान बाबत विचार करताना मध्य आशिया तसेच दक्षिण आशियाचा विचार करावा लागेल हे त्यांनी स्पष्ट केले आहे.



*रिचर्ड होलब्रुक व असिफ झरदारी.*



*पंतप्रधान गिलानी व हिलरी क्लिंटन.*

ह्या क्षेत्रात अमेरिकेला खरा धोका जाणवतो तो वाढत्या जिहादी दहशतवादाचा. त्याचे केंद्र हे अफगाणिस्तान पाकिस्तानात आहे. अफगाणिस्तानमध्ये गेले काही वर्ष एनएटीओ च्या फौजा तैनात आहेत. त्यांना म्हणावे तसे यश येत नाही. अफगाणिस्तानाचे राष्ट्राध्यक्ष कारझाई यांना मर्यादित स्वरुपाची मान्यता आहे. येथे तालीबानी सैन्य जोर धरीत आहे. त्यांना पाकिस्तानातून मोठ्या प्रमाणात मदत होताना दिसून येते. पाकिस्तानला दहशतवादी कारवायांविरुद्ध उभे राहाण्याची गरज आहे. पाकिस्तान हा जिहादी तालीबान विरुद्ध कारवाई करण्यासाठी तेथील राजकीय व्यवस्था स्थिर असणे गरजेचे आहे. तसेच पाकिस्तानी लष्कराला तालीबान विरुद्ध कारवाई करण्यासाठी योग्य ती मदत मिळणे गरजेचे आहे. रिचर्ड होलब्रुक यांचे हे विश्लेषण अमेरिकन धोरणाचा पाया आहे.

आज ओबामा यांनी पाकिस्तानला आर्थिक तसेच लष्करी मदत करण्याची योजना आखली आहे त्याची ही पार्श्वभूमी आहे. कारण पाकिस्तानात राजकीय-आर्थिक स्थैर्य निर्माण केले, तेथे लोकशाही व्यवस्था स्थिर झाली तर पाकिस्तान दहशतवादाला मदत करणार नाही ही अमेरिकेची धारणा आहे. हे करीत असताना पाकिस्तानी लष्कराचे जिहादी गटांशी असलेल्या घनिष्ट संबंधांकडे डोळेझाक केली जाते. तसेच पाकिस्तानमधील लष्कराची जी मानसिकता आहे त्याकडे देखील दुर्लक्ष केले जाते.

*जॉर्ज बुश व परवेझ मुशर्रफ*





*बराक ओबामा व असिफ झरदारी*

अमेरिकेच्या त्या धोरणाचा एक महत्वाचा भाग भारताशी संबंधित आहे. पाकिस्तानमध्ये राजकीय स्थैर्य निर्माण करण्यासाठी, तसेच तेथील लष्कराला दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी मोकळे करण्यासाठी  पाकिस्तान-भारत दरम्यानचा तणाव कमी होणे गरजेचे आहे असे ओबामा मानतात. साहजिकच त्यांचा रोख हा काश्मीर बाबत आहे. भारताने पाकिस्तानशी बोलणी करुन संबंध सामान्य केले पाहिजेत. त्यासाठी अमेरिका मदत करण्यास तयार आहे हे ओबामा सरकारचे धोरण दिसते. हे धोरण म्हणजे आपण पुन्हा क्लिंटन यांच्या काळात जात आहोत. जॉर्ज बुश यांच्या काळात अमेरिकेने भारत-पाकिस्तान दरम्यानच्या राजकीय संबंधात हस्तक्षेप करण्याचे नाकारले होते. त्या दोन्ही राष्ट्रांनी आपआपले प्रश्न द्वीपक्षीय पातळीवर सोडवावेत ही त्यांची भूमिका होती. आज त्या प्रश्नांमध्ये अमेरिका पुन्हा हस्तक्षेप करू पाहत आहे असे चित्र दिसत आहे.

## भारत

मुंबईवरील दहशतवादी हल्ले तसेच काश्मीरमध्ये सतत होत असलेली घुसखोरी ह्या गोष्टी पाकिस्तानी राज्यव्यवस्थेच्या आश्रयाशिवाय होऊ शकत नाहीत हे उघड आहे. पाकिस्तानला दहशतवादाचा त्रास जाणवत आहे ह्याबाबत दुमत नाही. परंतु ते राष्ट्र दहशतवादी कारवायांना भरघोस पाठिंबा देत आहे. कदाचित अप्रत्यक्षपणे दिला जात आहे. ही देखील वस्तुस्थिती आहे. पाकिस्तानमधील राज्यकर्त्यांना तसेच लष्करी नेत्यांना अशा प्रकारच्या दहशतवादाला दिलेल्या प्रोत्साहनाचे दूरगामी विपरीत परिणाम पाकिस्तानलाच भोगावे लागू शकतील याची जाणीव होणे गरजेचे आहे. वायव्य प्रांतात स्वात खोऱ्यात तालीबानी लढवय्यांनी केलेली कृत्ये ही या पुढच्या समस्यांची सुरुवात आहे. स्वात किंवा बुन्नेर मध्ये तालीबान विरुद्ध लष्करी कारवाई करणे सोपे नाही. कारण काही प्रमाणात त्यांना स्थानिक पातळीवर पाठिंबा देखील



आहे.

तालीबानी प्रवृत्तीविरुद्धचा लढा हा लष्करी लढा असू शकत नाही हे आता अमेरिका देखील जाणून आहे.





*प्रणव मुकर्जी व ए. के. अॅन्टनी.*

अफगाणिस्तानमध्ये एनएटीओ ला जे यश मिळत नाही त्याची कारणे लष्करी नाहीत. ती त्या तालीबानी व्यवस्थेने निर्माण केलेल्या मानसिकतेत आहेत. गेली अनेक दशके अविकसित राहिलेल्या, संघर्ष व भ्रष्टाचारात बुडलेल्या आणि टोळ्यांच्या युद्धात अडकलेल्या ह्या अफगाणिस्तान पाकिस्तानच्या सरहद्दी प्रदेशात तालीबानी व्यवस्थेने नवीन शिस्त आणली. त्यांनी देखील व्यक्तींची मने पेटविली आहेत. तालीबानी दहशतवादी प्रवृत्ती ही मानसिक स्वरुपाची आहे. म्हणूनच एके काळी जनरल मुशर्रफ म्हणत होते की परप्रांतातला खरा धोका हा तालीबानी प्रवृत्तीपासून आहे तो तालीबानी लष्करी कारवाईचा नाही, तो त्या मानसिकतेचा आहे. अशा धोक्याला सामोरे जाताना लष्करी उपाययोजना अपुऱ्या पडतात. त्या तालीबानी विचार प्रवाहाला तितक्याच प्रबळ विचार प्रवाहाने सामोरे जावे लागते. अमेरिकेच्या मते तो प्रतिविचारप्रवाह हा लोकशाही मूल्यांमध्ये दिसून येतो, म्हणून अमेरिका इराक, इराण,



*डॉ. मनमोहन सिंग आणि पी. चिदंबरम्.*

अफगाणिस्तान किंवा पाकिस्तानमध्ये लोकशाही रुजविणाऱ्या गरजेची भाषा करते. परंतु लोकशाही व्यवस्था ही इस्लाम विरुद्ध असल्याचे तालीबानी नेते सांगतात.

आज भारतासमोरील आव्हान त्याच स्वरुपाचे आहे. पाकिस्तानमधील राज्यव्यवस्था स्थिर होणे भारताच्या हिताचे आहे. कोणत्याही स्वरुपाचे शासन असले तरी राजकीय स्थैर्य असावे हे आवश्यक आहे. पाकिस्तान फुटण्याची शक्यता आहे का ? आणि तसे झाल्यास भारताला फायदा होईल का असे प्रश्न नेहमीच पुढे येतात. पारंपारिक विचार असे सांगतो की पाकिस्तानात राष्ट्रीय एकात्मता आणि स्थैर्य असणे भारताच्या हिताचे आहे. कारण पाकिस्तानात फुटीरवादी प्रवृत्ती निर्माण झाल्यास भारताला त्याचा धोका संभवतो. मात्र आज बलुचिस्तान आणि वायव्य सरहद्द प्रांतांची परिस्थिती बघता त्या क्षेत्रातील अस्थिरता पाकिस्तानला कोणत्या दिशेने नेईल हे सांगता येत नाही. ह्या क्षेत्रात ट्रायबल हितसंबंध हे राष्ट्रीय भावनांपेक्षा दृढ आहेत. केवळ धर्माच्या आधारे इथे ऐक्य येणे कठीण आहे. स्वतःच्या घटनांनी पाकिस्तानच्या सरकारच्या मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. अफगाणिस्तानच्या सरहद्दी प्रदेशात कारझाई सरकारच्या मर्यादा तितक्याच स्पष्टपणे दिसून येतात. पाकिस्तान-अफगाणिस्तानमधील घटना पडसाद हे संपूर्ण दक्षिण आशियावर पडण्याची शक्यता आहे. भारताला ह्या आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी करणे गरजेचे आहे. कारण हे आव्हान केवळ कारगील किंवा मुंबई सारख्या घटनांपुरते मर्यादित असणार नाही तर ते दक्षिण आशियाई व्यवस्थेला आव्हान असणार आहे.

■■■




# हवामान बदलाचे संशोधन



**हवामानातील बदलांमुळे होणारे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी सखोल संशोधन होण्याची आवश्यकता आहे. ही गरज लक्षात घेऊन केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार यांनी राष्ट्रीय पातळीवरील 'अजैविक ताण व्यवस्थापन' संशोधन संस्थ बारामतीजवळील माळेगाव येथे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या संस्थेचा भूमीपूजन समारंभ नुकताच संपन्न झाला. त्याप्रसंगी श्री. शरद पवार यांनी केलेले हे भाषण.**

हवामानातील बदलांमुळे पिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी सखोल संशोधन करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील ‘अजैविक ताण व्यवस्थापन संशोधन संस्था बारामतीनजिक माळेगाव येथे होणार आहे. शेतकऱ्यांना वरदान ठरणाऱ्या या महत्वाच्या संस्थेची उभारणी आपण येथे जाणीवपूर्वक करीत आहोत.



अतिवृष्टीमुळे राज्यातील अनेक भागात कहर, मात्र पिकांना कोणतेही नुकसान नाही...पावसाचे पाणी उसात साचून राहिल्याने शेतकऱ्यांची तारांबळ, मात्र उसाच्या उताऱ्यावर व टनेजवर अजिबात परिणाम होणार नाही...हिवाळ्यातही उष्णतेची लाट आल्याने शेतकऱ्याची लाही लाही मात्र गव्हाचे उत्पादन नेहमीप्रमाणेच होणार....ढगाळ हवामानाचा परिणाम द्राक्षावर अजिबात जाणवणार नाही....नुकसानीमुळे पिकांच्या पंचनाम्याची संकल्पना कालबाह्य झाल्याने शासनाने नवीन धोरण आखले...अचानक आलेल्या पावसाने भाजीपाल्याच्या पिकात पाणी पाणी मात्र भाजीपाल्यावर त्याचा कोणताही परिणाम नाही.... अशा बातम्यांची शीर्षके काही काळानंतर वर्तमानपत्रात झळकू लागली तर?.... शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा आज जरी कल्पनाविलास वाटत असला तरी येत्या दशकात अशा स्वरूपाच्या बातम्या वृत्तपत्रातून आल्या तर नवल वाटायला नको, अशीच आजची परिस्थिती आहे.



आज सर्वच क्षेत्रातील तंत्रज्ञान व होणारे संशोधन एवढे गतीमान आहे की त्याचा वेग पाहता वर उल्लेखलेली शीर्षके ही निश्चितपणाने प्रत्यक्षात उतरणार आहेत. ज्या लहरी हवामानावर भारतीय शेती आजपर्यंत अवलंबून होती त्या लहरी हवामानावर मात करण्याचा महत्वाकांक्षी प्रयत्न आपले बुध्दीमान व कुशाग्र शास्त्रज्ञ करणार आहेत. केवळ भारतच नाही तर जागतिक पातळीवर एक ‘मैलाचा दगडम ठरावा व अखिल मानव जातीला मोठा दिलासा मिळावा अशा स्वरूपाचे सखोल संशोधन भारतीय राष्ट्रीय कृषी अनुसंधान परिषदेच्या वतीने होणार आहे. त्यातही जगाला दिशादर्शक ठरेल असे हे संशोधन महाराष्ट्रात व पुणे






जिल्ह्याच्या बारामतीत होणार ही बाब अभिमानास्पद व उल्लेखनीय म्हणावी लागेल.

'ग्लोबल वार्मिंगम हा शब्द एव्हाना सर्वपरिचित व जगमान्य झाला आहे. उन्हाळ्यात पाऊस, हिवाळ्यात उकाडा व पावसाळ्यात पाऊस गायब होणे या बाबी म्हणजे पर्यावरणात झपाट्याने होत असलेल्या मानवी जीवनाच्या दृष्टीने प्रतिकूल परिणामांच्या दर्शक म्हणाव्या लागतील. हा विषय गंभीर असून त्याचा महाकाय राक्षस होण्याअगोदरच त्या बाबत उपाययोजना सुरू कराव्या लागणार आहेत. जागतिक पातळीवरही या विषयांचे गांभीर्य व त्या बाबत सुरु असलेल्या उपाययोजनांची माहिती घेऊन आम्ही राष्ट्रीय पातळीवर वीरप्पा मोईली यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नियुक्त केली. या विषयाचा सर्वांगीण अभ्यास या समितीने केल्यानंतर या विषयात तातडीने संशोधन सुरू करण्याची गरज अहवालात नमूद करण्यात आली. जैविक बदलांपेक्षाही अजैविक स्वरूपाचा बदल हा अधिक धोकादायक आहे. हा बदल मानवी शक्तीपलिकडील असल्याने या मुळे होणारे नुकसान पाहणे व सहन करणे या पलीकडे सध्यातरी शेतकरी काहीच करू शकत नाही.

हवामानातील बदल ही जागतिक वस्तुस्थिती आहे. हे बदल होत असल्याचे ठोस पुरावे संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतर सरकारी पॅनेलतर्फे तयार करण्यात आलेल्या ताज्या अहवालात नमूद करण्यात आले आहेत. त्यानुसार, आगामी शंभर वर्षांत हवेचे सरासरी तापमान १.८४ डिग्री सेल्सिअसने वाढणार असून, त्याचता धान्योत्पादन व शेतकऱ्यांचे एकूणच जीवनमान यावर परिणाम होणे अटळ आहे. 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे सध्याचे ताणतणाव वाढण्याची शक्यता असून, धान्योत्पादनातील अनिश्चितताही वाढीस लागू शकते. आयपीसीसीचा ताजा अहवाल आणि अन्य जागतिक संस्थांच्या निष्कर्षानुसार, तापमानातील वाढीमुळे या शतकाअखेर भारतातील धान्योत्पादन १० ते ४० टक्क्यांनी घटण्याचा धोका आहे ही अत्यंत चिंतेची बाब असून आपण त्याची गांभीर्याने दखल घेणे जरुरीचे आहे. उष्णतेच्या लाटा, महापूर आणि दुष्काळ हे सारे 'ग्लोबल वॉर्मिंग'चेच परिणाम असून, राष्ट्रीय अन्न सुरक्षेस निर्माण होत असलेला नवा धोका म्हणूनच त्याकडे पाहावे लागेल. या संकटांचा जागतिक अर्थव्यवस्थेस बसणारा फटका तर जबर आहेच, परंतु आपली अर्थव्यवस्था शेतीवर अधिक प्रमाणात अवलंबून असल्याने आपल्यावर अधिक विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. सध्याच्या अंदाजानुसार, २०२० साली अन्नधान्याची जागतिक गरज उपलब्ध धान्यसाठ्यांपेक्षा किमान ३० टक्के तरी अधिक राहील. ती भागविण्याचे काम आपल्याला सध्या लागवडीखाली असलेल्या किंवा घटत चाललेल्या जमिनीवर उत्पादन वाढवूनच पूर्ण करावे लागणार आहे. दारिद्र्याचे निर्मूलन आणि अन्नसुरक्षा ही या २१ व्या शतकातील आपल्यापुढील सर्वात मोठी आव्हाने आहेत. आता धान्योत्पादनाची वाढीव उद्दिष्टे गाठण्यासाठी आपल्याला ती धोरणात्मक पावले तातडीने उचलावी लागणार आहेत.

■■■



# डॉ. विजयाताई पाटील : बांधिलकी चिकाटी व कष्टाचा आदर्श

**- शरद पवार**





**मुंबईतील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ आणि ज्येष्ठ काँग्रेस कार्यकर्त्या डॉ. विजयाताई पाटील यांचे नुकतेच अपघाती निधन झाले. त्यानिमित्त आयोजित केलेल्या श्रद्धांजली सभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शरद पवार यांनी कै. विजयाताई पाटील यांना अर्पण केलेली ही श्रद्धांजली.**

खरे म्हटले तर १०-१५ दिवसांपूर्वीच मी गोव्याला गेलो होतो. निवडणुकीची धामधूम होती. दूरदर्शनवर जाऊन भाषण करावयाचे होते. भाषणासंबंधीचा मसुदा मुंबईतच होता. तो बघून दुरुस्त करणे आवश्यक होते. हे काम डॉ. विजयाताई पाटील यांच्यावर सोपविण्यात आले होते. भाषणाचा मसुदा माझ्या हातात वेळेत कसा पोहोचेल यासाठी त्या अस्वस्थ होत्या. मसुदा जेव्हा माझ्या हातात आला तेव्हा त्यात कानामात्रा कशाचीही चूक नव्हती. राजकीय सद्यस्थितीचे अत्यंत उत्तम चित्रण त्या भाषणात त्यांनी उभे केले होते. ही सगळी धडपड विजयाताईंची होती. लहानसे हातात घेतलेले कामही नेटके व्हावे यावर त्यांचा कटाक्ष होता. १९६७-६८ साली शितळादेवी टेम्पलच्या परिसरात वसंतदादा पाटील यांच्या घरी गेलो असता विजयाताईंशी ओळख दादांनी करून दिली. गजाननराव पाटलांची ही मुलगी आहे असे ते म्हणाले. वैद्यकीय शिक्षण करावे अशी तिची इच्छा आहे, असेही त्यांनी त्यावेळी सांगितले.

झोकून देऊन काम करण्यासंबंधीची त्यांची आवड आम्ही बरीच वर्षे दूरून व जवळूनही पाहात होतो. बाळासाहेब देसाईंच्या अत्यंत जवळ असणारे व सातारा परिसरात नावलौकिक मिळविलेले असे हे कुटुंब. सार्वजनिक जीवनाशी गोडी त्यांना लहानपणापासूनच होती. सामाजिक दृष्टिकोन ठेवून व समन्वय साधत सर्वांना बरोबर घेऊन जाऊन काम करण्याची त्यांची भूमिका असल्यामुळे त्या कार्यकर्त्यांमध्ये लोकप्रिय होत्या.

**(पुढील मजकूर पान क्र. ६३ वर)**



# यंदाचा पावसाळा सर्वसाधारण

## हवामान विषयक दीर्घकालीन भाकित
## २००९ सालचा वेधशाळेने व्यक्त केलेला अंदाज

**नैऋत्य मोसमी पावसाचे प्रमाण**

संपूर्ण देशभरात पडणाऱ्या नैऋत्य मोसमी पावसासंदर्भातील भाकित भारतीय हवामान खाते सामान्यतः दोन टप्प्यांत करते. त्यापैकी पहिला टप्पा एप्रिल महिन्यात पूर्ण केला जातो. तेव्हा जून ते सप्टेंबर या काळातील पर्जन्यमानाचे भाकित केले जाते तर दुसऱ्या टप्प्यात जूनमध्ये त्याचा पाठपुरावा (आयडेटिंग) करण्यात येतो.

२००७-२००८ या गेल्या दोन वर्षांत ही भाकिते करताना



कडक उन्हाळा सुरू झाला की लगेचच शेतकऱ्यांना पावसाळ्याचे वेध चालू होतात. खरीप हंगामाची पूर्वतयारी सुरू करीत असताना त्याला सतत एका प्रश्नाने चिंताग्रस्त केलेले असते तो म्हणजे यावर्षी पाऊस कसा, कधी आणि किती होईल? या प्रश्नाचे उत्तर वेधशाळेने नुकतेच दिले असून पहिला अंदाज त्यांनी जो व्यक्त केला आहे त्यात २००९ चा पावसाळा सर्वसाधारण (नॉर्मल) म्हणजे सरासरीच्या ९५ टक्के असेल असे भाकीत केले आहे. शेतकऱ्यांना प्रचंड दिलासा व पेरणीसाठी प्रोत्साहन देणारा असा हा अंदाज आहे. बघूया तो खरा किती होतो ते?

हवामान खात्याने पुढील सांख्यिकी प्रारुपांचा (स्टॅटॅस्टिकल मॉडेल्स) अवलंब केला.

अ) ए ५ – पॅरामीटर प्रारुप – एप्रिल महिन्यात जाहीर केल्या जाणाऱ्या भाकितांसाठी मार्च पर्यंतच्या पावसाची आकडेवारी संकलित करणे

ब) ए ६ – पॅरामीटर प्रारुप – पहिल्या टप्प्यातील भाकिताचा पाठपुरावा जून महिन्यात करण्यासाठी मे पर्यंतच्या पावसाची आकडेवारी विचारात घेणे.

आता २००९ सालातील नैऋत्य मोसमी पावसासंबंधातील भाकिते व्यक्त करतांना याच प्रारुपांचा अवलंब केला जात आहे. या प्रारुपांआधारे गतवर्षी केली गेलेली पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील भाकिते शंभर टक्के अचूक ठरली आहेत. तर दीर्घकालीन पर्जन्यमान सरासरी संदर्भात ही भाकिते ९८ टक्के अचूक असल्याचे अनुभवास आले.

यंदा पहिल्या टप्प्यातील (एप्रिल मधील) भाकितांसाठी पुढील पाच अनुमाने वापरली गेली. त्यात सामान्यतः पाच टक्के अधिक उणे होऊ शकते.

| क्र. | अनुमानके | काळ |
|---|---|---|
| १ | उत्तर अटलांटिक समुद्राच्या पाण्याचे तापमान | डिसेंबर + जानेवारी |
| २ | दक्षिण हिंदी महासागराच्या पाण्याचे तापमान | फेब्रुवारी + मार्च |
| ३) | पूर्व आशियातील सागरी पातळीचा दाब | फेब्रुवारी + मार्च |
| ४) | वायव्य युरोपातील भूपृष्ठाचे तापमान | जानेवारी |
| ५) | विषुववृत्तीय पॅसिफिक महासागरातील गरम पाण्याचे प्रमाण | फेब्रुवारी + मार्च |

## प्रायोगिक भाकिते

हवामान खात्याची दीर्घकालीन भाकितक्षमता वाढविण्याच्या व सुधारण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून २००९ च्या नैऋत्य मोसमी पावसासंबंधीच्या भाकित व्यवस्थेत प्रायोगिक भाकितांचाही अंतर्भाव केला गेलेला आहे. त्यासाठी मार्च महिन्यातील सागरी तापमानाची आकडेवारी वापरण्यात आली.



याखेरीज पुण्यातील नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ ट्रॉपिकल मेट्रॉलॉजी, बंगळूर येथील इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स, अहमदाबादचे स्पेस ॲप्लिकेशन्स सेंटर, बंगळूरची नॅशनल एरोस्पेस लॅबोरेटरीज व सेंटर फॉर मॅथॅमॅटिकल मॉडेलिंग अँड कॉम्प्युटर सिम्युलेशन आणि नोइडाचे नॅशनल सेंटर फॉर मिडियम रेंज वेदर फोरकास्टिंग आदि संस्थांनी केलेली प्रायोगिक भाकितेही यावेळी भारतीय हवामान खात्याने विचारात घेतली आहेत.

अमेरिकेतील नॅशनल सेंटर फॉर इनव्हायरनमेंटल प्रिडीक्शन व इंटरनॅशनल रिसर्च इन्स्टिट्युट फॉर क्यायमेंट ॲण्ड सोसायटी, ब्रिटनचे मेटिरॉलॉजिकल ऑफिस व युरोपियन सेंटर फॉर मिडियम रेंज वेदर फोरकास्टस आणि वर्ल्ड मेटिरॉलॉजिकल ऑर्गनायझेशन आदि आंतरराष्ट्रीय संस्थांनी केलेल्या प्रायोगिक भाकितांचाही आधार नैऋत्य मोसमी पावसाविषयीच्या भाकितांसाठी घेण्यात आला आहे.

## पर्जन्यमानाचे भाकित

**जून ते सप्टेंबर २००९ या काळात भारतात सर्वसाधारणतः सर्वदूर नेहमीप्रमाणे पर्जन्यवृष्टी (निअर नॉर्मल) होईल. आकड्यांच्या भाषेत सांगायचे झाले तर दीर्घकालीन सरासरीच्या ९६ टक्के एवढा पाऊस यंदा अपेक्षित आहे. या भाकितात पाय टक्के अधिक–उणे होऊ शकते. १९४१ ते १९९० या काळात संपूर्ण देशभरातील पावसाची एकूण दीर्घकालीन सरासरी ८९ सेंटीमीटर एवढी राहिली.** उपरनिर्दिष्ट भाकिताचा दुसरा टप्पा जून २००९ मध्ये जाहीर करण्यात येईल. त्यावेळी जुलै व ऑगस्ट मध्ये देशात सर्वत्र अपेक्षित असलेल्या पावसासंबंधीचे भाकित आणि जून ते सप्टेंबर या काळात देशाच्या चार भौगोलिक विभागांत (रिजन्स) होऊ घातलेल्या मोसमी पावसासंबंधीचे भाकितही स्वतंत्ररित्या देण्यात येईल.

■■■



# ज्ञान आयोगाच्या शिफारशींकडे दुर्लक्ष



– डॉ. अशोक कोळस्कर

माजी कुलगुरू, पुणे विद्यापीठ
व सल्लागार, राष्ट्रीय ज्ञान आयोग

**ज्ञान आयोग म्हणजे शिक्षणावरील आयोग असा एक चुकीचा समज समाजात पसरला. त्यामुळे ज्ञान आयोगाने केलेल्या इतर महत्वाच्या शिफारशींचा ज्या प्रकारे विचार होऊन त्याची अंमलबजावणी व्हावयास पाहिजे त्याप्रमाणे ती झालेली दिसत नाही व त्याला तेवढे महत्वही देण्यात आले नाही.**

आज सर्व जग आर्थिक मंदीमुळे एका मोठया संकटात सापडले आहे. जगातले प्रगत देश मग ते अमेरीका, युरोप, इंग्लंड जपान, फ्रान्स असो या सर्व देशांमध्ये आर्थिक मंदी अधिक प्रमाणात दिसून येते. त्यामुळे येथील परिस्थिती फारच बिकट झालेली आहे. या आर्थिक मंदीची अनेक कारणे व त्यावर मात कशी करावी याचा उहापोह अनेक लेखांमधून व भाषणांतून वेगवेगळया तज्ञांनी केलेला आहे. परंतु एका गोष्टीकडे थोडेफार दुर्लक्ष झाले आहे ते म्हणजे आज जग औद्योगिक अर्थव्यवस्थेकडून ज्ञानयुगाकडे व ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेकडे जात आहे. अर्थातच ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था व ज्ञाननिष्ठित समाज हे पुर्वीच्या समाजापेक्षा व औद्योगिक अर्थव्यवस्थेपेक्षा अतिशय वेगळे आहेत. याचा उमज मोठमोठया राजकारणी, उच्चस्तरीय प्रशासकीय अधिकारी, अर्थशास्त्रज्ञ आणि समाजातील इतर व्यक्ती यांना सुध्दा पुर्णपणे झालेला नाही. एका दृष्टीने जागतिक मंदी ही त्यातलेच एक महत्वाचे कारण आहे असे म्हटले तर दुरापास्त होणार नाही.



आपल्या देशाचे पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग एक नावाजलेले अर्थतज्ञ तर आहेतच पण दुरदृष्टी असणारे व्यक्तिमत्व आहे. त्यांनी चार वर्षापूर्वी जून २००५ मध्ये राष्ट्रीय ज्ञान आयोगाची स्थापना करण्याची घोषणा केली व ऑक्टोबर २००६ पासून राष्ट्रीय ज्ञान आयोग कार्यरत झाला. या नवीन युगाला सामोरे जाण्याकरिता भारताने कशाप्रकारे बदल करावे की जेणेकरून ज्ञान युगात होणारी प्रगती आपल्या देशातील गोरगरिब जनेतेपर्यंत पोहोचून त्यांनासुध्दा या प्रगतीत वाटेकरी करता येईल व त्याचबरोबर साधारण ११० कोटीपेक्षा जास्त लोकसंख्या असणारा भारत जगातील एक प्रमुख देश म्हणून पुढे येईल याकरिता काय कृती करावयाची हे ठरविण्यासाठी डॉ. सॅम प्रित्रोदा यांच्या अध्यक्षतेखाली या ज्ञान आयोगाची स्थापना झाली.

ज्ञान आयोगाने आपल्या पहिल्या बैठकीमध्ये एक आगळावेगळा निर्णय घेतला. तो असा की हा आयोग त्यांच्या तीन वर्षाच्या मुदती शेवटी त्यांचा अहवाल देणार नाही तर वेळोवेळी ज्या ज्या प्रश्नांवर त्यांनी समाजातील वेगवेगळया घटकांशी व विविध तज्ञांशी विचारविनियम करून ज्या शिफारशी तज्ञ करतील त्या साधारण दोन ते अडीच पानांच्या पत्रामध्ये मा. पंतप्रधानांना व २० ते २५ पानांचा अहवाल त्या विषयाशी निगडीत असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना देण्यात येईल. या निर्णयानुसार ज्ञान आयोगाने तीन वर्षाच्या कालावधीत एकुण २९ वेगवेगळया विषयांसंबंधी जवळजवळ ३१० शिफारशी पंतप्रधानांना सादर केल्या आहेत. पहिल्याच वर्षी २००६ मध्ये ज्ञान आयोगाने ग्रंथालय, भाषांतर, इंग्रजी भाषा शिकविणे, ब्रॉड बॅण्ड कनेक्टीव्हिटी, व्यवसाय प्रशिक्षण, शिक्षणाचा हक्क, ई गर्व्हर्नन्स, उच्च शिक्षण इ. विषयांवर आपल्या शिफारशी सादर केल्या तर २००७ च्या शेवटी आरोग्य माहिती जाळे, पोर्टल्स, ओपन एज्युकेशनल कोर्सवेअर, कायदेविषयक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, व्यवस्थापनविषयक शिक्षण, दूरशिक्षण, बौध्दिक संपदा हक्क, परंपरागत आरोग्य प्रणाली, कायदेविषयक तर २००८ च्या शेवटी शालेय शिक्षण, तंत्रज्ञान, गणित व विज्ञानाकरिता अधिक विद्यार्थी, उद्योजकता, अधिक संशोधक निर्माण करणे इ. विषयांसंबंधीत शिफारशी या आयोगाने पंतप्रधानांना सादर केल्या आहेत.

यामधील उच्च शिक्षण निगडीत शिफारशींमुळे खरेतर ज्ञान आयोगाला सर्व माध्यमांनी मोठया प्रमाणात प्रसिद्धी दिली कारण त्यातील काही शिफारशी चौकटीबाहेरच्या असल्यामुळे केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाला आवडल्या नाहीत. त्यामुळे ज्ञान आयोग म्हणजे शिक्षणावरील आयोग असा एक चुकीचा समज समाजात पसरला. त्यामुळे ज्ञान




आयोगाने केलेल्या इतर महत्वाच्या शिफारशींचा ज्या प्रकारे विचार होऊन त्याची अंमलबजावणी व्हावयास पाहिजे त्याप्रमाणे ती झालेली दिसत नाही व त्याला तेवढे महत्वही देण्यात आले नाही.

उदाहरणादाखल या लेखात मी ज्ञान आयोगाने केलेल्या दोन विषयांवरील माहिती देत आहे जे या आर्थिक मंदीच्या काळात अतिशय महत्वाचे आहे व त्या शिफारशी आपण समजून घेतल्या व त्याचा लवकरात लवकर अंमल केला तर आर्थिक मंदीचा फटका भारताला बसणार नाही. तसेच त्याचबरोबर भारत एकच असा देश राहील की जो या मंदीच्या काळातही वेगाने आर्थिक विकास करणारा एक देश ठरेल.

ज्ञान आयोगाने त्यांच्या सुरवातीच्या बैठकीत असे ठरविले की भारताला ज्ञानयुगात प्रगति करावयाची असेल तर मोठया प्रमाणात उद्योजक तयार करावे लागतील. या उद्योजकांनी सतत नवनवीन वेगळे मार्ग व नविन शोधांचा उपयोग करून त्यांचे उद्योगधंदे चालविले पाहिजेत व याकरिता भारताने वेगवेगळे कौशल्ये असणारी व त्याचप्रमाणे जे नविन शोध लावू शकतात असे शास्त्रज्ञ.तंत्रज्ञ निर्माण करणाऱ्या शिक्षण पध्दतीचा अवलंब केला पाहिजे. त्याकरिता आपल्या देशामध्ये व्यवसाय प्रशिक्षणामध्ये कोणते आमुलाग्र बदल घडून आणावेत याचा सखोल अभ्यास करून ते कसे घडवून आणावेत याबद्यल शिफारशी केल्या आहेत. त्यात महत्वाचा भाग असा की आज व्यावसायिक शिक्षण हे समाजातील फक्त गरीब लोकांकरिता आहे असा जो समज निर्माण झाला आहे तो दूर करणे महत्वाचे आहे तसेच व्यावसायिक शिक्षण म्हणजे सुतारकाम, इलेक्टिक वायरींग़, गवंडी, ब्युटीशियन एवढेच आहे असे समजले जाते आणि ज्यांनी व्यवसाय प्रशिक्षण घेतले आहे त्यांना समाजात उच्च स्थान मिळत नाही. त्यांचा विकास व त्यांची आर्थिक उन्नती कशी होईल त्यादृष्टीने बदल घडविण्याकरिता व्यवसाय प्रशिक्षणाचे नाव बदलून कौशल्य प्रशिक्षण देणे गरजेचे आहे व हे शिक्षण सहा महिने ते दीड वर्षापर्यंत न ठेवता अधिक कालावधीचे असणे गरजेचे आहे व ज्या क्षेत्रामध्ये अधिक मनुष्यबळाची गरज आहे व नविन व्यवसाय प्रशिक्षणाकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

उदाहरण दयायचे झाले तर व्हिडिओ गेमिंग हा उद्योग अमेरिकेत हॉलीवूड पेक्षाही मोठा झाला आहे व त्याची वार्षिक उलाढाल अमेरिकन डॉलर २५०० कोटींपेक्षाही जास्त आहे. भारतामध्ये तर या उद्योगाची वाढ साधारण ६० टक्के दरवर्षी होते आहे. ही वाढ अशीच टिकवायची असेल तर मोठया प्रमाणात व्हिडिओ गेम कसे तयार करावे यासंबंधी प्रशिक्षण आपल्याला दयावे लागणार आहे. परंतु अगदी एखाद दुसरीच संस्थाच आज भारतामध्ये अशा प्रकारचे शिक्षण देत आहे व अशा संस्थातून जे मनुष्य बळ तयार होते आहे ते अतिशय तोकडे आहे. तीच गोष्ट करमणुक उद्योग व सिनेमा उद्योगाची आहे. हा उद्योगसुध्दा वेगाने वाढत आहे. आणि त्यातल्यात्यात वाढ होते आहे ती ॲनिमेशन क्षेत्राची.

इथेसुध्दा आमचे प्रशिक्षित मनुष्यबळ अतिशय तोकडे आहे आणि जे आपण प्रशिक्षण देत आहोत त्याचा दर्जा व ते

प्रशिक्षण त्या उद्योगाला तेवढे उपयोगी नाही. म्हणून उद्योगाला उपयोगी असणारे व कालसुसंगत असे प्रशिक्षण देणे अतिशय गरजेचे आहे असे ज्ञान आयोगाने मांडले आहे. त्याचबरोबर अशा प्रकारचे दर्जेदार प्रशिक्षण देण्याकरिता त्या त्या उद्योगांबरोबर सहकार्य केले पाहिजे अशी आग्रही सुचनासुध्दा आयोगाने केली आहे. जे उद्योग यात भाग घेतील त्यांना वेगवेगळया योजनांमार्फत आर्थिक सवलत दयावी अशी शिफारस केली आहे.



*ज्ञान आयोगाच्या बैठकीला सॅम पित्रोदा व केंद्रीय नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष एस. एस. अहलुवालिया उपस्थित होते.*

आजच्या औद्योगिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था. आयटीआयमध्ये आमुलाग्र बदल सुचविले आहेत. ते सर्व इथे मांडणे योग्य होणार नाही. परंतु पुन्हा एकदा उच्च शिक्षणाबरोबरच या देशामध्ये आजपर्यंत ज्याला आपण महत्व दिले नाही अशा कौशल्य प्रशिक्षणाला महत्व देणे अतिशय गरजेचे आहे. असे प्रशिक्षित मनुष्यबळ वेगवेगळया क्षेत्रात आमच्याकडे असेल तरच चीन सारख्या देशाला शह देऊन भारतामध्ये मोठया प्रमाणात कमी किंमतीत उच्च दर्जाच्या वस्तु व उपकरणे निर्माण करू शकू व वेगवेगळया प्रकारच्या सेवा देऊन भारताची आर्थिक प्रगती वेगाने करू शकू.

अर्थातच याकरिता आम्हाला अधिक प्रमाणात उद्योजक निर्माण करण्याची गरज आहे. ज्ञान आयोगाने देशातील जवळजवळ २५० उद्योजकांशी वैयक्तिकरित्या संवाद साधला व ते उद्योजक कसे झाले, त्यांना कोणत्या अडचणींना तोंड दयावे लागले व दयावे लागत आहे. सरकारी योजनांचा तसेच बॅंकांचा त्यांना कशाप्रकारे लाभ झाला याची सुध्दा माहिती या संवादातुन आम्ही एकत्र केली. यावरून असे लक्षात आले की भारतामध्ये आज नविन उद्योजक हे पुर्वीप्रमाणे हाताच्या बोटावर मोजता येतील अशा उद्योजक कुटुंबातुन नाही तर मध्यमवर्गीय किंवा गरीब कुटुंबातील लोकसुध्दा पुढे येत आहेत. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्यांची स्वतःची, आजुबाजुची सामाजिक व सांस्कृतिक कारणे. घरातील जवळच्या नातेवाईकांकडून उद्योगाच्या सुरवातीच्या काळात आर्थिक मदत आणि त्याचबरोबर त्यांचे शिक्षण.

यातील सर्वात महत्वाचे कारण म्हणजे इतर कोणावर अवलंबून न राहता स्वतः काहीतरी करण्याची इच्छा व धमक तसेच नविन आव्हांनाना सामोरे जाण्याची हिमंत अर्थातच पहिल्या पिढीतील बहुतेक उद्योजकांनी स्वतःचे पैसे गुंतवुन त्यांचा उद्योग उभा केलेला आहे. कारण या नविन उद्योजकांना बँक व्हेंचर कॅपिटल किंवा एंजल इन्व्हेंस्टरस् पुढे येऊन मदत करत नाहीत असे नजरेस आले. १९६० ते १९७० च्या दरम्यान राज्य आर्थिक महामंडळाने बऱ्याच उद्योजकांना मदत करून त्यांना प्रस्थापित करण्याकरिता मदत केलेली नजरेस आली.

उद्योजक म्हणतात की त्यांच्या यशातील शिक्षण हा एक महत्वाचा भाग आहे. तसेच हे सर्व उद्योजक कमीत कमी डिग्रीपर्यत शिक्षण घेतलेले होते पण त्यातील फक्त १६ टक्के उद्योजक त्यांच्या शिक्षणाशी निगडीत असलेला उद्योग करताना आढळले. परंतु ५० टक्केपेक्षा जास्त उद्योजकांना नवीन मनुष्यबळ घेत असताना कौशल्य असणारे मनुष्यबळ मिळविणे अतिशय कठीण जाते असे त्यांचे म्हणणे होते.



*चंदीगड केंद्रशासित प्रदेशाच्या प्रशासकांचे सल्लागार श्री. प्रदीप मेहरा हे ज्ञान आयोगाच्या बैठकीत मार्गदर्शन करीत असून, (उजवीकडे ) शेजारी आयोगाचे सल्लागार श्री. रघुनाथन व इतर मान्यवर.*

तसेच ५० टक्के उद्योजकांना शासनाकडून लागणारी आवश्यक ती मंजुरी घेताना अडचणी आल्या. जवळजवळ ६० टक्के उद्योजकांचे म्हणणे होते त्यांना अशावेळेला भ्रष्टाचाराला तोंड दयावे लागले. तसेच नोंदणी करण्याकरिता लागणारी योग्य ती माहिती. विविध दाखले मिळण्याकरिता लागणारी माहिती याकरीता बऱ्याच उद्योजकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले.

दळणवळण इ. चांगल्या दर्जाची मिळणे अतिशय कठिण गेले व त्यामुळे त्यांच्या नफ्यात घट झाली तसेच दर्जात फरक पडण्याची स्थिती निर्माण झाली म्हणजेच आपल्या देशात अधिक उद्योजक तयार करावयाचे असतील तर गरज आहे ती खालील गोष्टींची :

1. Demystify perceptions of risks and failure by facilitating best practices as well as documentation of unsuccessful ideas
2. Recognitions and awards right from local to national level to energize and encourage new entrepreneurs.
3. Involve entrepreneur networks and association
4. Imaginative combination of assessing debt and equity.
5. Involving making more efforts on part of Bank, Financial Institutions, Venture Capital, Angel Investors and private equity funds. There is a need to create incentive for seed capital funding. This includes establishment of a secondary market for smaller community. Creating new instruments for part of funding and providing financial literacy to start up.
6. Synergies between education, innovation and entrepreneurs should be encouraged.
7. Growing the pool of skilled people as a key priority.

8. Economic liberalization as a key catalyst to encourage entrepreneurship.

9. No. of initiatives at the central and state level which aim to improve the keys of doing business.



"Doing Business Report 2008". Published by World Bank_ISB states that India can jump 55 places from its rank of 120th place if from the local best practices are adopted nationwise. Further fully automate processes enforcement and complined. Single Window System should be implemented introducing a single composting application form as already done in few states and by introducing a single unique company no. Thus in short the time for registration of new company should be brought down to less than 4 working days as happens in China. There should be one single web site that should provide all relevant information to start entrepreneural activity.

त्याचबरोबर भारतात सगळीकडे ई गव्हर्नन्स व दर्जेदार इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण केले तर भारत जगातील सर्वात मोठा उद्योजक देश म्हणून काहीच वर्षात उदयास येईल. अर्थातच याकरिता आम्हाला या सर्वांबरोबर जे नविन तंत्रज्ञान संशोधन करू शकतात असे उच्च शिक्षित निर्माण करणे गरजेचे आहे. म्हणजेच आमच्या उद्योजकांनी सुध्दा त्यांच्या उद्योगात नाविन्य कसे येईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे. हे जर नविन तंत्र आम्ही भारतातील उद्योगात समाविष्ठ केले नाहीतर येथील सेवा व वस्तु यांचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरांवर तसेच ती सेवा देण्याची किंमत किंवा आंतरराष्ट्रीय दर्जाची तयार करण्याची किंमत इतर देशांपेक्षा अधिक असेल म्हणूनच ज्ञान आयोगाने यावर सुध्दा भर देण्याचे सुचविले आहे. ज्ञान आयोगाच्या अभ्यासातून असे निर्दशनास येते की मोठया उद्योजकांपेक्षा छोटे व मध्यम उद्योग आज अधिक नविन नविन प्रयोग करित आहे व त्यांच्या उद्योगात नाविन्य आणण्याकरिता सतत प्रयत्नशील आहेत. पण हे नाविन्य बहुतेक उद्योगात अगदी थोडया प्रमाणात आहे.

म्हणजेच भारताच्या प्रगतीकरिता व जागतिक आर्थिक मंदीवर मात करण्याकरिता आपल्या देशाने जर लवकरात लवकर उच्च दर्जाची कौशल्ये निर्माण करणारे प्रशिक्षण मोठया प्रमाणात देण्यास उद्योजकांना बरोबर घेऊन सुरवात केली. नविन मोठया प्रमाणात उद्योजक निर्माण करण्याकरिता वर उदधृत केलेल्या सुचना आपण कार्यान्वीत केल्यात आणि त्याचबरोबर मोठया प्रमाणात निर्माण करण्याकरिता लागणारी साधनसामग्री तयार केली तरच त्यामध्ये ३५ कोटीपेक्षा जास्त १५ ते २५ वयोगटातील तरूण भारताला प्रगतीपथावर नेतील यात मुळीच शंका नाही.

■■■



# अमला प्रज्ञा आणि सूक्ष्म दृष्टीचे राजकारण




**– डॉ. सदानंद मोरे**

तत्त्वज्ञान विभागप्रमुख, पुणे विद्यापीठ


**राजनीतीतील अमला प्रज्ञेचा विचार धर्माच्या जवळ जाणारा आहे. धर्म सर्वांच्या हिताचे सार्वत्रिक नियम सांगतो ते पाळलेच पाहिजेत. ते पाळले तरच समाजाचा गाडा व्यवस्थित चालेल. परंतु कधी कधी परिस्थिती इतकी गुंतागुंतीची व अपवादात्मक बनते की धर्माच्या सार्वत्रिक नियमाला मुरड घालून वेगळी कृती करावी लागते. हा अपवाद ओळखण्यासाठी सूक्ष्म दृष्टीची गरज असते. राजनीती ही दृष्टी देते आणि परिस्थितीची सामान्य आणि विशिष्ट अंगे बरोबर ओळखून त्यानुसार कृती करणे म्हणजे राजनीती.**

भारत हा जगाच्या पाठीवरील सर्वात मोठा असा लोकशाहीप्रधान देश आहे. जवळजवळ दीड शतके ब्रिटिशांच्या गुलामगिरीत कंठल्यावर १९४७ मध्ये तो स्वतंत्र झाला. अर्थात हे स्वातंत्र्य काही त्याला कोणी देणगी म्हणून बहाल केले नव्हते. अनेक स्वातंत्र्यसैनिक त्यासाठी खर्ची पडले परंतु याच प्रक्रियेतून महात्मा गांधींच्या सत्याग्रह नावाच्या नव्या अहिंसात्मक शस्त्राची देणगी जगाला मिळाली.



गांधींच्या अहिंसात्मक राजकारणाचा प्रभाव स्वातंत्र्योत्तर भारतावर झाल्याशिवाय राहिला नाही. विशेषत: आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये भारताचे पहिले पंतप्रधान आणि गांधीजींचे राजकीय वारसदार पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी अलिप्ततावादाचे धोरण दाखल केले. पंचशील तत्वाचा पुरस्कार केला. रशिया आणि अमेरिका तसेच त्यांच्या गटांत असलेल्या राष्ट्रांमध्ये चालू असलेल्या सततच्या संघर्षावर मात करण्यासाठी नेहरूंनी तिसऱ्या छावणीची उभारणी करून पाहिली.

नव्याने स्वातंत्र्य मिळवलेल्या देशाकडून अशा प्रकारचे पुढारपण आणि अभिनव धाडसी धोरणांचा पुरस्कार कोणालाच अपेक्षित्र नव्हता. या आगळ्यावेगळ्या प्रयोगाचे योग्य ते श्रेय गांधी नेहरूंना द्यायलाच हवे, परंतु गांधी-नेहरू काय किंवा त्यांचे नवीन राजकीय प्रयोग काय, काही आभाळातून टाकले नाहीत. हे लक्षात ठेवायला हवे. मुळात भारत देशाला प्रदीर्घ अशा राजकीय तत्त्वचिंतनाची परंपरा आहे. केवळ चिंतन मननात मग्न असलेले निःस्पृह ऋषीमुनी, अवतार म्हणून मान्यता मिळालेले कृष्णासारखे युगपुरुष, राजकीय उलाढालीत प्रत्यक्ष भाग घेणारे चाणक्य कौटिल्यासारखे मंत्री, छत्रपती शिवरायांसारखे नवे मार्ग चोखाळणारे राजपुरुष अशा वेगवेगळ्या वर्गात मोडणाऱ्या मंडळींनी या राजकीय विचारात महत्त्वाचे योगदान केले आहे. स्वतः नेहरूंनी भारताच्या इतिहासाचे खोल अवगाहन केले होते. त्यातील ग्राह्यांश त्यांनी आत्मसातही केला होता.

राजा, राज्याभिषेक, मंत्री इ. चे उल्लेख वेदवाङमयात विपुल प्रमाणात आढळतात. विशेषतः देव आणि दैत्य या एकमेकांशी सतत युद्धमान असणाऱ्या जातींचे डावपेच कोणाचेही लक्ष वेधून घेतील.

या देवासुर द्वंद्वांमधूनच भारतातील राजकीय विचारांची सुरुवात झाली. बृहस्पती म्हणजे देवांचा गुरू आणि शुक्र म्हणजे दैत्यांचा गुरू. हे दोन विचारवंत दोन वेगवेगळ्या राजकीय विचारप्रणालीचे प्रवर्तक होते.

शुक्राचार्य परंपरेमध्ये उशना, काव्य, कळी या नावांनीही प्रसिद्ध आहेत. गीतेच्या दहाव्या अध्ययात आपल्या विभूती सांगताना श्रीकृष्णाने आपण कवींमध्ये उसनाकळी म्हणजेच शुक्राचार्य असल्याचे म्हटले आहे. मुळात कळी शब्दाचा अर्थ द्रष्टा, दूरवरचे पाहू शकणारा असा आहे. ज्ञानेश्वर कवीसाठी क्रान्तदर्शी हा शब्द वापरतात. जो एखाद्या कृतीच्या परिणामांचे अचूक भाकित करू शकतो तो कवी. राजकारण करणारी व्यक्ती ही या अर्थाने 'कवी' असावीच लागते.

महाभारतामध्ये कृष्ण वावरतो तो राजकीय विचारवंत वा मुत्सद्दी या नात्याने. त्याचा संप्रदाय अथवा स्कूल शुक्राचार्यांचेच आहे याचे एक वेगळे कारण आहे. कृष्ण यादव म्हणजे यदूच्या वंशातील. या वंशातील एक प्रसिद्ध राजा ययाती. शुक्राचार्यांची कन्या देवयानी ही ययातीची पत्नी. म्हणजे शुक्राचार्य हे कृष्णाचे पूर्वजच.

बृहस्पती इंद्रादी देवांचे गुरू व सल्लागार. मात्र राजनीतीतील यशासाठी काहीही केले तरी चालेल असे त्यांचे मत होते. त्यामुळेच की काय देवां दैत्यांवर मिळविलेले अनेक विजय फसवणुकीवर आधारित आहेत. राजकारणात काहीही क्षम्य व समर्थनीय असते असे मानणारे कौटिल्य, मॅकिवॅली बृहस्पतीच्याच परंपरेतील म्हणावे लागतात. ज्याप्रमाणे शुक्राचार्यांची शुक्रनीती प्रसिद्ध आहे त्याप्रमाणे बृहस्पतींची बार्हस्पत्य सूत्रे.

प्राचीन भारतीय राजनीतीतील मूलभूत द्वंद्वं दैव आणि पुरुषकार अथवा प्रयत्न यांच्यामधील आहे. बृहस्पती पूर्णपणे

प्रयत्नवादी आहेत. महाभारतात जी कणिकनीती प्रसिद्ध आहे तिचा प्रवक्त्या कणिक बृहस्पतीचीच विचारसरणी मानणारा आहे. खुद्द द्रौपदीला लहानपणी असे विचार ऐकण्याची संधी मिळाली होती. या प्रयत्नवादी विचारांना अदेवमातृका अशी उपमा देतात. अदेवमातृका याचा अर्थ केवळ शेतीच्या पाण्यावर अवलंबून न राहाता विहिरी, तळी, कालवे अशा कृत्रिम मानवनिर्मित साधनांचा उपयोग करून पीक घेणे. याउलट देवमातृक म्हणजे केवळ पावसाच्या पाण्यावर केली जाणारी शेती. मात्र बृहस्पतींचा हा प्रयत्नवाद अंतिमतः विधिनिषेधशून्य कृतीत पर्यवासने होतो. स्वतः दुर्योधन अदेवमातृकाचा पुरस्कार करणारा होता आणि म्हणून तर त्याने पांडवांना संपविण्यासाठी सर्व प्रकारच्या मार्गांचा अवलंब केला.

खुद्द महाभारत हा ग्रंथ राजकीय विचारांचा एक खजिनाच आहे. शुक्रब्रह्स्पती बरोबरच त्यात प्रल्हाद, ययाती इ. चे विचारही वारंवार उद्‌धृत करण्यात आलेले आहेत. पण त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे महाभारतामधील अनेक पात्रे प्रसिद्ध राजकीय तत्त्वज्ञ म्हणून वावरताना दिसतात, अनेक विषयांवर चर्चा करताना आढळतात. इतकेच नव्हे तर राजनीतीवरील उत्तरकालीन ग्रंथ त्यांच्या मतांचा आधार घेताना दिसतात. विदुर हा असाच एक महत्त्वाचा तत्त्वज्ञान, तो धृतराष्ट्राचा मंत्री व सल्लागार होता. त्याचे राजकीय विचार पुढे विदुरनीती म्हणून प्रसिद्ध झाले.

स्वतः भीष्माचार्याही एक मान्यवर राजकीय विचारवंत म्हणून प्रसिद्ध होते. आयुष्यभर त्यांनी अनेक राजकीय उलाढाल्या केल्या. महाभारताच्या शांतीपर्वात त्यांनी राजा युधिष्ठिराला राजधर्माचा उपदेश केला. या संदर्भात नारदाचाही उल्लेख करायला हवा.



भारतीय राजकीय विचार परंपरेत भीष्म कौणपदंत या नावाने ओळखले जातात.

द्वारकेच्या यादवांच्या दरबारातील मंत्री आणि कृष्णाचा चुलतभाऊ असलेला उद्धव एरव्ही कृष्णाचा परमभक्त आणि भक्तिमार्गाचा आचार्य म्हणून मान्यता पावला आहे. परंतु तो अव्वल दर्जाचा राजकीय विचारवंतही होता. भारतीय परंपरा त्याला वातव्याधी या नावाने ओळखते.

महाभारतातील सर्वश्रेष्ठ राजकीय विचारवंत, मुत्सद्दी आणि अर्थातच राजकीय कर्ता म्हणजे स्वतः कृष्ण. कृष्णाला देवत्व प्राप्त झाल्यामुळे त्याच्या सर्वच कृतींकडे लीला म्हणून पाहण्यात आले. परंतु मामला इतका सरळसाधा नाही. त्याचे स्वतःचे स्वतंत्र राजकीय सिद्धांत आहेत. त्यानुसार तो स्वतः राजकीय व्यवहार करतो आणि इतरांनाही मार्गदर्शन करतो. किंबहुना त्यामुळेच तर पांडवांनी यादवांच्या संपूर्ण सैन्यापेक्षा आम्हाला स्वतः न लढता केवळ युक्तीच्या चार गोष्टी सांगणारा कृष्ण पसंत केला. स्वतः कृष्णाला सत्तेत रस नव्हता. परंतु यादव आणि पांडव यांची राज्ये भरभराटीस आली ती कृष्णाच्या मार्गदर्शनामुळेच. समकालीन मातब्बरांमध्ये कृष्ण सर्वश्रेष्ठ मानला जायचा. भीष्माचार्यांनी पांडवांच्या राजसूत्र यज्ञात अग्रपूजेच्या मानासाठी कृष्णाचे नाव सुचवले यात सर्व काही आले. भीष्मविदुरा उद्धवासह सर्व समकालिनांनी कृष्ण सर्वश्रेष्ठ असल्याचे मान्य केले होते.

एकविसाव्या शतकातील भारताच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे कृष्ण हा साम्राज्यवादाचा व एकाधिकारशाहीचा कट्टर विरोधक होता. महाभारत कालातील सर्वात आक्रमक साम्राज्यवादी म्हणजे मगध देशाचा सम्राट



जरासंध. तेव्हाचा भारत देश सहजीवन तत्त्वावर आधारलेला अनेक छोट्यामोठ्या गणराज्यांमध्ये विभागला होता. ही गणराज्ये एक प्रकारची लोकशाही व्यवस्थाच असत. मथुरा येथील यादवांचे राज्य असेच गणराज्य होते. अग्रसेन हा गणराज्याचा गणाधिपती होता. अग्रसेनाचा मुलगा व कृष्णाचा मामा कंस जरासंधाच्याच विचारांचा होता. त्याने जरासंधाच्या आस्ति आणि प्राप्ती या मुलींशी विवाह केला होता. जरासंधाने साम्राज्यवादी राज्याची एक आघाडीच उभारली होती व गणराज्यांचा घास घ्यायचा घाट घातला होता. कंसाला यादवांची गणराज्यपद्धती संपुष्टात आणून स्वतः एकाधिकारशहा व्हायचे होते. त्यासाठीच त्याने गणराज्याचा पुरस्कार करणाऱ्या आपल्या मेव्हण्याला वसुदेवाला स्थानबद्ध करून ठेवले होते. कृष्ण आणि बलराम म्हणजे कंसाच्या तावडीतून वाचलेली व गोकुळात गुप्तपणे वाढलेली वसुदेवाची अपत्ये. कृष्णाच्या अंगी उपजतच असलेले नेतृत्वगुण यादवांच्या गणराज्यवादी गटाच्या लक्षात आल्याशिवाय राहिले नाहीत. त्यांनी कृष्णाला नेतृत्व दिले. त्याने योग्य ती राजकीय कारस्थाने करून कंसाचा नाश केला व यादवांच्या गणराज्याची पुनःस्थापना केली. आमच्या जावयाचा अशा प्रकारे नाश होऊन आपल्या विस्तारवादी योजनेत विघ्न आणल्याबद्दल जरासंधाने मथुरेच्या राज्यावर सतरा वेळा आक्रमणे केली. परंतु कृष्णाच्या नेतृत्वाखाली यादवांनी ती परतवली. शेवटी कंटाळून कृष्णानेच राजधानी दूर सुरक्षित ठिकाणी हलविण्याचा निर्णय घेतला व पश्चिम किनाऱ्यावरील द्वारका हे सुरक्षित ठिकाण निवडण्यात आले. यादवांनी द्वारकेत स्थलांतर केले आणि तेथे कृष्णाच्याच मार्गदर्शनाखाली त्यांची भरभराट झाली.

जरासंध हा भारतातील गणराज्यांच्या मार्गातील काटा असल्याचे व तो उपटून टाकण्याशिवाय गणराज्यांना सुरक्षितता लाभणार नसल्याचे कृष्ण पुरतेपणी जाणून होता. म्हणून तर त्याने पांडवांच्या राजसूत्र यज्ञाच्या निमित्ताने भीम आणि अर्जुनाला बरोबर घेऊन योग्य ती व्यूहरचना करून भीमाच्या करवी जरासंधाचा नाश केला. तोपर्यंत जरासंधाने भारतातील ८६ गणाधीश जिंकून कैदेत ठेवले होते व ही संख्या १०० झाली की यज्ञाचे निमित्त करून तो त्यांना बळी देणार होता. या ८६

राजांची सुटका कृष्णाने करविली आणि त्यांच्या गणराज्यांना जीवदान दिले. भारतातील गणराज्य व्यवस्थेची पुनःस्थापना केली.

महाभारताचे लेखक व्यासमुनी हे स्वतः देखील राजकीय तत्त्वज्ञ होते. व्यास राजकारणाकडे व्यापक मतलबी जीवनाचा एक भाग म्हणून पाहात व त्याचा संबंध पुरुषार्थाशी लावीत. राजकारण अर्थपुरुषार्थात मांडते म्हणून तर आमच्याकडे राजकारणाच्या शास्त्रास अर्थशास्त्र म्हणतात. व्यासांच्या म्हणण्याप्रमाणे धर्म, अर्थ आणि काम या पुरुषार्थांमध्ये धर्म पुरुषार्थ सर्वश्रेष्ठ आहे. या ठिकाणी धर्म म्हणजे 'रिलिजन' नव्हे. धर्म म्हणजे अर्थ आणि काम प्राप्त करून घेण्याचे समाजमान्य म्हणजेच नैतिक उपाय. धर्म सांभाळला असता अर्थकामांची प्राप्ती संघर्षाशिवाय करता येते असे व्यासांचे म्हणणे होते आणि व्यासांनी हे मत कृष्णाकडून घेतले होते. व्यासांच्या महाभारतात सर्वात महत्त्वाचे स्थान आहे कृष्णाचे आणि व्यासांचे राजकीय तत्त्वज्ञान एकच आहे. किंबहुना व्यास सैद्धांतिक पातळीवरून जी मांडणी करतात तिचे कृष्ण प्रत्यक्ष कृतीत रुपांतर करून यशस्वी राजकारण करतो.

महाभारतानंतर निर्माण झालेल्या राजनीतीवरील प्रत्येक ग्रंथात श्रीकृष्णाचा आवर्जून उल्लेख करण्यात आल्याचे आढळून येते. विशेषतः युद्ध टाळण्यासाठी कृष्णाने केलेले प्रयत्न हा सर्वांच्याच आदराचा विषय आहे.

कौटिल्याचे अर्थशास्त्र, कामन्दकाचे नीतीसार, सोमदेव सूरीचे नीतीवावस्त्रमृत, मित्रमिश्राकृत वीरमित्रोदय ही राजनीतीवरील प्रमुख ग्रंथांची काही नावे. या परंपरेतील शेवटचे नाव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजनीतीवर आधारित असलेला रामचंद्रपंत अमात्यांच्या नावे मोडणारी मराठीतील 'आज्ञापत्रे'.

देशपरदेशातील विद्वानांनी कौटिल्याच्या अर्थशास्त्राचे तोंड भरून कौतुक केले आहे. कौटिल्य हा चंद्रगुप्त मौर्याचा अमात्य अचूक (प्रधान) मंत्री नंद घराण्यातील शेवटच्या धनानंद राजाचा नाश करून त्यानेच चंद्रगुप्ताला गादीवर बसवले अशी कथा आहे. स्वतः कौटिल्य अर्थ पुरुषार्थाला प्राधान्य देऊन धर्माला दुय्यम स्थान देत असे.

चंद्रगुप्ताचा नातू म्हणजेच सम्राट अशोक. या सम्राटाने वेगळ्याच प्रकारेच राजकारण केले. त्याचे राजकारण गौतम बुद्धाच्या अहिंसावादी तत्त्वज्ञानावर आधारित होते. अशोकाचे धर्मचक्र आणि सिंहमुद्रा भारतीय घटनेने आपली राष्ट्रीय प्रतिके म्हणून स्वीकारली. ते भारताने स्वीकारलेल्या राजकीय तत्त्वज्ञानाशी सुसंगतच आहे व त्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे जाते.

भारतीय राजनीतीच्या परंपरेतील ज्या ग्रंथांची नावे वर दिली आहेत त्यात एका ग्रंथाचा समावेश नाही आणि तो म्हणजे काश्मिर पंडित क्षेमेंद्रचा 'नीतिकल्पतरू'. क्षेमेंद्र हा त्याच्या साहित्यशास्त्रातील औचित्य सिद्धांतासाठी प्रसिद्ध आहे. दुर्दैवाने त्याच्या राजनीतीवरील ग्रंथाकडे सर्वांचेच अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे.

क्षेमेंद्र स्वतःला व्यासदास म्हणजे व्यासांचा शिष्य म्हणवतो आणि आपला नीतीकल्पतरू हा ग्रंथ व्यासांच्या राजनीतीसंबंधीच्या ग्रंथावरील टीका असल्याचा दावा करतो. त्यामुळे साहजिकच त्याच्या ग्रंथात स्वतः व्यास आणि कृष्ण यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला आहे.

क्षेमेंद्र उदारमतवादी विचारवंत होता. त्यामुळे तो नेहमीच सांप्रदायिक संकुचिततेच्या पलीकडे असे. एरव्ही केवळ पैशाची सारख्याच प्राकृत भाषेत उपलब्ध असलेली गुणाढ्याची बृहत्कथा त्याने संस्कृतात आणली. रामायण आणि महाभारताच्या कथा साररुपाने सांगणाऱ्या मंजिऱ्या त्याने लिहिल्या. बौद्ध जातक कथांचे संस्कृत रुपांतरही त्याने केले आणि सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे बुद्धासह दहा अवतारांच्या कथा सांगणारा 'दशावतारचरित्रम्' हा ग्रंथ त्याने लिहिला. त्यात त्याच्या आवडत्या राजकीय विचारवंतांचे म्हणजे कृष्णाचे चरित्र त्याने अर्थातच समरसून लिहिले आहे. गौतम बुद्धाचा नुसता अवतार मानून त्याचा कामापुरता उल्लेख करणे वेगळे आणि त्याचे तसे तपशीलवार चारित्र्य सादर करणे वेगळे. क्षेमेंद्राने नेमके हेच केले आहे. संस्कृत आणि प्राकृत, वैदिक आणि श्रमण परंपरांचा महासमन्वय करणारा क्षेमेंद्र हा अशा प्रकारे सर्वश्रेष्ठ भारतीय विचारवंत म्हणावा लागतो.

क्षेमेंद्र कृष्णाचा निःस्सीम चाहता तर होताच. परंतु जालकमंजरी, दशावतारचरित्र असे ग्रंथ लिहिताना त्याचा बौद्ध विचारांशीही जवळून परिचय झाला होता. शिवाय त्या काळातील काश्मीरमध्ये बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रवाह जिवंतपणे वाहात होता. क्षेमेंद्राने कृष्ण आणि बुद्ध यांच्या विचारांचा मेळ राजनीतीमध्ये घालण्याचा प्रयत्न केला. क्षेमेंद्राने कृष्णाला या तत्त्वज्ञानाचा प्रवक्ता आणि कर्ता केला.

'नीतीकल्पतरू' या ग्रंथात क्षेमेंद्र (राज)नीतीच्या दोन व्याख्या देतो. पहिली म्हणजे 'नीतीर्नाम अमला प्रज्ञा' आणि दुसरी 'नीतिर्नाम सूक्ष्मा दृष्टिः'.

अमला प्रज्ञेची कल्पना क्षेमेंद्राने बौद्ध विचारातून घेतली. मलविरहित शुद्ध बुद्धी म्हणजे अमला प्रज्ञा. परंतु हा झाला शाब्दिक अर्थ. या अर्थाची राजकीय निष्पत्ती क्षेमेंद्राने कशी




*गौतम बुद्ध*



*डॉ. बाबासाहेब आंबेडकर*

केली ते पाहा. त्याने अमलला म्हणजे 'स्वपरिहित्व' असे सांगितले. कौटिल्यासारख्या प्रसिद्ध विचारवंताने राजकारण म्हणजे स्वतःचे हित व इतरांचे म्हणजे विशेषतः शत्रूचे अहित असाच समज केला होता. पण क्षेमेंद्र या विचाराला प्रज्ञा न म्हणता 'धी' असे म्हणतो आणि या 'धी' चे वर्णन 'कौटिल्यमलभरिता' असे करतो. यातील कौटिल्य या शब्दावरील कोटी महत्त्वाची आहे. त्यातून त्याला कौटिल्य चाणक्याचे साधनवादी विचार अभिप्रेत आहेत.

राजनीतीतील अमला प्रज्ञेचा विचार धर्माच्या जवळ जाणारा आहे. धर्म सर्वांच्या हिताचे सार्वत्रिक नियम सांगतो ते पाळलेच पाहिजेत. ते पाळले तरच समाजाचा गाडा व्यवस्थित चालेल.

परंतु कधी कधी परिस्थिती इतकी गुंतागुंतीची व अपवादात्मक बनते की धर्माच्या सार्वत्रिक नियमाला मुरड घालून वेगळी कृती करावी लागते. हा अपवाद ओळखण्यासाठी सूक्ष्म दृष्टीची गरज असते. राजनीती ही दृष्टी देते आणि परिस्थितीची सामान्य आणि विशिष्ट अंगे बरोबर ओळखून त्यानुसार कृती करणे म्हणजे राजनीती. गांधीजींनी अहिंसेचे राजकारण सांगितले व भारताने ते स्वीकारले. ही अमला प्रज्ञेची शिफारस आहे पण याचा अर्थ भारताने निरपवादपणे या सार्वत्रिक तत्त्वाच्या आहारी जाऊन आपले अहित करणे असा होत नसतो. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सैन्य घुसवून तो काबीज करण्याचे घाणेरडे राजकारण केले तेव्हा भारताने त्याचा लष्करी प्रतिकार केला. गांधींनी भारत सरकारच्या या कृत्याचे समर्थनच केले ही अपवाद जाणणारी सूक्ष्म दृष्टी होय.

क्षेमेंद्राच्या लिखाणात कृष्ण अशा राजनीतीचा प्रवक्ता म्हणून वावरतो. तो परिस्थितीचे सूक्ष्म विश्लेषण करून धर्माच्या नावाखाली कोणी कोणाचे न्याय्य हक्क हिरावून घेत असेल तर अशा परिस्थितीत अपवाद म्हणून योग्य ती कृती करण्याचा सल्ला देतो. अमला प्रज्ञेच्या मुळे पांडवांबरोबर कौरवांचेही हित साधण्यासाठी धोका पत्करून कौरवांच्या दरबारात शिष्टाईसाठी जाणारा कृष्णच आणि उन्मत्त कौरव तडजोडीला तयार नाहीत हे लक्षात आल्यावर निरुपाय म्हणून त्याच्याशी युद्ध करण्याच्या अपवादाला मान्यता देणाराही कृष्णच. क्षेमेंद्राने कृष्णचरित्रातील या घटनेला महत्त्वाचे स्थान दिले आहे.

कृष्ण आणि बुद्ध यांच्या विचारांच्या समन्वयातून सिद्ध झालेले हे अमला प्रज्ञेचे आणि सूक्ष्म दृष्टीचे राजकारणच भारताला तारू शकेल.

■■■



– एल. श्रीधर

# ‘इस्त्रो’चें आणखीं एक उड्डाणं

चांद्रयान मोहीम यशस्वी केल्यानंतर भारतीय अवकाश संशोधन संस्थेने ‘रिसॅट–२’ या उपग्रहाचे नुकतेच प्रक्षेपण केले. हा दूरसंवेदन प्रकारचा उपग्रह असला, तरी त्याचा लष्करी कारणासाठीही वापर होऊ शकतो. म्हणूनच त्याबद्दल अधिकच चर्चा झाली. ‘रिसॅट–२’ हा उपग्रह हेरगिरीसाठी नसल्याचे डॉ. नायर यांनी स्पष्ट केले असले, तरी त्यातील ‘एसएआर’ यंत्रणेमुळे तशी चर्चा होत आहे. या उपग्रहामुळे सीमाभागावर अवकाशातून देखरेख करता येईल, शत्रू प्रदेशातून होणाऱ्या घुसखोरीवर, तसेच संशयास्पद हालचालींवरही करडी नजर ठेवता येईल, असे म्हटले जात आहे आणि ‘स्पाय सॅटेलाइट’असे त्याचे वर्णनही केले जात आहे.

सुमारे तीनशे किलो वजनाच्या 'रिसॅट-२' या उपग्रहाचे, तसेच चेन्नईच्या अण्णा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या 'अॅन्युसॅट' या लघुउपग्रहाचे ध्रुवीय उड्डाण वाहकाद्वारे (पीएसएलव्ही-सी १२) यशस्वी प्रक्षेपण करुन भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) अवकाश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आणखी एक पाऊल पुढे टाकले. सहा महिन्यांपूर्वीच चांद्रयानाचे प्रक्षेपण यशस्वी करून 'इस्रो' ने साऱ्या जगाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले होते. 'रिसॅट' उपग्रहामुळे 'इस्रो' पुन्हा चर्चेत आला आहे. 'रिसॅट' चे स्वरूप हेही त्याचे एक प्रमुख कारण आहे. या उपग्रहाचा उपयोग हेरगिरीसाठीही होऊ शकत असल्याने त्याचा गवगवा अधिक झाला. मात्र, 'रिसॅट-२' हा केवळ हेरगिरीसाठी नाही- त्याचा उपयोग त्याहून कितीतरी अधिक आहे.

'रिसॅट' म्हणजे 'रडार इमेजिंग सॅटेलाईट' पृथ्वीवरील नैसर्गिक घडामोडींचा अवकाशातून वेध घेणारी पद्धती.

'इंडियन रिमोट सेन्सिंग सॅटेलाइटस्' (आयआरएस) मालिकेद्वारे 'इस्रो' ने अनेक उपग्रह अवकाशात सोडले आहेत. प्राकृतिक भूगोलाची अधिकाधिक माहिती मिळविण्यासाठी, 'रिमोट सेन्सिंग' म्हणजेच दूर संवेदन तंत्राने शेतीखालील जमिनीच्या, वनाच्छादित क्षेत्राच्या, सागरी पृष्ठभागाच्या प्रतिमा मिळविता येऊ शकतात. ज्या उपग्रहांमध्ये अशा प्रकारचे तंत्रज्ञान असते, त्यांना दूर संवेदन उपग्रह म्हटले जाते. 'रिमोट सेन्सिंग' म्हणजे या नावातच त्याची संकल्पना स्पष्ट होते. दूरस्थ राहून विशिष्ट वस्तूंचा वेध घेण्यासाठी या तंत्राचा वापर केला जातो. विद्युतचुंबकीय लहरींद्वारे हा वेध घेतला जातो. रडार किंवा उपग्रहे हे अशाच प्रकारे वेध घेत असतात.

'रिमोट सेन्सिंग' उपग्रहांची भारताकडे असलेली मालिका ही जगातील सर्वांत मोठी मालिका मानली जाते. 'आयआयएस-१ ए' या दूर संवेदन उपग्रहाचे १९८८ मध्ये प्रक्षेपण करीत भारताने 'इंडियन अर्थ ऑब्झर्व्हेशन (ईओ) सिस्टिम' ची स्थापना केली. त्यानंतर एकापाठोपाठ एक या क्रमाने दूर संवेदन उपग्रह भारताने अवकाशात सोडले. 'आयआरएस' मालिकेत 'इस्रो' ने १४ उपग्रह प्रक्षेपित केले असून, त्यापैकी पाच उपग्रहांचा कार्यकाल संपला आहे. 'आयआरएस-पी ६', 'कार्टोसॅट', 'कार्टोसॅट - २', कार्टोसॅट-२ ए', 'आयएमएस' हे उपग्रह सेवेत आहेत.

## 'रिसॅट' चे वेगळेपण

देशाच्या नैसर्गिक संपदेच्या (वने, नद्या, मोठी जलाशये, किनारपट्टीचा प्रदेश, खनिजे आदी) व्यवस्थापनासाठी या उपग्रहांचा उपयोग होतो. याच मालिकेतील पुढचा उपग्रह म्हणजे 'रिसॅट-२', मात्र तो आधीच्या 'आयआरएस' उपग्रहांपेक्षा वेगळा आहे. या उपग्रहात इस्रायली बनावटीचे 'सिंथेटिक अॅपर्चर रडार' (एसएआर) यंत्रणा आहे. त्यामुळे पृथ्वीवरील प्रतिमा अतिशय ठळकपणे घेता येऊ शकतात. शिवाय हा उपग्रह दिवसा आणि रात्री, तसेच कोणत्याही हवामानात काम करु शकतो. त्यामुळे त्याच्याकडून प्रतिमा मिळविणे सुलभ होणार आहे. थोडक्यात ऊन-वारा-थंडी-पाऊस अशी कोणतीही स्थिती असली, तरी या उपग्रहातील अँटेना भारतभूमीचा वेध घेत राहणार.

२० एप्रिल २००९ रोजी 'इस्रो' ने श्रीहरीकोटा येथून 'रिसॅट-२' चे प्रक्षेपण केले. या उपग्रहाचे वजन तीनशे किलो आहे. त्याला पृथ्वीपासून ५५० किलोमीटर उंचीवर नेऊन



*'पीएसएलव्ही-सी १२' या प्रक्षेपणाद्वारे 'रिसॅट-२' चे झालेले उड्डाण*


परग्रहावरील जीवाणूंच्या अभ्यासासाठी पाठविण्यात आलेला बलून.

सोडण्यात आले आहे. तो विषुवृत्ताच्या दिसेने ४१ अंशाने कललेला आहे. तेथील कक्षेत तो पुढील तीन वर्षे पृथ्वीभोवती भ्रमण करत राहील आणि भारतीय भूभागाच्या व सागरी भागाच्या प्रतिमा पाठवित राहील. या प्रतिमांचा संशोधनासाठी, तसेच लष्करी कारणासाठी उपयोग केला जाणार आहे. भूकंप, चक्रीवादळ, महापूर अशा नैसर्गिक आपत्तींच्या व्यवस्थापनासाठी हा उपग्रह उपयुक्त ठरेल. 'इस्रो'चे अध्यक्ष डॉ. माधवन नायर यांनीही हा मुद्दा स्पष्ट केला आहे. आतापर्यंत अशा कामासाठी

डॉ. माधवन नायर



भारताला कॅनडाच्या उपग्रहांवर अवलंबून राहावे लागत असे, गेल्या वर्षी बिहारमधील कोसी नदीला आलेल्या महापुराच्या वेळीही त्याच उपग्रहांचा आधार घ्यावा लागला होता. यापुढील काळात 'रिसॅट-२' ची मदत होऊ शकेल.

या उपग्रहाचा शेतीसाठी अधिक उपयोग होऊ शकतो. किंबहुना कृषी क्षेत्र हाच उपग्रहाच्या केंद्रस्थानी आहे. खरीप पिकांवर निगराणी ठेवता येईल, अशा प्रकारेच या उपग्रहाची कक्षा निवडण्यात आली आहे. मोसमी पावसाच्या काळातील खरीप पिके भारतीय अर्थव्यवस्थेसाठी फार मोलाची आहेत. मोसमी पावसाने दडी मारली किंवा त्याची उघडीप लांबली, तर त्याचा परिणाम पिकांवर होतो. जमिनीतील आर्द्रता कळण्यासाठीही या उपग्रहाचा उपयोग होणार आहे. जमिनीच्या काही मीटर खालील ओलावा कळू शकणार आहे. थोडक्यात शेतजमीन, जंगले, किनारपट्टी, नदीचा प्रवाह-त्यांच्यामधील अडथळे आदी साऱ्यांची प्रतिमा हा उपग्रह टिपणार आहे. या साऱ्यांमुळे विवधि पिकांखालील आरेखन करण्यास हा उपग्रह उपयुक्त आहे.

## हेरगिरीसाठीचा उपग्रह ?

'रिसॅट-२' हा उपग्रह हेरगिरीसाठी नसल्याचे डॉ. नायर यांनी स्पष्ट केले असले, तरी त्यातील 'एसएआर' यंत्रणेमुळे तशी चर्चा होत आहे. या उपग्रहामुळे सीमाभागावर अवकाशातून देखरेख करता येईल, शत्रू प्रदेशातून होणाऱ्या घुसखोरीवर, तसेच संशयास्पद हालचालींवरही करडी नजर ठेवता येईल, असे म्हटले जात आहे आणि 'स्पाय सॅटेलाइट'असे त्याचे वर्णनही केले जात आहे. 'रिसॅट २ ' कडून सीमाभागांच्या प्रतिमा केव्हाही मिळू शकणार असल्याने या मुद्द्यात तथ्य नाही, असे म्हणता येत नाही. मात्र, या प्रतिमांचा अभ्यास लष्कराला आणि अन्य संरक्षण दलांना करावा लागेल आणि त्यानुसार प्रतिबंधात्मक कृती करावी लागेल. तसे झाले तरच या उपग्रहाचा लष्करी कामासाठी उपयोग झाला, असे म्हणता येईल. थोडक्यात उपग्रहाचा वापर हा अणुउर्जेसारखा दुहेरी आहे. त्याचा लष्करासाठीही वापर करता येतो आणि अन्य नागरी कार्यासाठीही. त्यामुळेच की काय 'रिसॅट-२' हा हेरगिरीसाठीचा उपग्रह नसल्याचा खुलासा डॉ. नायर यांनी केला आहे.

हेरगिरीसाठी उपग्रह ही काही नवीन संकल्पना नाही. अशा प्रकारच्या उपग्रहाचा विचार अमेरिका पन्नासच्या दशकात करीत होती. त्यावेळी कोणत्याही देशाने उपग्रहही अवकाशात




सोडला नव्हता. पुढे १९५७ मध्ये तत्कालीन सोव्हिएत संघाने 'स्पुटनिक' अवकाशात सोडला. आज अमेरिकेकडे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणारे 'स्पाय सॅटेलाइटस्' आहेत. मात्र, कुख्यात दहशतवादी ओसामा बिन लादेन जगाच्या कोणत्या कोपऱ्यात लपला आहे, हे या उपग्रहांना टिपता आलेले नाही ! म्हणूनच की काय दहा अब्ज डॉलरहून अधिक खर्चाचा अत्याधुनिक 'स्पाय सॅटेलाइट' विससित करण्याची मागणी तेथील संरक्षण विभागाने अध्यक्षांकडे केली आहे. हेरगिरीसाठीच्या उपग्रहांमध्ये चीन आणि जपान हे देशही मागे नाहीत. चीनने तर क्षेपणास्त्रभेदी यंत्रणाही विकसित केली आहे.संरक्षणासाठीही अवकाश तंत्रज्ञानाचा वापर वाढतो आहे, पण ही बाबही नवी नाही. अवकाश मोहिमांची सुरवातही लष्करी वर्चस्व मिळविण्याच्या हेतूनेच झाली होती. या साऱ्या चर्चेने 'रिसॅट-२' चे महत्व अधोरेखितच झाले आहे. हा उपग्रह भारताला अनेक अर्थाने उपयुक्त ठरणार आहे.

## परग्रहावरील जीवाणू ?

'इस्त्रो' च्या आणखी एक प्रयोगाची चर्चा गेल्या दोन-तीन महिन्यांपासून चर्चेत आहे. या प्रयोगाची संकल्पना प्रथम मांडली ती ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. जयंत नारळीकर यांनी. परग्रहांवरुन पृथ्वीवर जीवजंतूंचा वर्षाव होत असतो, असे एक गृहीतक आहे. त्याचा पडताळा घेण्यासाठी हा प्रयोग करण्यात आला. पृथ्वीवरील जीवसृष्टीबाबत दोन गृहीतक आहेत. पहिले गृहितक म्हणजे सजीवसृष्टी येथेच निर्माण झाली. दुसरे गृहीतक म्हणजे परग्रहावरील जीवसृष्टीतून येथील जीवसृष्टी उदयाला आली. अवकाशातून पृथ्वीवर जिवाणू येतात, असे दुसरे गृहीतक मानते.

ही बाब सिद्ध करण्यासाठी प्रत्यक्ष अवकाशातूनच नमुने गोळा करण्याचा प्रयोग भारतात झाला. पृथ्वीवर आढळणारे जिवाणू, धूळ आणि वादळामुळे पृथ्वीपासून दहा किलोमीटर वर जाऊ शकत नाहीत. त्यावरील हवेत जर जिवाणू सापडले तर ते पृथ्वीवरुन आलेले असण्याची शक्यता फारच कमी असते. त्यामुळेच पृथ्वीपासून दहा किलोमीटर अंतरावर जिवाणू आढळतात काय हे पाहण्यासाठी हा प्रयोग करण्यात आला. त्यासाठी एक मोठ्ठाला फुगा (बलून) अवकाशात सोडण्यात आला. द्रवरूप निऑनमध्ये बुडविलेल्या सोळा नळकांड्या त्याला जोडल्या गेल्या होत्या. विशिष्ट उंचीनंतर सर्व नळकांड्या उघडल्यानंतर फुगा त्यांपासून वेगळा करण्यात आला आणि पॅराशूटच्या सहाय्याने नळकांड्यांना खाली आणले गेले. या नळकांड्यांचा अभ्यास प्रयोगशाळेत करण्यात आला. त्यांमध्ये जिवाणू आढळले. पृथ्वीपासून दहा किलोमीटरच्या वर जिवाणू आढळतात, हे सिद्ध झाले. २००१ मध्ये प्रथम हा प्रयोग करण्यात आला. हे जिवाणू पृथ्वीवरीलच आहेत की परग्रहावरील हे स्पष्ट करण्यासाठी हा प्रयोग सतत करावा लागणार हे लक्षात आले. त्यानुसार तो पुन्हा एकदा करण्यात आला. त्यातही जिवाणू आढळले आहेत. अर्थात हे जिवाणू परग्रहांवरुन आले असावेत, असे ठामपणे म्हणता येत नाही. त्यामुळे हा प्रयोग परत केला जाऊ शकेल.

या प्रयोगाचे महत्व आगळे आहे. पृथ्वीवर दहा

**गुरू-शिष्याची जोडी**



डॉ. जयंत नारळीकर    प्रो. फ्रेड हॉयेल




डॉ. मायकेल मेयर



डॉ. योगेश शौचे

किलोमीटरच्या वर पुढे जिवाणू आढळतात हे तर त्यात दिसले आहेच हे जिवाणू बाह्य अवकाशातून आल्याचे स्पष्ट झाल्यास अन्यत्र कोठेतरी जीवसृष्टी आहे, या प्रयोगातून एक ठळक बाब पुढे येईल. ती म्हणजे पृथ्वीवरील अतिसूक्ष्म जीव त्याच्यावरील दहा किलोमीटरच्या पुढेही असू शकतात. त्यामुळे त्याच्या अभ्यासालाही चालना मिळू शकेल.

'इस्रो', पुण्यातील आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिक केंद्र (आयुका), मुंबईतील टाटा मूलभूत संशोधन केंद्र (टीआयएफआर), राष्ट्रीय पेशीविज्ञान संस्था (एनसीसीएस), हैदराबाद येथील रेण्वीय जीवशास्त्र संस्था (सीसीएमबी) या प्रयोगशाळांनी एकत्रितपणे हा प्रयोग केला. दुसऱ्या प्रयोगाच्या वेळी फुग्याबरोबर सोडण्यात आलेल्या नळकांड्यांत जिवाणू आढळतात किंवा कसे हे 'सीसीएमबी' आणि 'एनसीसीएस' मध्ये तपासले गेले. पृथ्वीपासून ४१ किलोमीटरची हवा असलेल्या एका नळकांड्यात सूक्ष्मजीव असल्याचे 'एनसीसीएस' या दोन्ही ठिकाणी बारा जिवाणू मिळाले. त्यापैकी नऊ आधी माहीत असलेल्या प्रजाती होत्या, तर तीन पूर्णपणे नव्या. या प्रयोगाची आणखी पुनरावृत्ती झाल्यानंतर कदाचित परग्रहावरील जीवसृष्टीबाबत ठाम निष्कर्ष काढता येईल.

## शोध सूर्यमालेबाहेरील ग्रहाचा

या अफाट अशा विश्वात आपण एकाकी आहोत की आणखी कोणी आहे, याचा शोध माणूस खूप आधीपासून घेत आहे. त्यासाठी तो वेगवेगळ्या ग्रहांचा वेध घेतोय, परग्रहावरील जीवसृष्टीचाही वेध घेतोय. वर उल्लेख केलेला प्रयोग हा त्याच प्रयत्नांचा एक भाग. असाच एक प्रयत्न काही खगोलशास्त्रज्ञांनी केला आहे. मात्र, तो आहे नव्या ग्रहाबाबतचा. सूर्यमालेबाहेर पृथ्वीसारखाच एक उपग्रहाचा शोध लागल्याचे युरोपीयन खगोलशास्त्रज्ञांनी नुकतेच जाहीर केले आहे.

हा उपग्रह पृथ्वीपासून २०.५ प्रकाशवर्ष दूर असल्याचे शास्त्रज्ञांनी म्हटले आहे. प्रकाशवर्ष म्हणजे एक वर्षात प्रकाशाने कापलेले अंतर. प्रकाश एका सेंकदाला तीन लाख किलोमीटर वेगाने जातो. एका वर्षात तो साधारणतः दहा हजार अब्ज किलोमीटर अंतर कापतो. म्हणजेच एक प्रकाशवर्ष म्हणजे दहा हजार अब्ज किलोमीटर. तर शास्त्रज्ञांना आढळलेला हा उपग्रह पृथ्वीपासून २०.५ प्रकाशवर्षे दूर आहे. तो लिब्रा आकाशगंगेतील आहे. हा उपग्रह पृथ्वीपेक्षा फार जड नाही. त्याचे वस्तुमान पृथ्वीच्या वस्तुमानापेक्षा दोन ते अडीच पट असेल, असे जिनिव्हा विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी म्हटले आहे. हा उपग्रह सूर्याच्या जवळ आहे. तो पृथ्वीसारखाच खडकाळ असण्याची शक्यता शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे. युरोप आणि अमेरिकेतील खगोलशास्त्रज्ञांच्या बैठकीत जिनिव्हा वेधशाळेचे संशोधक मायकेल मेयर यांनी या उपग्रहाची माहिती दिली.

पृथ्वीबाहेरील जीवसृष्टी आणि सूर्यमालेबाहेरील उपग्रह यांबद्दल अशा प्रकारचे नवनवे संशोधन पुढे येत असल्याने या अफाट विश्वात आपण एकटे नसू, ही जाणीव बळकट होऊ शकेल.

■■■

# कायद्याचा 'भूप्रदेश'

# स्त्रीवादी भिंगातून



मूळ इंग्रजी लेख :

**कल्पना कण्णाबिरन**

स्वैर मराठी रुपांतर :

**डॉ. विद्युत भागवत**

☞ **गुन्हेविषयक न्यायाचा जो गाभ्याचा घटक आहे तो म्हणजे, जी काही दुखापत झाली आहे त्या दुखापतीचे मोजमाप आणि मूल्यमापन केले जाते. परंतु लैंगिक अत्याचाराच्या केसेस संदर्भात विशेषतः सामूहिक हिंसाचाराच्या संदर्भात हे खोलवर समस्यात्मक आहे. न्याय मिळविण्यासाठी ज्या अत्यंत पायाभूत यंत्रणा असतात त्यांच्यापाशी पोहोचणे अस्तित्वात नाही अशी परिस्थिती येते आणि जेव्हा राज्यसंस्थासुद्धा हिंसा घडविणाऱ्यांबरोबर हातमिळवणी करते तेव्हा प्रश्न बिकट होतो.**

## लैंगिक हल्ला (हिंसा/प्रहार) आणि कायदा

गेली ३५ वर्षे लैंगिक हल्ला हा प्रश्‍न भारतीय कोर्टांना ग्रासतो आहे. सुरुवातीला पिनल कोडमध्ये बलात्कार हा गुन्हा कोणत्या प्रकारे रचला गेला आहे ही समस्या होती. तर त्याही पेक्षा अधिक कठीण समस्या होती ती म्हणजे बलात्कार कोठे झाला त्या जागेसंदर्भात आणि स्त्रियांच्या लैंगिकत्वाने घडलेल्या शरीरासंदर्भात भारतामध्ये असणार्‍या सामाजिक कल्पनात्मकते संदर्भात! अगदी सुरुवातीला मथुरा (एक कष्टकरी आदिवासी मुलगी) आणि रमिझा बी (एक कष्टकरी मुस्लीम मुलगी) यांच्या



संदर्भात स्त्रीवादी व्यक्ती गुन्हेगारी कायद्याशी भिडल्या आणि विशेषतः पोलीस कोठडीतील हिंसाचार आणि बलात्कार या प्रश्‍नांशी त्यांना होड घ्यावी लागली. या दोन केसेसची पुर्नतपासणी केली तर लक्षात येते की, लैंगिकतेची एकात्मता अगदी गुन्हेविषयक न्यायाच्या क्षेत्रातसुद्धा बहुविध समाजातील विविध गटांमध्ये असणार्‍या उतरंडीशी जोडलेली आहे. स्त्रियांच्या देहांविषयी असणार्‍या चर्चेची वीण प्रतिष्ठा समूह, वा गट आणि भारतीय स्त्रीत्व यांच्या चर्चा विश्‍वांमध्ये ज्या तर्‍हेने गुंतलेली आहे ते एक अत्यंत गुंतागुंतीचे वास्तव आहे. या वास्तवाचे गाठोडे सोडविले तरच भिन्न वर्ग,जाती, समूह आणि प्रदेश यामधील स्त्रियांना एकात्मता आणि न्याय यांची जाणीव देता येईल.

या प्रकरणामध्ये मी भारतातील लैंगिक हल्ल्याचे सातत्य तपासण्याचा प्रयत्न करत आहे. हे करताना मी दोन ध्रुवांचा खूणगाठ म्हणून विचार करते आहे. एकीकडे कालक्रमाचा विचार आणि दुसरीकडे संदर्भात्मक बहुविधतेचा विचार येथे केला आहे. फाळणीच्या काळात स्त्रियांनी घेतलेल्या अनुभवांपासून जे उत्तरपूर्व भारतातील स्त्रियांवर सैनिक दलाने केलेल्या हल्ल्यांपर्यंत किंवा रमिझा बी, मथुरा यांच्या पोलीस कोठडीतील बलात्कारापर्यंत आणि गुजरातमधील २००२ साली केल्या गेलेल्या मुस्लीम स्त्रियांवरील सामूहिक हल्ल्यापर्यंत आपल्या सर्वांच्या लक्षात असे येते की, पुरुषसत्ताकतेचे प्रतिनिधीमंडळ कुटुंब, समूह आणि सार्वजनिक संस्था या सार्‍यांमधून मागेपुढे होत सरकत असते. यातून परिणाम म्हणून स्त्रियांच्या देहाविषयी पुन्हा पुन्हा सातत्याने खोलवर रुजलेल्या विचारप्रणालीतून मते मांडली जातात आणि अन्वयार्थ लावले जातात. अशा मतप्रदर्शातून आणि आकलनातून स्त्रियांना त्यांच्या जाती, समूह, जमाती आणि वर्ग यामध्ये बंदिस्त केले जाते. त्यामुळे शेवटी कोणतीही स्त्री कधीही पूर्णतः व्यक्ती म्हणून, हल्ला केली गेलेली व्यक्ती म्हणून कधीच राहू शकत नाही. अशी स्त्री नेहमीच पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्थेची ठेव या स्वरुपात सुरुवातीपासूनच बघितली जाते. आणि मग अशी स्त्री हिंसक पद्धतीने उल्लंघित केली गेली किंवा केली गेली पाहिजे असेही बघितले जाते.

गुन्हेगाराविषयक खटले कोर्टाच्या ज्या अवकाशात स्थित असतात तो अवकाश एका व्यापक, अधिक धूसर परंतु तरीही निश्‍चित अशा स्वरुपाच्या वा गटाच्या व्यापक संदर्भात जोडलेला असतो. त्यामुळे लैंगिकतेकडे जाण्याची वाट आणि लैंगिकतेचे



उल्लंघन याविषयी जे दावे त्या त्या समूहात केले जातात त्यांना एक तर्‍हेची अधिकृतता दिली जाते. मग ते दावे कायदेशीर असोत वा नसोत. लैंगिक हिंसाचाराच्या संदर्भात कोर्ट आणि भिन्न समूह यांची हातमिळवणी असते किंवा गटबंध असतात. ह्या गटबंधाची अभिव्यक्ती मानवी जीवनातील इतर क्षेत्रांपेक्षा कितीतरी सुसंगतपणे आणि संपूर्ण स्वरुपात केलेली दिसते. कोर्टांचा कल लैंगिक नियंत्रणाच्या संदर्भात भिन्न समूहांमध्ये जे काही नियम असतात त्यांना घट्ट धरून ठेवण्याकडे असतो. कोर्ट अशा तर्‍हेने समूहांच्या नियंत्रणाचे प्रतिबिंब आपल्या

कृतीतून अभिव्यक्त करताना कधी अंग काढून घेण्याची रणनीती आत्मसात करतात तर कधी संदिग्ध वा दुटप्पी भाषा वापरतात. या दोहोंमध्ये एक तऱ्हेचा चर्चाविश्वात्मक नातेगोते संबंध असतो. हा गोतावळा संरचनात्मक गोतावळा असतो आणि त्यांचा एकमेकांसंदर्भातील परस्पराश्रय स्वच्छपणे लक्षात घेण्याजोगा असतो. हा परस्पराश्रय, कायद्यामध्ये विशेषतः गुन्हेगारी कायद्यामध्ये माणसाचे मन आणि शरीर यांच्यातील द्वैतीकरणाविषयी जी भूमिका असते त्यापेक्षा अगदी अंर्तविरोधी स्वरुपाचा असतो.

पंचायती, पोलीस कोर्ट, तुरुंगाचे प्रशासन आणि शवविच्छेदनाचे विज्ञान यांची भारतातील संरचना अशी आहे की, ज्यामधून अक्षरशः स्त्रिया वगळलेल्या असतात. भिन्न समूह किंवा जात पंचायत यामध्ये क्वचितच एखादी स्त्री असते आणि सुप्रिम कोर्टामधील जज्ज या स्थानावर स्त्रिया नाहीतच. पोलीस दलामध्ये वरिष्ठ पदांवर स्त्रियांची संख्या ४ टक्के नाही आणि तुरुंगामध्येसुद्धा महिला अधिकारी ज्या आहेत त्या कैदी स्त्रियांच्या सुविधांच्या संदर्भात आहेत. या संरचनेतून जी चर्चाविश्वात्मक घडण घडतो तीमधून अर्थातच स्त्रिया वगळल्या जातात.



कोर्ट नावाच्या चौकटीची पुनर्घडण करण्यासाठी अनेक संघर्ष या संदर्भात झाले आहेत. भारतामध्ये गेल्या ३० वर्षांमध्ये कोर्ट रुमच्या मर्यादेपलीकडे अनेक खटले गेलेले दिसतात. रमिझा बी हिच्या पोलीस कोठडीतील बलात्काराची केस, त्या संदर्भात तिचा झालेला छळ आणि मृत्यू याविषयी मुक्तदार चौकशी आयोग यांनी जो तपास केला तो तपास म्हणजे १९७९ साली न्याय मिळवण्यासाठी केलेला अगदी सुरुवातीचा झगडा म्हणता येईल. त्यानंतर २३ वर्षांनी नागरिकाच्या ट्रायब्युनलने मुस्लीम समाजातील लोकांवर गुजरातमध्ये जो हिंसाचार झाला त्याचा तो तपास केला गेला तो अगदी अलीकडचा मैलाचा दगड ठरावा असा संघर्ष होय. या दोन झगड्यांच्या मधल्या काळामध्ये कोर्टांनी अनेकदा लैंगिक हल्ला करणाऱ्या लोकांवर खटले चालविले. गुन्हे शाबीत केले आणि काही वेळा गुन्हेगारांना सोडविले आहे. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग आणि स्त्रियांसाठी राष्ट्रीय आयोग यांनी काही विशिष्ट घटनासंदर्भात हस्तक्षेपही केले आहेत.



## सहमती वा 'संमती' या संकल्पनेसंदर्भातील समस्या

अगदी सुरुवातीच्या वसाहतवादी मांडणीमध्ये बलात्काराचा गुन्हा हा भिन्न लिंगीय, संमती नसलेल्या, पुरुष आणि स्त्रीचा- अशी स्त्री की जी त्या पुरुषाची पत्नी नाही- त्यांच्या संभोगाशी जोडला आहे. या तऱ्हेच्या चौकटीमध्ये लैंगिक हिंसाचार आणि लैंगिक संभोग हे स्त्री आणि तिचे त्या पुरुषाशी असणारे नाते अशा व्यक्तिनिष्ठ स्थानाशी जोडलेले दिसते. इतकेच नाही तर स्त्री पत्नी असेल- मग ती अगदी बालिका असली- तरीसुद्धा पुरुषाला तिच्याशी संभोग करण्याचा हक्क होता. त्यामुळे अशा विचार चौकटीमध्ये दुखापत, इजा किंवा हिंसाचार, लैंगिकतेची परवानगी आणि पतीपत्नींचे वैध नाते या आवरणाखाली झाकला जात होता.वासाहतिक अधिकारी, इंग्रज स्त्रिया आणि पौर्वात्य स्त्रिया या वयात कधी येतात या मुद्यांमध्ये भेद करतात. म्हणजेच लैंगिक गुन्ह्याच्या संकल्पनेमध्ये त्या काळात ब्राह्मणी पुरुषसत्ताकतेच्या अस्तित्वात असणाऱ्या विचारप्रणाली कशा सामावल्या होत्या हे दिसते. इंग्लिश स्त्रियांवर त्यांची संमती असो नसो, बारा या वयोमर्यादेच्या आत लैंगिक

गुन्हा ठरत होता, त्याची वयोमर्यादा पौर्वात्य स्त्रियांमध्ये मात्र दहा ठरविली गेली.

वसाहतवादी कायद्यांनी अगदी १८१२ मध्येच विवाहातंर्गत व्यभिचाराला खासगी जगातील चूक असे ठरविले आणि अविवाहित व्यक्तींचे लैंगिक संबंध यांना मात्र बलात्कार नावाच्या सार्वजनिक गुन्ह्याच्या चौकटीत घातले. बलात्काराला त्या काळात अत्यंत हिणकस गुन्हा असे मानले होते आणि त्याचा निकष प्रत्यक्ष संभोग आणि त्यातून कुटुंबातील 'घड्याचे भ्रष्टीकरण' तसेच समुहाच्या प्रतिष्ठेला डाग लागणे असे सारे होते. बलात्कारासाठी ज्या शिक्षा होत्या त्यामध्ये सुद्धा स्तरीकरण होते, ते सामाजिक उतरंडीनुसार होते. गुन्ह्याच्या तीव्रतेनुसार नव्हते. चांडाळ किंवा तत्सम कनिष्ठ जातीतील पुरुषाने सक्तीने उच्च जातीय स्त्रीवर बलात्कार केला तर, तो मोठा गुन्हा ठरत होता. कारण तिच्या उच्च कुलीन चौकटीच्या प्रतिष्ठेचा तो अवमान ठरत होता. परंतु अशी पवित्र न मानली गेलेली कनिष्ठ जातीतील स्त्री, जिच्यापाशी जाण्याला कोणत्याही पुरुषाला मज्जाव नसल्याने तिच्यावर गुन्हा घडला तर तिला होणारी हानी कमी मानली जाऊन गुन्हा करणाऱ्या पुरुषाला मर्यादित शिक्षा होत असे. जे एफ. थॉमस या मद्रास प्रेसिडेंसीतील न्यायमूर्तीनेसुद्धा असा तर्क मांडला आहे की, 'उच्च कुलीन स्त्री कनिष्ठा जातीतील पुरुषाशी झालेल्या सक्तीच्या संभोगानंतर गुन्हे यामध्ये विभेदन केले. परंतु हे विभेदन प्रत्यक्षामध्ये भारतातील उच्चकुलीन कुटुंबांमध्ये खासगी क्षेत्रात मलीन झालेल्या स्त्रीला मृत्युशिवाय गत्यंतर नाही अशा चौकटीमुळे मोडकळीस आले.

१८९० मध्ये फुलमणी नावाची ११ वर्षांची मुलगी– जी अद्यापही वयात आली नव्हती– तिच्यावर ३५ वर्षांच्या तिच्या नवऱ्याने बलात्कार केल्यावर मृत्यू पावली. तेरा तास झालेल्या रक्तस्त्रावानंतर फुलमणी मरण पावली. फुलमणीच्या कुटुंबातील स्त्रियांनी हे दाखवून दिले की, अगदी जातीच्या चौकटीतसुद्धा फुलमणीशी पाळी येण्यापूर्वी पतीने संभोग करू नये अशी दंडसंहिता असतानाही चोरून सक्तीने हा गुन्हा घडला होता. परंतु ब्रिटिश जज्जने मात्र नव्याने दिलेल्या स्पष्टीकरणाला खरे मानले. जज्ज विल्सन त्यावेळी असे म्हणतात की, 'हे माझे



कर्तव्य आहे की, या पुरुषाला संभोग केल्याने मुलगी मरून जाईल याचे ज्ञान होते असे म्हणायला सबळ आणि समाधनकारक पुरावा दिसत नाही. म्हणून गुन्हे करणाऱ्याला अशा सर्व घटनांमध्ये संशयाचा फायदा दिला पाहिजे.' म्हणजे स्त्रीच्या बळी जाण्यापेक्षासुद्धा पुरुषाच्या समर्थनात्मक विधानांना महत्त्व दिले गेले.कायद्याची रचना सुद्धा अशी होती की, ज्यामुळे भारतातील चालीरीती संरक्षित राहाव्यात. इतकेच नाही तर बालिका असणाऱ्या स्त्रीच्या देहावर पुरुषाचा असणारा अधिकारही अबाधित राहावा असा हा कायदा होता. या खटल्यामध्ये जी ज्युरी होती तीमध्ये ६ हिंदू, २ युरोपीयन आणि १ मुस्लीम व्यक्ती होती. शेवटी फुलमणीच्या नवऱ्याला आपल्या अविवेकी धसमुसळ्या कृतीबद्दल १ वर्षाची सक्तमजुरीची कैद झाली.

फुलमणीच्या मृत्यूनंतर डॉक्टर असणाऱ्या ४४ स्त्रियांनी सुधारणावादी चळवळीचा भाग म्हणून संमती वय वाढवावे यासाठी जो प्रयत्न केला त्यातून, लहान वयात लग्न झालेल्या, मरण पावलेल्या किंवा बलात्कारामुळे तीव्र जखमा झालेल्या स्त्रियांच्या याद्या सादर केल्या. त्या काळात नवऱ्यांनी बलात्कारित केलेल्या कितीतरी मुलींनी तक्रारी नोंदविल्या आणि त्या मुलींच्या आयांनी समाजात धिक्कार झाला तरी चालेल परंतु कोर्टात मुलींच्या बाजूने जबान्या दिल्या. मॅजिस्ट्रेटने मात्र साधारणतः अशा मुलींना आपल्या प्रौढ वयातील नवऱ्याच्या हातातच परत दिले आणि असेच वर्षानुवर्षे चालत राहिले.

बरोबर १०० वर्षानंतर, १९७१ साली भारतातील कायदेविषयक आयोगाने आपल्या ४२ व्या अहवालात सेक्शन ३७५ मध्ये काही बदलांची शिफारस केली. मधल्या काळात संमतीचे वय १५ वर्षांपर्यंत वाढविले गेले होते– त्याला सेक्शन ३७५ अपवाद होता. या सर्व चर्चांमध्ये विवाहांतर्गत बलात्काराचा प्रश्न चिकित्सक स्वरुपाचा होता. १९७१ च्या काळातील ४२ व्या अहवालात सेक्शन ३७५ या विभागातून विवाहांतर्गत बलात्कार बाहेर काढण्याची शिफारस दिली गेली आणि त्याचे स्पष्टीकरण देताना असे मांडले गेले की, नवऱ्यापासून विभक्त राहणारी पत्नी ही बलात्कार या संदर्भात या सेक्शनच्या अंतर्गत

पत्नी म्हणून मानली जाणार नाही. एका नव्या सेक्शनच्या अंतर्गत पतीच्या पत्नीवरील बलात्काराच्या संदर्भात गुन्ह्याचे आकलन केले जावे अशी त्यात शिफारस होती. १२ वयाच्या आतल्या बालिका – पत्नीला बलात्कार सोसावा लागल्यास तीव्र शिक्षा आणि १२ ते १५ वयोगटातील पत्नीवरील बलात्कारासंदर्भात मात्र किमान शिक्षा अशा या शिफारशी होत्या.

४२ व्या अहवालाचे महत्त्वाचे योगदान म्हणजे कायदेविषयक आयोगाने कस्टडीमधील बलात्कार हे कायद्याच्या चौकटीत आणले आणि त्याची एक व्याख्या केली. अर्थात या शिफारशींनी लगेच कायद्यात सुधारणा झाली असे दिसत नाही. उलट त्यानंतरच्या दशकात कस्टडीतील बलात्कार या प्रश्नाभोवती तुंबळ युद्धे माजली. विवाहांतर्गत बलात्काराच्या प्रश्नाला त्यानंतर काही काळ थांबावे लागले. १९८३ साली लोकसभेमध्ये झालेल्या वादविवादांमध्ये विवाहांतर्गत बलात्कार आणि बालविवाह यावर साद्यंत चर्चा घडल्या आणि बहुतांश सदस्यांनी अगदी बालविवाहातील असले तरी विवाहांतर्गत बलात्काराला गुन्हा मानण्यास विरोध केला.

### भिन्न प्रकारचे कोर्ट : रमिझा बी आणि मुक्तादार आयोग

मार्च १९७८ मध्ये रमिझा बी नावाच्या १८ वर्षाच्या मुलीवर ४ पोलिसांनी गँग करून बलात्कार केला आणि तिच्या नवऱ्याला मरेपर्यंत बदडून काढले. रमिझा बीचा बलात्कार आणि अहमद हुसेन याचा मृत्यू या विरोधात सार्वजनिक निषेध घडला. क्रुद्ध अशा लोकांच्या जमावाला पोलिसांनी बेकायदेशीर लोकांची गर्दी असे ठरवून अनिर्बंधपणे गोळीबार केला, ज्यामध्ये आणखी काही माणसे जिवे मारली गेली. गोळीबार झाल्यानंतर चौकशी आयोग नेमला गेला आणि आंध्र प्रदेशातील हायकोर्ट जज्ज यांना 'एक पुरुषाचा आयोग' करून नेमले गेले. या आयोगासाठी संदर्भ होता अहमद हुसेन याच्या मृत्यूची चौकशी करणे आणि रमिझा बीचा बलात्कार. ज्या पोलिसांवर आरोप होता त्यांना संरक्षण देण्यासाठी सरकारने आटोकाट प्रयत्न केले. अहमद हुसेन हा हृदय बंद पडून मेला हे सिद्ध करण्यासाठी






शवविच्छेदनशास्त्र तज्ज्ञांना खिशात घातले गेले. न्यायमूर्ती मुक्तदार यांच्या लक्षात आले की, बलात्कार, हल्ला आणि खून या संदर्भात हे चारही पोलिस अपराधी आहेत. त्यांनी अशी शिफारस केली की, या गुन्ह्यांसाठी पोलिसांना शिक्षा दिली पाहिजे. या संदर्भात तपास केला गेला आणि आरोपपत्र तयार केले गेले. परतु त्यानंतरही दोषी मंडळी सुप्रिम कोर्टाकडे गेली अणि त्यांचा तर्क असा होता की, आंध्र प्रदेश हायकोर्टमधील कमिशन हे एका पुरुषाचे असल्यामुळे त्यामध्ये पूर्वग्रह असण्याची शक्यता आहे. मग हा सर्व मामला कर्नाटकातील रायचूर येथील जिल्हा पातळीवरील कोर्टात गेला आणि तेथे हे चारही पोलीस सुटले.

हा खटला चालू असताना राज्यसंस्थेने अत्यंत प्रयत्नपूर्वक रमिझावर झालेल्या गुन्ह्याचे अस्तित्व पुसण्याचा प्रयत्न केला. अनेक राजकीय पक्ष, नागरी स्वतंत्रता गट आणि नागरी हक्कांसाठी लढणाऱ्या के. जी. कण्णाबिनर सारख्या वकिलांचा पाठिंबा असतानासुद्धा रमिझावरील बलात्कार आणि नवऱ्याचे छत्र हरविणे यामुळे सोसावा लागणारा धक्का याला कायदेशीर अहवालामध्ये विकृत केले गेले. आयोगामध्ये रमिझा बीच्या विरोधात आणि गुन्हेगार पोलिसांच्या संरक्षणार्थ जे दस्तऐवज आले त्यामध्ये रमिझा बीचा वेश्याव्यवसाय प्रश्नांकित केला गेला. अहमद हुसेन या मृत्यू पावलेल्या माणसाशी तिचे लग्न वैध होते की अवैध होते यावर चर्चा घडल्या आणि अहमद हुसेन हा रमिझा बीचा भडवा म्हणून काम करत होता की नाही याबद्दलही बोलले गेले. डिफेन्स देणाऱ्यांची रणनीती अशी होती की, रमिझा बीचे चारित्र्य, तिचा अप्रामाणिकपणा आणि तिचे अनैतिक व्यवसाय यावर भर देण्याची! परिणामतः अत्यंत हिंसक अशा लैंगिक हल्ल्याला तोंड देऊन जिवंत राहिलेली रमिजा बी तिच्यासमोर आणलेल्या परेडमधील पुरुषांना 'मी ओळखत नाही' असे पुन्हा पुन्हा म्हणत राहिली.

बलात्काराविषयी जे प्रश्न उभे केले गेले ते प्रश्न सांस्कृतिक व्यवहाराच्या योग्य ज्ञानासंदर्भातील प्रश्नांमध्ये मिसळले गेले. त्यामुळे उभ्या केलेल्या प्रश्नांमध्ये चोरीचा आरोप तसेच बाहेरच्या समाजामध्ये असणाऱ्या संपत्तीशी 'अनैतिक' समाजाचे असणारे नाते याविषयी सूचकता आणि



अनैतिकतेच्या बरोबरच फिरतीचे आरोप असे सारे एकत्र होते. म्हणजे ज्या बसमधून रमिजा बी वेश्याव्यवसाय करणाऱ्याकडे गेली, जी रिक्षा तिचे वाहन होती, ज्यामधून तिने वेश्या व्यवसाय केला अशा सर्वांबद्दल बरीच चर्चा घडविली गेली. ही चर्चा विश्वात्मक आणि खरे तर राजकारणी रणनीती रमिझा आणि अहमद हुसेन यांच्यावरील हल्ल्याविषयी जे विधान केले गेले होते, त्यांना विस्कटून टाकण्यात यशस्वी झाली. सतत पुढे मागे होणाऱ्या या चर्चांमुळे रमिझावर आरोप केल्या गेलेल्या अनैतिकतेच्या आणि तिच्यावर झालेल्या बलात्काराच्या तथ्यांमधील सीमारेषा धूसर होत गेल्या.

या रणनीतीचा दुसरा भाग असा होता की, फक्त रमिझा नावाच्या व्यक्तीची ती 'अनैतिकता' नव्हती असे प्रस्थापित करणे. कुतुबुद्दीन अन्वर हुसेन, घौसिया, रमिझा इत्यादी सर्वांना ज्या प्रकारचे जबाब द्यायला लावले त्यातून हा समाजच कसा अनैतिक आहे हे सिद्ध केले गेले.

ही सर्व माणसे ज्यांची साक्ष घेतली जात होती ती समाजामध्येच राहत होती. या तीनही साक्षींमधून असे बाहेर आले की, रमिझाची सासू मालनबी ही नियमितपणे नंदिकोटकूरहून मुलींना हैद्राबादला पाठवित असे आणि तेही अहमद हुसेन या रमिझाच्या नवऱ्याच्या साह्याने. अन्वर हुसेन हा १४ वर्षे या व्यापारात होता आणि आपल्या १६ व्या वर्षापासून त्याने धंदा सुरू केला. त्याचा इमाम साहेब म्हणजे मालनबीचे बंधू आणि त्याची पहिली बायको कासिमबी तसेच शहापीर आणि साहेब, मालनबीचे इतर मुलगे आणि अहमद हुसेन या साऱ्यांशी परिचय होता. घौसिया ही मानलबीची कन्या, अन्वर हुसेनची बायको होती. अन्वर हुसेनच्या मते ही सर्व मंडळी वेश्या व्यवसायात होती.

हा सर्व 'धंदा' कोणत्या प्रकारे संघटित केला होता? अन्वर हा आपले काम पार पाडताना सतत पोलिसांना तोंड देत असे. तो बऱ्याच वेळा त्यांना मामूल म्हणजे लाच देत असे. आणि १४ वर्षांमध्ये त्याच्यावर दोन वेळा फक्त आरोपपत्र ठेवले गेले. एकदा आणीबाणीच्या काळात- जेव्हा सर्वच भडवे पकडले गेले होते तेव्हा. त्याच्या मते, पोलीस भडव्यांना आरोपपत्र अशा वेळीच देत की, जेव्हा भडवे मंडळी लाच देण्यास नकार देत असत. त्याचे रोख उत्पन्न प्रत्येक गिऱ्हाईकामागे २० रु. असे होते. ज्या स्त्रियांवर वेश्या व्यवसायाचे आरोपपत्र ठेवले जात असे त्यांच्याकडूनही तो भरपाई म्हणून- ज्याला पैरवी म्हणतात- असे पैसे घेत असे. सर्वसाधारणतः अशा केसेस कबुलीजबाब देऊन संपविल्या जात असत. कोर्टापर्यंत क्वचितच जात. अन्वर हुसेनने स्वतःच्या हिमतीवर आपण आयोगासमोर साक्ष देत आहोत असे मांडले. अन्वर हुसेनच्या साक्षीनुसार इमामसाहेब आणि नबी साहेब यांच्याकडून रमिझाबीला त्याच्यापर्यंत पोचविले गेले होते. त्याने तिला दोन वेळा काम दिले आणि नबी साहेबांना त्याच्या मिळकतीतील १५० रु. दिले. अहमद हुसेन हा जेव्हा कार्यरत झाला तेव्हा मात्र अन्वरने रमिझाला कधी कामाला लावले नाही.

घौसियाची साक्ष अन्वर हुसेनच्या साक्षीपेक्षा विरोधी स्वरुपाची दिसते. तिच्या स्वतःच्या स्थानाबद्दल आणि कामाबद्दल तिच्या साक्षीमध्ये धूसरता दिसते. घौसियाचे लग्न अन्वर हुसेन या भडव्याशी कमिशनपुढे येण्याच्या आधी सहा महिन्यांपूर्वी झाले. नंदिकोटकूर या गावातील गाववाली मालनबी बरोबर रझिमाच्या बरोबरीने तिला आणले गेले. एकीकडे ती म्हणाली मला रमिझा बी व्यक्ती म्हणून माहीत नाही. तर दुसरीकडे तिने रमिझा आणि अन्वर यांची काही देवाणघेवाण होती की नाही याबद्दल आपल्याला काही माहिती नाही असे सांगितले. घौसिया असे सतत म्हणत राहिली की, 'अन्वरने मला सांगायला सांगितले



की... की मी अन्वरच्या मार्फत वेश्या म्हणून काम करते... पण मी पैसा घेऊन कुठल्याही पुरुषाबरोबर झोपले नाही. ... मला वेश्या व्यवसाय आवडत नाही.'

रमिझाची साक्ष काहीशी घौसियासारखीच आहे. पढविलेल्या पोपटाप्रमाणे, या दोघी अन्वरच्या सांगण्यावरून पोलिसांच्या धाकाखाली आयोगापुढे आपली साक्ष देत होत्या. रमिझासुद्धा घौसियाप्रमाणे सतत म्हणत राहिली की, 'मी कोणत्याही इतर पुरुषाबरोबर कधी झोपले नाही. मी प्रतिष्टीत कुटुंबामध्ये जन्मले. माझ्या कुटुंबाच्या इज्जतीसाठी मी असल्या भानगडीत पडत नाही!'

अहमद हुसेनच्या पहिल्या पत्नीचा काका कुतुबुद्दिन हा स्वतः गवंडी होता आणि मासेविक्री आणि आंबेविक्रीचा व्यवसाय करत होता. त्याने सांगीवांगीवर आलेल्या वावड्यांच्या आधारे रमिझाबी ही वाया गेलेली बाई आहे असे साक्षीमध्ये सांगितले. मी काही पाहिले नाही परंतु असे ऐकले आहे की, रमिझा दुसऱ्या लग्नानंतर सत्तार, रहमतुल्ला अशा पुरुषांबरोबर भरकटत होती. अशा तऱ्हेने माणसांच्या खऱ्याखुऱ्या जिवंत साक्षीऐवजी ऐकीव बाबड्यांच्या साक्षींना महत्त्व दिले गेल्याने रमिझावर आलेल्या बलात्काराचा अनुभव कुतुबुद्दिनच्या आग्रही विधानांमध्ये विरघळविला गेला.

अंतिमतः या चौकशीमधील अतिशय हादरवून टाकणारा प्रसंग म्हणजे बुरखा घातलेली रमिझा शांतपणे उभी होती आणि एकापाठोपाठ एक पुरुष साक्षीदाराच्या पिंजऱ्यात येऊन रमिझाबीच्या बरोबर संभोग केल्याचे, १० ते १५ रुपये तिला दिल्याचे कबुलीजबाब देत होते. मग प्रत्येक वेळी रमिझाला तिचा बुरखा वर करून चेहरा दाखवायला सांगितले जाई आणि प्रत्येक पुरुषहीच ती रमिझा असे सांगत असे. कुतुबुद्दिनप्रमाणेच हे सर्व पुरुष पोलिसांकडून कृतिशील केले गेले होते. अशा तऱ्हेने सार्वजनिकरित्या रमिझाचा बुरखा दूर केला गेला तेव्हा रमिझा ही एक नैतिकदृष्ट्या ढळलेली बाई म्हणून प्रस्थापित झाली. इतकेच नाही तर रमिझा आता वेश्या ठरली आणि वेश्यांनी बुरखा घालता कामा नये. चव्हाट्यावरील दृष्टिक्षेपांसाठी स्वतःला सतत खुले ठेवावे असाही संदेश दिला गेला.

रमिझाचे नैतिक अधःपतन हे संपूर्ण मुस्लीम समाजाचे नैतिक अधःपतन या गोष्टीशी विचित्र पद्धतीने बांधले गेले. हे सारे अत्यंत गुंतागुंतीचे आणि फसव्या रीतीने घडले. रमिझाच्या निमित्ताने अधिकारी आणि लिंगभावी राज्यसंस्था मुस्लीम समाजाला चर्चा विश्वामध्ये गोवू शकली. बलात्कार विषयक चर्चाविश्व आता मुस्लीमांच्या समाजाच्या वेश्या व्यवसायाच्या विषयामार्फत मध्यस्थी करून मांडले गेले. रमिझासारख्या दुःख भोगलेल्या आणि जिवंत असणाऱ्या स्त्रीला स्वतःचा पुनर्जन्म करवून घेण्यासाठी वेश्या व्यवसायाच्या आरोपांच्या विरोधात यशस्वीपणे उभे राहावे लागणार होते. म्हणजे आता बलात्कार आणि खून या घटना धूसर झाल्या.

वेश्या व्यवसायापासून विवाहाकडे वाटचाल करताना घौसिया आणि अन्वर यांचे विवाहाचे प्रमाणपत्र सादर करावे लागले. अहमद हुसेनने शहजादबीशी निकाह लावला होता. मालनबी अहमद हुसेनच्या रमिझाबीशी झालेल्या लग्नाबद्दल म्हणते, 'मला माहिती आहे की, इस्लामच्या तत्त्वांनुसार निकाह होत नाही तोपर्यंत विवाह पूर्ण होत नाही. मी लग्न केले तेव्हा माझा निकाह झाला होता. पण रमिझाबीचे लग्न मात्र निकाह करून केले नव्हते. म्हणून मला माहीत आहे की, असे पुरुष-स्त्रीचे नाते इस्लामानुसार अवैध ठरते.' अशा तऱ्हेने मालनबी आपल्या मुलाच्या विवाहाची अवैधता देण्यासाठी वापरली गेली. या साऱ्यातून साध्य असे झाले की, बलात्कारित रमिझाच्या दृष्टीने काय किंवा मालनबीच्या दृष्टीने काय, कुटुंब ही संस्था पुसून टाकली गेली. रमिझाला अधिकृत कुटुंब नाकारून एकूण मुस्लीम समाजाच्याच संदर्भात हे नैसर्गिक सामाजिक एकक नाकारले गेले.

मुस्लीम समाजाचे लिंगभावीकरण आणि दुय्यमत्त्व हे त्या समाजातील स्त्रियांना दर्जा आणि पावित्र्य यांचा अभाव आहे हे दाखविण्यातून सिद्ध झाले. त्याचप्रमाणे त्यांच्याच पुरुषांनी कबरस्तानासारख्या पवित्र जागेमध्ये गुन्हा करून त्याचे

पावित्र्य घालविण्यातून हे सिद्ध झाले. रमिझाला जेव्हा जबरदस्तीने पळविले गेले तेव्हा अहमद हुसेन हा नैसर्गिक विधी पार पाडत होता आणि तेवढ्या काळात रमिझावर बलात्कार झाला. प्रतिवादाचा तर्क असा होता की, पोलिसांनी रमिझाला पकडले त्याचे कारण तिला वेश्या व्यवसाय करताना आणि अश्लील पद्धतीने स्वतःचे प्रदर्शन मांडताना अटक झाली होती. पुन्हा एकदा येथे रमिझाचा बलात्कार हे सत्य आणि तिच्या नवऱ्याचा मृत्यू आणि त्या संदर्भात झालेला लोकक्षोभ हे कमी महत्त्वाचे ठरून वेश्या व्यवसाय हा आरोप महत्त्वाचा ठरला. रमिझाची रिक्षा ज्या जागेपाशी उभी केली होती त्याच्याजवळ कबरस्तान होते. रमिझा म्हणते, 'मी मिस्टर बारी यांना असे सांगितले नाही की, माझा नवरा कबरस्तानामध्ये नैसर्गिक विधी करायला गेला होता. माझी रिक्षा जेथे थांबली होती तेथे मी कबरस्तान पाहिले होते... परंतु मला मुस्लीम समाज कबरस्तानाविषयी आदर बाळगतो की नाही हे माहिती नाही...'

लक्षात घेण्याचा मुद्दा हा आहे की, पोलीस कोठडीमध्ये अहमद हुसेनचा मृत्यू झाला या प्रश्नाला हात घालताना प्रतिवादाची रणनीती अशी होती की, ज्या स्थानवार गुन्हा घडला ते स्थान गिळंकृत करणे, त्या स्थानाला नाव देणे म्हणजे ते एक पवित्र ठिकाण ठरवून त्याची विटंबना करणे चूक आहे असे ठरविणे आणि मग ती जागा पवित्र-अपवित्र या संहितेमध्ये घालणे. अशी पावित्र्य-अपावित्र्याची संहिता हा ब्राह्मणी हिंदुत्वाचा गाभ्याचा आशय ठरतो. तरीसुद्धा कबरस्तानाला पावित्र्य देण्याचे हे रचित हिंदू संकल्पनेच्या विरोधाताच होते. आपल्याकडे प्रेते जाळण्याची वा पुरण्याची जागा म्हणजे स्मशानभूमी ही मुळात अमंगल जागा असते. शेवटी यासर्व प्रक्रियेत व्यक्तीला समूहामध्ये धुसर करण्याची कृती केली ती जणू काही सर्वसामान्य मुसलमानांच्या पवित्र जागेबद्दल आदर न बाळगण्याची सवयीची कृती होती.

आणि तरीही येथे लक्षात घेतले पाहिजे की, पवित्र जागेच्या आणि काळाच्या संदर्भात मुसलमानांना ज्याप्रकारे स्थित केले गेले ती काही साधीसरळ एकरेषीय प्रक्रिया नव्हती. सय्यद मुर्तुझा हुसेन हा आरोपी असलेला एक पोलीस आपल्या साक्षीत म्हणते, की, 'मी पोलीस स्टेशनमध्ये रमिझाबरोबर जात असताना विद्यानगर मशिदीचे निरीक्षण केले. त्यावेळी मौलवीने चांगल्या मुसलमानांना प्रार्थनेसाठी बोलविले. तो म्हणत होता प्रार्थना करणे हे झोपून राहण्यापेक्षा चांगले. ही प्रार्थनेसाठी दिली गेलेली बांग सकाळची प्रार्थना होती. सकाळचे ५। वाजले होते आणि मी प्रार्थनेसाठीची हाक ऐकली.' येथे प्रार्थनेची



दिली गेलेली बांग, हा वेश्या व्यवसाय, बलात्कार आणि विटंबना हे सारे क्षण कबरस्तानाच्या संदर्भात नोंदविण्याची क्रिया झाली. मुस्लीम समाजाला धार्मिक सांस्कृतिक अवकाश गिळंकृत केला गेला आणि तो अवकाश नव्याने रचला गेला. समाजाच्या बाहेर असणाऱ्या दृष्टिक्षेपामधून त्या समाजाच्या सांस्कृतिक एकसत्वाचे जसे आकलन केले जाते, अपरिहार्यपणे इतर वा अन्य या दृष्टीने ते केले जाते तसेच ते येथे केले गेले. अगदी लहानसे आणि खरे तर बिनमहत्त्वाचे प्रश्न वापरून व्यापक राष्ट्रवादी शब्दांच्या चर्चाविश्वात घातले गेले. यामधून हिंदू-मुस्लीम, नैतिक-अनैतिक, योग्य-चूक, तथ्य आणि वावड्या यांचे मोठे बोलके विरोध उभे केले गेले. हा सर्व खटाटोप अधिकारशाही झाला. कारण व्यक्ती म्हणून, कुटुंब म्हणून, समाज म्हणून यातून मुस्लीमांना स्वतःविषयी आणि स्वतःविरुद्ध बोलायला भाग पाडले. कुटुंबाची प्रतिमा या गोष्टीचा आता मागमूसही ठेवला गेला नाही आणि या संपूर्ण चर्चाविश्वातून वर्ग या संकल्पनेला पुसून टाकले- कष्टकरी वर्गातील पुरुष आणि स्त्रियांना जे निराधार आणि विषम वागणुकीचे चटके दिले जातात त्याच्यावर अतिशय हिंसक पद्धतीने समाजाची विकृतीकरण केलेली रचिते अतिरिक्त स्वरुपात लिहिली गेली.

अहमद हुसेनची पहिली पत्नी शहजादीबी हिने आपली साक्ष देताना आपला वर्ग आणि जगूनतगून राहणे हे एका अर्थी पुढे मांडले होते. अहमद हुसेनच्या मृत्यूनंतर तिची मोठी मुलगीही मृत्यू पावली होती आणि साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभी असताना तिच्या हातात तीन आठवड्याचे अर्भक होते. तिने जे मांडले ते काही पढविलेले नव्हते.तिला अहमद हुसेनने दुसरे लग्न रमिझाशी केले हे माहिती नव्हते. ती आपला नवरा किंवा सासू हे वेश्या व्यवसायात गुंतलेले आहेत या प्रवादाला मान्यता देत नाही. ती म्हणते, 'माझा नवरा गवंडी होता. तो गवंडी असतानाच

त्याने दगड विकण्याचा धंदा सुरू केला. माझ्या नवऱ्याने कधीही भडवा म्हणून काम केले नाही. माझी सासू नंदिकोटकूरमध्ये दाई म्हणून काम करून कमाई करत होती. माझ्या नवऱ्याचा मृत्यू झाल्याचे वृत्त मला कुतुबुद्दिनकडून कळले. कुतुबुद्दिन मला असेही म्हणाला की, सरकार २००० रु. भरपाई देणार आहे. एक पोलीस माझे घर बघायलाही आला होता. कुतुबुद्दिनने मला हैद्राबादला पिटिशन फाईल करण्यासाठी आणले... मला पिटिशनची भाषा कळत नाही. पिटिशनमध्ये काय लिहिले आहे ते मला माहिती नाही. मला रमिझाबीबद्दल काहीच माहिती नाही. रमिझाबीने जर सरकारने दिलेल्या भरपाईवर दावाकेला नाही आणि जर मला तो दावा करणे शक्य असेल तर मी आनंदाने भरपाई घेईन. या मंडळींनी मला येथे आणले आणि मी आले, कारण ते मला २०००रु. मिळवून देणार होते.

येथे लक्षात येते की, नैतिक कुटुंब हे अनैतिक समूहाच्या वा समाजाच्या विरोधातच अस्तित्वात येऊ शकते. आयोगासमोर ज्या वेश्यांनी आपल्या साक्षी दिल्या त्या, संपूर्ण रात्रभर काम करून ३० रु. कमवत होत्या. या वेश्या रात्री आपल्या उदहरनिवार्हासाठी शहरातील रस्त्यांवर भटकत होत्या आणि गिऱ्हाईक म्हणून किंवा संरक्षक म्हणून राज्यसंस्थेच्या मर्जीवर अवलंबून असणाऱ्या पुरुष आणि स्त्रियांना गाठणाऱ्या असे त्यांचे स्वरुप होते.

राज्यसंस्थेने मुस्लीम वेश्या आणि भडव्यांना स्वतःच्या वतीने साक्ष देण्यास बोलवून रमिझा आणि तिचे संपूर्ण कुटुंब वेश्या व्यवसायात गुंतलेले आहे असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला, तो म्हणजे खरे तर त्या समाजाची अर्थव्यवस्था अनैतिक ठरविण्याचाच प्रयत्न होता. जे काही तर्क मांडले गेले त्यातील लक्षणीय तथ्य हे आहे की, त्यातील कळीचे खेळाडू हे राज्यसंस्थेच्या अंतर्गत असणारे होते आणि ते मुस्लीमही होते. परंतु त्याचवेळी हा जो प्रकल्प संपूर्ण समाजावा अनैतिकतेने घडविला गेलेला असे मानत होता, त्याने राज्यसंस्थेची नैतिक भूमिकाच उलथवून टाकली. कारण या साऱ्या खटाटोपातून स्वच्छपणे ते बाहेर आले. विशेषतः साक्षींच्या दस्तऐवजांमधून जे बाहेर आले ते असे की, याच राज्यसंस्थेने ही अनैतिकता निर्माण केली आणि चालू ठेवली.

राज्यसंस्थेने हा जो खटाटोप केला त्याचा परिणाम फार गंमतीशीर आणि राजकीयदृष्ट्या लक्षणीय असा झाला. मजलिस इत्तेहादूल मुस्लिमनी, न्यायमूर्ती मुक्तदार आणि इतर वरच्या वर्गातील मध्यमवर्गीय मुस्लीम शिक्षित पुरुष यांच्या दृष्टीने त्यांच्या समाजाच्या करुण कहाणीचे, कर्माचे, जिंवत जागते प्रतीक म्हणजे रमिझा झाली. यातील उपरोध असा, या प्रक्रियेच्या अगदी शेवटी जी काही या प्रश्नाची मांडणी झाली ती दोन्ही बाजूंनी उलटीपालटी झाली. राज्यसंस्थेच्या दृष्टीने रमिझा नावाचे अस्तित्व तिच्या अनैतिक देहामध्ये आणि मुसलमान समाजाच्या कलंकित स्वरुपामध्ये अवगुंठित आहे असे ठरले आणि हे तथ्य तिच्याच समाजातील तिच्याचसारख्या इतर सदस्यांनी सहमती देऊन सिद्ध केले., परंतु त्याचवेळी 'तिच्या' लोकांच्या दृष्टीने तिचे अस्तित्व तगूनजगून राहण्यासाठी संघर्ष देणाऱ्या समाजावर झालेला खटला आणि आरोप-प्रत्यारोपाच्या वेष्टनात अवगुंठित असे ठरले आणि प्रतिष्ठा आणि एकात्मता यासाठी झगडणाऱ्या समाजाची ती प्रतिनिधी ठरली.

रमिझावर झालेल्या वेदनादायी बलात्काराचा प्रभाव या साऱ्यातून बदलला नाही किंवा तिला तिच्या कुटुंबाला किंवा समाजाला नागरिकत्व म्हणून जो अधिक्षेप सहन करावा लागला त्याचा शोकात्म परिणामही बदलला नाही. यातून फक्त एवढे दाखविले गेले की, अशा तऱ्हेच्या परिणामांसाठी राज्यसंस्था अनेक प्रकारच्या रणनीती अवलंबू शकते. अधिक महत्त्वाचे म्हणजे यातून असे दाखविले गेले की, सांस्कृतिक प्रभुत्वशाली नियमांच्या संहिता आणि पुरुषसत्ताकतेतून घडलेली विविध दले यामुळे स्त्रिया कृतिशीलपणे न्यायव्यवस्थेशी व्यवहार करू शकतील ही शक्यता नाहिशी केले गेली आणि जमातवादी विचारप्रणाली ज्याप्रकारे न्यायव्यवस्थेला बांधून टाकतात ते लक्षात घेता या व्यवस्थेमध्ये खऱ्याखुऱ्या वास्तवांना स्थानच राहत नाही.

१९७८ च्या सप्टेंबरमध्ये बरोबर रमिझाबीवरील हल्ल्यानंतर सहा महिन्यांनी सुप्रिम कोर्टाने महाराष्ट्र शासन विरुद्ध तुकाराम या केसचा निकाल दिला. तुकाराम या पोलिसाला १६ वर्षांच्या मथुरा नावाच्या आदिवासी मुलीवर बलात्कार केल्याच्या आरोपातून सोडविले गेले. यामध्ये सुप्रिम कोर्टाची अथवा ट्रायल कोर्टाची अलंकारिक भाषा पाहिली तर ती रमिझाबीच्या केससारखीच होती. या साऱ्यातून मोठ्या प्रमाणात निषेध उद्युक्त केले गेले आणि बलात्कारविषयक कायद्यामध्ये सुधारणा व्हावी अशा मागण्या केल्या गेल्या.

### भंवरीदेवी : हिंसाचार आणि पुनर्स्थापना

१९८४ मध्ये भारत सरकारने स्त्रियांच्या विकासाचा कार्यक्रम राजस्थानमध्ये सुरू केला. त्यातील मूलभूत उद्दिष्ट असे होते की, ग्रामीण भागातील स्त्रियांना सक्षम करून

विकासामध्ये कृतिशील भूमिका बजावण्यास वाव निर्माण करावा. भटेरी नावाच्या गावातील भंवरीदेवी साथिन् म्हणून- समाजातील कार्यकर्ती म्हणून - १९८५ मध्ये या कार्यक्रमात नेमली गेली. या कार्यक्रमातून स्थानिक सरकार, जमीन, पाणी, सार्वजनिक वितरण व्यवस्था, किमान वेतन, आरोग्य, साक्षरता आणि बालविवाह असे प्रश्न हाती घेतले गेले- म्हणजेच या भू-क्षेत्रांमध्ये जे प्रश्न अर्थपूर्ण होते आणि ज्या प्रश्नांशी साथिन असणाऱ्या स्त्रियांचे आयुष्यही निगडित होते असे सारे प्रश्न घेतले गेले. भटेरीमध्ये १९८६ साली या कार्यक्रमाचा भाग म्हणून पहिल्यांदाच बालविवाह हा प्रश्न चर्चेला आला. भंवरी आणि तिच्याबरोबर काम करणाऱ्या इतर साथिन यांनी आपल्या मुलींची लग्ने वयात येण्यापूर्वी, अर्थात या कार्यक्रमात सहभागी होण्यापूर्वी केली होती. या प्रश्नाच्या चर्चा आणि त्याच्याभोवती कृतिशील कार्यक्रम जेव्हा आखले गेले तेव्हा साथिन म्हणून कार्य करणाऱ्या सर्व स्त्रियांना हे पटले होते की, आपल्या मुलींची लग्ने 'गौण' हा पाळी आल्यानंतर करण्याचा समारंभ होण्यापूर्वी करावी. भंवरीने आपल्या मुलीला हे शिकविले आणि १९८९ पर्यंत तिने स्वतःची प्रतिमा एक निर्भय आणि चैतन्यशाली कार्यकर्ती म्हणून निर्माण केली होती. इतकेच नाही  तर स्त्रीविकासाच्या कार्यक्रमात ती आता पूर्णवेळेची प्रशिक्षक म्हणून भाग घेऊ लागली.

एप्रिल आणि मे १९९२ या काळात, म्हणजे, ह्या कार्यक्रमात सहभागी होऊन भंवरीला आता ७ वर्षे झाली होती. सरकारने ठरविले की, बालविवाहविरोधी पंधरवडा साजरा करायचा. भंवरी ठरविले की, निरर्थक निषेध मोर्चे काढण्याऐवजी ज्या कुटुंबामध्ये अगदी लहान मुलींची लग्ने होणार होती ती कुटुंबे नोंदवून कृती करायची. आखातीज या काळामध्ये रामकरण गुजर हा आपल्या वॉर्डातील पंच असणारा माणूस त्याच्या १ वर्षाच्या मुलीचे लग्न करणार होता. भंवरीने आपल्या गावातील ज्येष्ठ मंडळीचा विरोध सोसूनही वरिष्ठ अधिकारी आणि पोलीस फौज यांच्या साह्याने लग्न थांबवले. हळूहळू त्या गावामध्ये अगदी भंवरीच्या सासऱ्यांसह सर्व पुरुषांनी याबद्दल अस्वस्थता दाखविली आणि ताणतणाव वाढू लागला. भंवरीवर हल्ला झाला, हिंसा झाली आणि तिच्या नवऱ्याचाही छळ सुरू झाला. या परिस्थितीचे गांभीर्य भंवरीला जाणवत होते आणि तिने पोलिसांमध्ये तक्रार देण्याऐवजी गावातल्यागावात हा ताण कमी करण्याचा प्रयत्न केला. परंतु हे सर्व प्रयत्न फोल गेले आणि गावामध्ये जून ते सप्टेंबर १९९२ या काळात अतिशय अशांती माजली. २१ सप्टेंबर रोजी भंवरीचा नवरा मोहन याच्यावर



शारीरिक हल्ला झाला आणि शेतावर काम करताना भंवरीवर लैंगिक हल्ला झाला. ग्यारसा गुजर आणि ब्रदी गुजर या दोन पुरुषांनी तिच्यावर हा लैंगिक हल्ला केला.

या गावामध्ये बालविवाहाच्या प्रश्नासंदर्भात दोन भूमिका होत्या हे स्पष्ट दिसते. गावातील मंडळी एकीकडे बालविवाह प्रथा बंद व्हावी म्हणून मोहिमा काढत होते. परंतु आपापल्या घरांमध्ये बालविवाह साजरे करत होते. आरोपी बद्री गुजर याच्या बाबतही हे खरे होते. भंवरीने मात्र प्रयत्न केला होता तो म्हणजे मोहिमेतील बालविवाह बंदीची घोषणा व्यवहारात आणण्याचा आणि त्यामुळे तिच्या गावातील समाज कोंडीत सापडला होता.

स्त्रिया, राज्यसंस्था आणि समाज यांच्या संघर्षांमध्ये बळी पडतात असे दिसते. भंवरी ही काही पहिली बळी नव्हे. इतकेच नाही तर जेव्हा राज्यसंस्था कृती करते तेव्हा भिन्न समूह एका उद्दिष्टापोटी एकत्र येतात. एरवी हे गट जातीजातींमध्ये विभागलेले  असतात. जून १९९२ मध्ये खरेतर भंवरीवर झालेल्या हल्ल्याच्या तीन महिने आधी तिच्या सासऱ्यांनी कुंभार जातपंचायत बोलवून तिला वाळीत टाकले होते. स्वच्छपणे त्या काळात राज्यसंस्थेने इतर निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या साह्याने या कृतीचा निषेध केला आणि तेव्हा गुजर मंडळींनी पाठिंबा दिला. थोडक्यात सांगायचे तर या सर्व प्रकरणात सत्ता आणि राजकारण यांची एक तऱ्हेची गुंतागुंतीची घडण घडली होती, आणि हाच माझ्या लेखनाचा महत्त्वाचा मुद्दा आहे. बलात्कार ही घटना जरी एका स्त्री व्यक्तीवर होणारा उघड उघड हल्ला या स्वरुपात असली तरी या घटनेचे उद्दिष्ट, त्या स्त्रीला दुबळी आणि निराधार करण्याचे अनेक मार्ग, या घटनेमुळे निर्माण होतात आणि ही गुंतागुंत तिचा देह आणि व्यक्तित्व या सर्वांच्या पलीकडे जाते.

जेव्हा भंवरीवर हल्ला झाला त्यानंतर ते नाटक अत्यंत सोयीस्करपणे पद्धतीने संपविले गेले. त्या गावात कोणीही तिला पाठिंबा दिला नाही. पोलिसांनी तिची तक्रार नोंदवून घेण्यास नाराजी दाखवली. यातला उपरोध असा की, या घटनेनंतरचा पाठपुरावा करणारा पोलीस तिला, 'बलात्कार या कृतीचा अर्थ कळतो का' असाही प्रश्न विचारता झाला. सार्वजनिक आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टर्स उपलब्ध नव्हते. भंवरीला माहीत होते की, या प्रसंगानंतर तिने आपले कपडे बदलता कामा नयेत आणि कोर्टात केस उभी राहायची तर तिला वैद्यकीय तपासणीची आवश्यक पावले उचलावीच लागतील. इतका मोठा आघात झाल्यानंतरही आपला विवेक आणि भावना यांचा समतोल तिने साधला. तिने जवळपासच्या गावांमध्ये साथिन म्हणून काम करणाऱ्या आपल्या सहकारी मैत्रीणींची मदत घेऊन पाहिली आणि तिचा नवरा– ज्याच्यावर शारीरिक हल्ला झाला होता – त्याचीही मदत घेतली. बलात्कारानंतर बरोबर ४७ तासांनी भंवरीला वैद्यकीय मदत मिळाली.

येथे मुद्दा लक्षात घ्यायचा आहे तो असा की, स्त्रियांवर होणारा हिंसाचार हा सर्व स्त्रियांचा समान अनुभव आहे हा नव्हे तर हिंसाचार हा आमचा संदर्भ आहे. एकूण वातावरणातील तिरस्कार वा राग यांचा मूळ स्रोत काय होता? भंवरीने आपला समाज आणि राज्यसंस्था या दोहोंनाही आपल्या चिवट कार्यामधून प्रभावीपणे शह दिला.

आणखी असे की, एरव्ही राज्यसंस्थेवर रागावलेल्या समाजांनी भंवरीवर आपला राग काढला आणि राज्यसंस्थेने कष्टकरी थरातील दलित स्त्रीच्या कृतिशीलतेवर राग काढला. कारण तिची कृती राज्यसंस्थेच्या एकरेषीय राजकारणाच्या स्वतःच्या व्यवहाराच्या पलीकडे जाणारी होती. भंवरी त्यामुळे संपूर्णतः मर्मभेद्य, पोरकी झाली. येथे आपल्याला पुन्हा एकदा या प्रश्नाकडे वळावे लागते की, बालविवाहाच्या विरोधातील मोहीम ही रोजगाराच्या मुलांना संगोपन आणि निवारा द्यावा हा प्रेमानंद आश्रमाचा प्रमुख हेतू होता.

या आश्रमातील जवळ जवळ २००तरुण पुरुष आणि वयात आलेल्या मुली श्रीलंकेतील नागरिक होत्या. १९९७ मध्ये पडुकोट्टाई येथील सेशन कोर्टमध्ये जज्ज या पदावर आर. भानुमती नावाची स्त्री होती. तिला असे दिसले की, प्रेमानंद आणि त्याच्याबरोबरचे सहा सहकारी हे स्वतःकडे जादूची शक्ती आहे असा दावा करून आपल्या शिष्यांना आणि आपल्यावर विश्वास ठेवणाऱ्यांना फसवीत आहेत, त्यांचा गैरफायदा घेत आहेत आणि आश्रमात राहणाऱ्या अशा अनेक तरुण स्त्रियांवर लैगिक हल्लाही करीत आहेत. १९९० ते १९९४ या काळामध्ये या आश्रमातील एका पुरुषाची हत्या झाली होती आणि अनेक स्त्रिया ज्यांच्यावर लैंगिक हल्ला झाला होता. त्यांचेवर बलात्कारही केले गेले होते. यामधील ७ आरोपींपैकी एक स्त्री होती आणि उरलेले सर्वपुरुष होते. आठवा आरोपीसुद्धा स्त्री होती. परंतु ती परागंदा झाली आणि दोन पुरुषांनी या केसमध्ये माफीचा साक्षीदार म्हणून काम केले.

जज्ज भानुमती यांनी तथाकथित आध्यात्मिक गुरूपणाबद्दल प्रेमानंद यांना अपराधी मानून अशी मिथके फोडली पाहिजेत असा निर्वाळा दिला. शिवलिंग आणि विभूती काढून दाखविणाऱ्या प्रेमानंदांना शह देण्यासाठी जज्ज भानुमती यांनी इतर जादूगारांना बोलावून अशा जादू करायला लावल्या आणि त्यातून आध्यात्मिक शक्ती वा चमत्कार फोल ठरविले. भानुमती असे मांडतात की, 'कोणत्याही धर्मामध्ये पोकळ विधी घडविले जातात तेव्हा मानवी वर्तणूक चांगली होण्यासाठी मदत होत नाही. स्वतःला देवाची माणसे म्हणवून घेणारी मंडळी आध्यात्मिकता जोपासण्याऐवजी ते आपल्या शिष्यांच्या मनाचे अपहरण करून अंगाऱ्याधुपाऱ्यांभोवती गुंगवून ठेवतात... अशा वेळी या शिष्यांचे मन त्यावर विश्वास ठेवू लागले की, मग इतर कोणत्याही नव्या कल्पना किंवा विचार त्यांच्या मनाच्या फटीतून आत शिरूच शकत नाही.'

माझ्या दृष्टीने या फसव्या पोकळ चमत्कारांच्या विधींना कोर्टासमोर आणल्यानंतर धार्मिक व्यवहार, सण, व्रतवैकल्ये आणि त्याभोवतीच्या घडामोडी यांची एक सर्जनशील चिकित्सा समोर आली. मानवी मनामध्ये आध्यात्मिकतेची गरज असते हे न नाकारता कोर्टरुममध्ये श्रद्धेसंदर्भात येणारे प्रश्न येथे चर्चिले गेले.

ज्या लहान मुली श्रीलंका अथवा तामिळनाडूमधून आणल्या गेल्या होत्या त्या वयात येण्यापूर्वी आश्रमात आल्या होत्या. त्या वयात आल्यानंतर आपल्या गावाहून प्रेमानंदांकडे पाठविल्या गेल्या होत्या. एका विधवा आईने आपल्या तीन मुलींना स्वतःहून पाठविले होते. प्रेमानंद यांनी त्यातील अगदी ११ वर्षांच्या मुलीवरही बलात्कार केला होता. आश्रमामध्ये काही वयोवृद्ध स्त्रिया होत्या. परंतु लैंगिक हल्ल्याच्या तक्रारी मात्र तरुण, पोरक्या मुलींकडून आल्या होत्या. या मुलींवर अनेक प्रकारचे अत्याचार झाले. या केसमध्ये जेव्हा प्रतिवादी मांडणी करत होते तेव्हा त्यांनी या मुलींच्या अनैतिकतेचे अनेक पुरावे दिले. अविवाहित असलेल्या स्त्रिया वैद्यकीयदृष्ट्या तपासून




लैंगिकदृष्ट्या व्यवहार करणाऱ्या असे ठरविले गेले. जज्ज भानुमती यांनी सरळासरळ आश्रमामध्येच निवास करणाऱ्या या मुलींच्या अशा स्थितीला प्रेमानंद यालाच जबाबदार धरले. प्रेमानंद स्वतःला संन्यस्त आणि देह नाकारणारा मानत होता हे ह्या केसमध्ये प्रश्न चिन्हांकित केले गेले. या केसममध्ये प्रेमानंद आणि त्याचे सहकारी अपराधी ठरले आणि त्यांना शिक्षा मिळाली. जज्ज भानुमती यांनी शेवटी एक वैषम्य वाटणारे विधानही मांडले ते म्हणजे, 'या केसची सुनावणी म्हणजे बळी गेलेल्यांच्या जखमांवर अधिक जखमा करणे असे होते. अनेकदा कोर्टाला सुद्धा या बळी गेलेल्या स्त्रियांवर होणाऱ्या गलिच्छ आरोपांमुळे असाहाय्य वाटत होते.'

हा जो निकाल लागला त्याला हायकोर्टाने दुजोरा दिला आणि बलात्काराच्या बळीच्या दृष्टीने कोर्टाने संवेदनक्षम आणि समंजस व्हायला हवे जसे जज्ज, पोलीस म्हणून स्त्रियांची नेमणूक झाली पाहिजे असेही मांडले. जज्ज भानुमती या स्त्री होत्या म्हणून त्यांनी योग्य न्याय दिला असे एकसत्वीकरण येथे करायचे नाही. परंतु लैंगिक हिंसाचारबद्दलचे ज्ञान पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या चौकटीत करण्याचे काम स्त्रियासुद्धा करतील हे खरे असले तरी येथे या मुली आश्रमामध्ये राहात होत्या या तथ्यामुळे न्यायव्यवस्थेला हादरा बसून जाग आली हे लक्षात घेतले पाहिजे. इतकेच नाही तर जज्ज म्हणून काम करणाऱ्या बाईचे बाईपण हे प्रतिनिधी म्हणून न्यायसंस्थेमध्ये महत्त्वाचे आहे हेही मान्य केले पाहिजे.

## जगूनतगून राहणाऱ्या अधिकाराचे उल्लंघन म्हणजे बलात्कार

१९९५ मध्ये सुप्रीम कोर्टासमोर बोधिसत्व गौतम ही केस आली. ही केस म्हणजे जाणीवपूर्वक बनावट विवाह करणे, 'बायको' ला फसवणे आणि बलात्कार घडविण्यास कारणीभूत होणे अशा प्रकारची होती. येथे लक्षात घेतले पाहिजे की, येथे बलात्कारविषयक तरतुदी लावल्या गेल्या नव्हत्या. परंतु या केसची संपूर्ण चर्चा बलात्काराच्या संदर्भात झाली, फक्त फसवणुकीच्या संदर्भात झाली नाही.

कोर्टाने बलात्कार ही गोष्ट घटनेतील २१ व्या कलमातील जिंवत राहण्याच्या मूलभूत हक्काच्या चौकटीत ठेवली. त्यांनी असे मांडले... 'बलात्कार हा...फक्त बळी गेलेल्या एका स्त्रीविरुद्ध केलेला गुन्हा नसून हा गुन्हा संपूर्ण समाजाविरुद्ध केलेला आहे. यातून स्त्रीची मानसिकता पूर्णतः नष्ट केली जाते आणि तिला खोलवर भावनिक कोंडीमध्ये ढकलले जाते. समाजामध्ये जेव्हा अशी स्त्री स्वतःचे पुनर्स्थापन करते तेव्हा ती सर्वथैव आपल्या इच्छाशक्तीने करते. कारण भोवतीच्या समाजाला जेव्हा या बलात्काराची माहिती कळते तेव्हा समाज तिच्याकडे उपेक्षेने आणि कुत्सिततेने पाहतो. म्हणूनच बलात्कार हा सर्वात अधिक तिरस्कार वाटावा असा गुन्हा आहे. मूलभूत मानवी हक्कांच्या विरोधात केलेला हा गुन्हा आहे. घटनेतील २१ व्या कलमामध्ये जिवंत राहण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला मूलभूत हक्क म्हणून दिला आहे त्याचे हे उल्लंघन आहे.'

## सामूहिक हिंसाचार आणि लैंगिक हल्ला

काश्मीरमधील स्त्रिया, उत्तरपूर्व भारतातील स्त्रिया यांच्यावर गेली दोन दशके ज्या प्रमाणात हल्ले होत आहेत त्याची तीव्रता येथे लक्षात घेतली पाहिजे. गुजरातमधील २००२ साली मुसलमान स्त्रियांना सामूहिक हिंसाचार ज्याप्रकारे सोसावा लागला त्यामध्ये तर कुटुंबातील सदस्यांचे अदृश्य होणे तसेच आपल्या समाजातील पुरुषांना मारून टाकणे आणि सामूहिकरित्या स्त्रियांवर हल्ले करणे असे सर्व घडले.

उत्तरपूर्व राज्ये आणि काश्मीर यांच्यामध्ये जो फरक केला जातो तो या प्रदेशांमध्ये राजकीय परिस्थितीसंदर्भात केला जातो. एका प्रदेशावर अधिकृतरित्या बळाचा वापर करावा लागतो आणि एका प्रदेशामध्ये अनधिकृत हिंसाचार घडतो



आहे. राज्यसंस्था आणि सरकारे अशी विभागणी जितक्या सहजपणे करतात त्या मानाने ही विभागणी अनेक अडथळ्यांना तोंड देऊनच केली जाते. या दोहोंमधील नेमकी सीमारेषा कोणती? आपण असे म्हणू शकतो का की, अगदी लढवय्या म्हणून संशयित असलेली पोलीस कोठडीतील स्त्री हिच्यावर लैंगिक हल्ला झाला तर तो अधिकृत बळाचा भाग असतो का? एखाद्या लढ्यामध्ये सैनिकी कृती क्षमाशील पद्धतीने आपण मान्य करू का? मग युनायटेड नेशनसारख्या चौकटी जेव्हा भारतीय सरकार जाहीर करते की, भारतीय भूमीवर सशस्त्र संघर्ष घडत नाही तेव्हा त्याचे काय करायचे? कारण मानवी हक्कांच्या अत्यंत व्यवस्थित अशा अहवालांमध्ये नागरी समाजावर केलेल्या सामूहिक हिंसाचारामध्ये लैंगिक अत्याचाराचे व्यापक पुरावे सापडतात.

१९६६ ते २००४ या काळामध्ये मणिपूर, नागालँड, मिझारोम आणि आसाम या भागांमध्ये अनेक घटना अशा तऱ्हेच्या अत्याचाराच्या घडल्या आहेत. मिझोराम शांतता पथकामध्ये सुद्धा संघर्षामधून वाचलेल्या स्त्रियांसाठी विशेष तरतुदी नाहीत. भारत सरकारने यातील बऱ्याचशा केस दुर्लक्षित केल्या आहेत आणि ज्या दुर्लक्षित करता आल्या नाहीत त्यांचे निराकरण ज्या भरपाईने केले ते अपुरे आहे. काश्मिरमध्ये मुली पळविणे, अदृश्य होणे, बलात्कार या गोष्टी सातत्याने घडत आहेत असे जमृदा खांडे यांच्या 'रात्रीमधील दहशत' अशा शब्दांत वर्णन केलेल्या अहवालात आढळते.

गुजरातमध्ये हिंदु पुरुषांना हिंदू स्त्रियांनी साहाय्य करून ज्याप्रकारे मुस्लीम स्त्रियांना लक्ष्य बनविले गेले त्याचे अनेक मानवी हक्क अहवाल प्रसिद्ध आहेत.

तनिका सरकार यांनी असे मांडले आहे की, या प्रकारात क्रौर्याचा जो आविष्कार दिसतो त्यातून तीन मुद्दे समोर येतात. एक म्हणजे, स्त्रियांचे शरीर ही एक न आवरता येणाऱ्या हिंसाचाराच्या अभिव्यक्तीसाठी भूमी झाली. यातून बहुविध आणि कल्पक प्रकारचे हिंसक मार्ग अगणित पद्धतीने वापरले गेले. दुसरे असे की, स्त्रियांची लैंगिक आणि पुनरुत्पादनाची इंद्रिये खास रानटी पद्धतीने हल्ला करून चेंदामेंदा केली गेली. तिसरी म्हणजे मुस्लीम समाजातील अर्भके, जन्मलेली आणि न जन्मलेली हल्ल्याच्या तोंडी पडली आणि मुस्लीम स्त्रियांच्या डोळ्यासमोर ही नष्ट केली गेली.

## निष्कर्ष

गुजरात हत्याकांडामधून बचावलेल्यांच्यासाठी आजही न्याय देणारे ठराव झाले नाहीत. उत्तरपूर्वेमधील हिंसाचाराचे तेच आहे. १९८४ मध्ये दिल्लीमधील शिखांवर जे झुंडींनी गुन्हे घडविले त्यांना न्यायाच्या चौकटीत सुटका मिळाली. म्हणून अजूनही हे सर्व प्रश्न तसेच शिल्लक राहतात.

गुन्हेविषयक न्यायाचा जो गाभ्याचा घटक आहे तो म्हणजे, जी काही दुखापत झाली आहे त्या दुखापतीचे मोजमाप आणि मूल्यमापन केले जाते. परंतु लैंगिक अत्याचाराच्या केसेस संदर्भात विशेषतः सामूहिक हिंसाचाराच्या संदर्भात हे खोलवर समस्यात्मक आहे. न्याय मिळविण्यासाठी ज्या अत्यंत पायाभूत यंत्रणा असतात त्यांच्यापाशी पोचणे अस्तित्वात नाही अशी परिस्थिती येते आणि जेव्हा राज्यसंस्थासुद्धा हिंसा घडविणाऱ्यांबरोबर हातमिळवणी करते तेव्हा प्रश्न बिकट होतो. यातून अनेक व्यापक प्रश्न उभे राहतात ते पुरावा आणि एकूण न्याय देण्याच्या पद्धतींच्या आशयासंदर्भात. ज्या स्त्रिया बळी गेलेल्या असतात त्यांची परिस्थिती ध्रुवीकरण झालेल्या समाजामध्ये अतिशय केविलवाणी असते आणि त्यांना राजकीय आवाजही नसतो. थोडक्यात, माझ्या मते लैंगिक हल्ल्याचा गुन्हा ज्या एका विशिष्ट सामाजिक, सांस्कृतिक आणि विचारप्रणालीच्या संदर्भात घडतो. तिथे आपण पाहिले की, भंवरीदेवी सारखीने स्वतःच्या संदर्भातच न्यायाच्या शक्यता अनुभविल्या आणि बलात्कार या गोष्टीचा मूल्यात्मक अर्थ बदलून त्याला कलाटणी दिली.

■■■